**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२५३/२००७**
**अपील क्रमांक २२५४/२००७**

**अपील क्रमांक २२५३/२००७**

**१) श्री गजानन मधुकर ठाकूर, कार्याध्यक्ष,**
**महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात संरक्षण समिती,**
**कार्या. रोकडीया हनुमान नगर, शेगांव ता. शेगांव**
**जिल्हा बुलढाणा.**

**अपीलकर्ता**

**अपील क्रमांक २२५४/२००७**

**२) राजू मधुकर इंगळे (ठाकूर)**
**सदस्य, महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात संरक्षण समिती,**
**कार्या. रोकडीया हनुमान नगर, शेगांव ता. शेगांव**
**जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१**

**४) जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

दोनही अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ६.६.२००७ व १.६.२००७ रोजी (आयोगाचे कार्यालयास प्राप्त दिनांक १४.६.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. अपील क्रमांक २२५३/२००७ मध्ये श्री गजानन मधुकर ठाकूर यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-०१ यांना कार्याध्यक्ष

महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात संरक्षण समिती म्हणून दिनांक १३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यात दिनांक ७.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती दिली नाही असा उल्लेख केलेला दिसून येतो. दिनांक ७.८.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ८.१.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांनी "आपण मागितलेली माहिती ही अभिप्राय स्वरुपाची आहे, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ पोटकलम (च) मधील माहिती या शब्दाच्या अर्थात समावेश होत नसल्याने सदरची माहिती देता येत नाही", असे कळविलेले दिसून येते. सदरचे उत्तर योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक २२५४/२००७ मध्ये अपीलकर्ता श्री राजू मधुकर इंगळे (ठाकूर) यांनी दिनांक २०.३.२००६ रोजी माहिती अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांचेकडे माहिती, सदस्य महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात संरक्षण समिती म्हणून मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.४.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांनी "सदर पत्राचा कालावधी हा १५ ते २० वर्षा पूर्वीचा असल्याने शोघ घेण्यास वेळ लागेल. तथापि, आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्राच्या क्रमांकाबाबतचे विषय कळविल्यास शोघ घेण्यास मदत होईल. मुद्या क्रमांक ५ बाबत कळविण्यात येते की, राष्ट्रपती, अनुसूचित जमाती सुधारित आदेश १९७६ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेले अनुसूचित जमातीचे यादीत अनुक्रमांक ४५ वर ठाकूर, ठाकर, का.ठाकूर/मा.ठाकूर, का.ठाकर, मा.ठाकर या जमाती नमूद करण्यात आलेल्या आहेत. या जमातीसाठी कोणतेही क्षेत्र निर्धारित करण्यात आलेले नाही. त्यामुळे या जमाती महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये आढळून येतात." असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याही पुर्वी दिनांक २१.६.२००६ रोजी अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जास दिनांक ६.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. संदर्भाकिंत क्रमांक २ च्या पत्रान्वये आपणास विनंती केली होती की, सदर पत्राचा कालावधी हा १५-२० वर्षापुर्वीचा असल्याने शोध घेण्यास वेळ लागेल. तथापि, आपल्या अर्जामध्ये नमूद

केलेल्या पत्राचे क्रमांक बाबतचे विषय कळविल्यास शोध घेण्यास मदत होईल. त्याबाबत आपणाकडून अद्यापपर्यंत पत्रांचे विषय कळविलेले नसल्याने पत्रांचा शोध घेण्यास वेळ लागत आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा उपलब्ध करुन दिलेला नसुन सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे मात्र द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलात सुध्दा २५ वर्षापुर्वीच्या पत्रांचा उल्लेख केलेला दिसून येतो. मात्र, त्याबाबतचे विषय दिलेले नाही. व त्यामुळे आजही सदरच्या पत्रांचा शोध घेणे हे शक्य होत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच श्री राजू मधुकर ठाकूर व श्री गजानन मधुकर ठाकूर यांचे जात पडताळणीचे दावे समितीकडे प्रलंबित आहे व त्यामुळे अशा प्रकारची माहिती मागून समितीवर दबाब आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांनी अनेक अर्ज केलेले आहेत, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अर्ज मोघम असतात. निश्चित माहितीचे विवरण नसते. व ते अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन, प्रथम अपीलावरुन व द्वितीय अपीलावरुन सुध्दा दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २२५३/२००७ व अपील क्रमांक २२५४/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२६३/२००७**

**१) श्री त्र्यंबक सिताराम दिपके,**
**मु.पो. ता. ताजनगर, दिग्रस,**
**जिल्हा यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, अमरावती.**
**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, अमरावती.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक २.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक यांचकडे दिग्रस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी लि. च्या प्रशासकिय मंडळाचे कामकाज तथा हितसंबंधी दिनांक १.१०.२००० ते ३०.४.२००७ पर्यंत मागितलेली दिसून येते. मागितलेल्या माहितीमध्ये प्रशासकिय मंडळाने पगार न दिल्याबध्दल आपण कोणतेही आदेश दिलेले नाही व मार्गदर्शनच कां केले, कृपया स्पष्ट करावे व असेच एकुण १२ मुद्यांमध्ये त्यांच्या पगाराच्या संदर्भामध्ये प्रश्नांच्या माध्यमातून माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे उत्तर देण्यात आलेले दिसून येते.
"वास्तविक आपण या कार्यालयाच्या ज्ञापनाद्वारे व्यथित झाले असल्यास तथा त्यात नमुद वस्तुस्थिती व क्रियात्मक बाबीशी असहमत असल्यास आपणाला त्या ज्ञापनाविरुध्द महाराष्ट्र

सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ नुसार अपील किंवा यथास्थिती कलम १५४ नुसार पुर्ननिरिक्षण अर्ज, मा. विभागीय निबंधक, सहकारी संस्था, सहकार संकुल, कांता नगर, अमरावती यांच्याकडे सादर करता येण्याची वैधानिक तरतूद आहे. परंतू आपण आपणाला उपलब्ध असलेल्या वैधानिक तरतुदीचा वापर न करता या कार्यालयाद्वारे निर्गमित ज्ञापना संबंधाने स्पष्टीकरणात्मक विश्लेषणाची मागणी कलेली आहे. परंतु, अशाप्रकारे स्पष्टीकरणात्मक विश्लेषणाचा समावेश केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एफ) मधील तरतुदीनुसार परिभाषित माहिती या संकल्पनेच्या व्याख्येत होत नसल्याने तसे स्पष्टीकरणात्मक विश्लेषण आपणाला देता येत नाही, त्याबध्दल क्षमस्व. उलट सदरील मागणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५२ तथा कलम १५४ मधील तरतुदीनुसार अधिकाराति-क्रमणजनक तथा भ्रममुलक ठरत असल्याचेही स्पष्ट होत आहे. सदरील निर्णयाने आपले समाधान न झाल्यास आपण याविरुध्द, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) मधील तरतुदीनुसार ३० (तीस) दिवसांचे आंत, अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सहकार संकुल, कांता नगर, अमरावती यांचेकडे अपील दाखल करु शकाल.

तसेच आपणाला पुनश्च कळविण्यांत येत आहे की, आपण या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक-पणन-२/टिएसदिपके/तक्रार/४५७५/२००७, दिनांक २०.४.२००७, दिनांक २०.४.२००७ चे विरुध्द मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सहकार संकुल, कांता नगर, अमरावती यांचेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ किंवा यथास्थिती कलम १५४ मधील तरतुदीनुसार दाद मागण्यासाठी विहित वैधानिक कार्यवाही करु शकाल."

३. सदरच्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णयाची तारीख अपीलकर्ता यांनी दिलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले

असता असे दिसून येते की, माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांनी दिलेले उत्तर हे विहित मुदतीत असून ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२६८/२००७**

**१) श्री भगवान श्रीराम बुधेकर,**
**मु.पो.हिरपूर, ता. मुर्तीजापूर, जि. अकोला.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**(प्राथमिक विभाग), जिल्हा परिषद, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी,**
**प्राथमिक शिक्षण विभाग, जि.प. अकोला.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक २.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री गौ.ज. जाधव हजर आहेत. तसेच ते अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००६ व दिनांक ८.३.२००७ रोजी माहितीचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येतात. दिनांक १८.९.२००७ च्या अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ९.२.२००७ राजी "आपणास दिनांक ३.१०.२००६ रोजी माहिती घेण्यास हजर राहावे असे कळविले परंतु आपण माहिती घेण्यास हजर राहीले नाही, असे कळविले व त्यामुळे आपणास आवश्यक असलेली कागदपत्रे देता आली नाही." व त्यामुळे एकुण ४ मुद्यांवर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक ३.८.२००७ रोजी पुन्हा एक पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम

अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे पालन केलेले नाही, असे दिसून येते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी करावयाची आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची दखल सुध्दा घेतलेली दिसून येत नसल्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३१९/२००७**

**१) श्री नेमीचंद सदाराम डोये,**
**मु.पो.पिंपळगांव (खांबी), ता.अर्जूनी मोर,**
**जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**तहसिलदार कार्यालय, अजूर्नी /मोर**
**जिल्हा गोंदिया.**
**३) जन माहिती अधिकारी,**
**तहसिल कार्यालय, अर्जूनी मोर, जि. गोंदिया.** **उत्तरवादी.**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक २.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे १३.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली होती. परंतु अपील क्रमांक १३१९/२००७ मध्ये दिनांक २७.३.२००८ रोजी सुध्दा निर्णय देण्यात आलेला होता. परंतु, सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिले होते. सदरच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक २८.३.२००८ रोजीच त्यांच्या दिनांक २७.३.२००८ च्या निर्णयाप्रमाणे माहिती यु.पी.सी.ने उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती पुर्ण मिळाली नाही. पुर्वीच्या निर्णयामध्ये ४२४ लाभार्थ्यांची नांवे आहेत. यावरुन त्यांना खोटी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच माहिती खोटी नाही, अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा चस्पा (चष्मा) त्यांचे घराचे संबंधामध्ये झालेला नाही व

पोलीस पाटील यांचे जे म्हणणे आहे ते त्यांनी आयोगास सादर केलेले आहे. त्यामुळे त्याबाबत आयोगाची खात्री होण्याकरीता अजूर्नी मोरगांव येथील पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी पिंपळगांव येथील नेमीचंद सदाराम डोये यांना तलाठी पिंपळगांव यांनी माहिती पुरविली होती व त्याबाबतचा चष्मा केलेला होता, याबाबतची चौकशी, अपीलकर्ता, तलाठी, पोलीस पाटील यांचेकडे चौकशी करुन वस्तुस्थितीचा अहवाल आयोगाकडे १५जानेवारी, २००९ च्या आंत सादर करावा. व त्यानंतर सदरच्या अपीलामध्ये निर्णय देण्यांत येईल.

**आ दे श**

१) सदरच्या निर्णयाची एक प्रत, ठाणेदार, पोलीस स्टेशन, अर्जूनी मोर, जि. गोंदिया यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने चौकशीसाठी पाठविण्यात यावी.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत पोलीस पाटील, पिंपळगांव, तलाठी, पिंपळगांव, पोस्ट पिंपळगांव, ता. अर्जूनी/मोर, जिल्हा गोंदिया यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३१९/२००७**

**१) श्री नेमीचंद सदाराम डोये,**
**मु.पो.पिंपळगांव (खांबी), ता.अर्जूनी मोर,**
**जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**तहसिलदार कार्यालय, अजूर्नी /मोर**
**जिल्हा गोंदिया.**
**३) जन माहिती अधिकारी,**
**तहसिल कार्यालय, अर्जूनी मोर, जि. गोंदिया.** **उत्तरवादी.**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक २.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे १३.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली होती. परंतु अपील क्रमांक १३१९/२००७ मध्ये दिनांक २७.३.२००८ रोजी सुध्दा निर्णय देण्यात आलेला होता. परंतु, सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिले होते. सदरच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक २८.३.२००८ रोजीच त्यांच्या दिनांक २७.३.२००८ च्या निर्णयाप्रमाणे माहिती यु.पी.सी.ने उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती पुर्ण मिळाली नाही. पुर्वीच्या निर्णयामध्ये ४२४ लाभार्थ्यांची नांवे आहेत. यावरुन त्यांना खोटी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे.

तसेच माहिती खोटी नाही, कारण नंतर अर्ज येत असतात व त्यांचा यादीत समावेश केलेला असल्याने यादी ४५२ ची झाली त्यामुळे त्यावेळेस जी यादी होती ती दिली आहे अशा प्रकारे

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा चस्पा (चष्मा) त्यांचे घराचे संबंधामध्ये झालेला नाही. त्याबाबत पोलीस पाटील यांचे जे म्हणणे आहे ते त्यांनी आयोगास सादर केलेले आहे, असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्याबाबत आयोगाची खात्री होण्याकरीता अजूर्नी मोरगांव येथील पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी पिंपळगांव येथील नेमीचंद सदाराम डोये यांना तलाठी पिंपळगांव यांनी माहिती पुरविण्याकरीता पोलीस पाटील यांना घेऊन त्याबाबतचा चष्मा केलेला होता, याबाबत अपीलकर्ता, तलाठी, पोलीस पाटील यांची चौकशी करुन पोलीस पाटील यांचे बयाण खरे किंवा खोटे असा वस्तुस्थितीचा अहवाल १५जानेवारी, २००९ च्या आंत आयोगाकडे सादर करावा. व त्यानंतर सदरच्या प्रकरणांमध्ये निर्णय देण्यांत येईल.

**<u>आ दे श</u>**

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत, ठाणेदार, पोलीस स्टेशन, अर्जूनी मोर, जि. गोंदिया यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने चौकशीसाठी पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

४) निर्णयाची प्रत पोलीस पाटील, पिंपळगांव, तलाठी, पिंपळगांव, पोस्ट पिंपळगांव, ता. अर्जूनी/मोर, जिल्हा गोंदिया यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२७२/२००७**

**१) श्री मधुभाऊ तुकारामजी उजगांवकर,**
**कोठारी नगर, धामणगांव रेल्वे,**
**जिल्हा अमरावती-४४४७०९. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चांदूर रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**धामणगांव रेल्वे, जिल्हा अमरावती. उत्तरवादी.**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक ३.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "सध्या आपल्या अधिनस्त कार्यरत असलैल्या कार्यालयीन व अन्य कर्मचा-यांच्या झालेल्या सेवा कालावधीची माहिती मिळण्याबाबत. सोबत जोडलेल्या प्रोफार्मानुसार माहिती हवी आहे. अ.क्रं., पदनाम, मंजूर पदे, रिक्त पदे, भरलेली पदे, कर्मचा-यांचे नांव, पदभार घेण्याची तारीख, सेवा कालावधी ई." सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी अपीलीय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी कार्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ही तयार असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याचा दिनांक २९.११.२००८ रोजी प्रयत्न केला होता. परंतु अर्जदाराने माहिती घेण्यास नकार दिला असा खुलासा दाखल केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, राज्य माहिती आयोग यांचे पदावरील निर्णयान्वये अर्जदाराने दिलेल्या प्रोफार्मामध्ये माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकारी या नात्याने नव्याने कोणतीही माहिती निर्माण करुन अर्जदाराने घ्यावयाची नाही, असे नमूद असल्याने व त्या कालावधीत जिल्हा परिषद निवडणुक होती. त्यानंतर लगेच दत्तापूर (धामणगांव) खरेदी विक्री समिती निवडणुक होती व त्या सोबत ग्राम पंचायत पोट निवडणुका असल्याने संबंधीत माहिती दिलेल्या प्रोफार्मात देता आली नाही, असाही खुलासा केला आहे.

४. वास्तविक, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमाचे कलम ४(१)(२)(९)(१०) प्रमाणे कार्यालयातच स्वत: होऊन जाहिर करणे आवश्यक असते जेणेकरुन नागरिकांस सदरची माहिती अर्जाच्या माध्यमातून मागण्याची आवश्यकता राहाणार नाही. परंतु, अशा प्रकारची माहिती ही तयार असली तरी ती अधिनियमाचे कलम ४(१) प्रमाणे माहिती करीता उपलब्ध आहे अशा प्रकारची सूचना असणे आवश्यक असते. व त्यामुळेच कदाचित अपीलकर्ता यांनी सदरची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती प्रोफार्मामध्ये उपलब्ध करुन देणे योग्य नाही, असा जरी आयोगाचा निर्णय असला तरी प्रत्येक प्रकरणी निर्णय, त्या त्या प्रमाणे निकष लावणे आवश्यक असते. असे असले तरी, त्या संदर्भामध्ये अर्ज आल्यानंतर ३० दिवसांमध्ये त्याची दखल घेऊन कळविणे आवश्यक असते. मात्र, ३० दिवसांचे आंत तहसिलदार कार्यालयाने सदरच्या अर्जाची दखल घेतलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील जे दाखल केले ते प्रथम अपीलीय अधिकारी नाही, असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. नायब तहसिलदार हे माहिती अधिकारी व तहसिलदार हे प्रथम अपीलीय अधिकारी आहे असे आयोगाचे निदर्शनास

आणण्यात आले. परंतु, ही माहिती कार्यालयाच्या बाहेर दर्शनी भागामध्ये लावणे आवश्यक असते. अर्थात, जन माहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की तशी ती दर्शनी भागात लावलेली आहे. व त्यामुळेही अपीलकर्ता यांनी योग्य ती दक्षता घेऊन, माहिती घेवून अपील करणे आवश्यक होते व तसे केलेले दिसून येत नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जाची व प्रथम अपीलाची दखल ही आयोगाची नोटीस गेल्यानंतरच घेण्यात आल्याचे दिसून येते. याचा अर्थ माहितीच्या अधिकाराचे अर्ज येवून ते प्रलंबित असले तरी जन माहिती अधिकारी दखल घेत नाही, असे दिसून येते. व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारे उत्तर विहित मुदतीत दिलेले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२७६/२००७**

**१) श्री प्रकाश मुकूंदराव पंत**
**डि-१, पहिला माळा, संजय अपार्टमेंट,**
**प्लॅाट नं. २७४, धरमपेठ विस्तार, शिवाजीनगर,**
**नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (नि.) कार्यालय,**
**औ.वि.कें. म.रा.वि.वि. कं. मर्या. खापरखेडा, ता. सावनेर,**
**जिल्हा नागपूर.,**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (नि.)प्रशासन**
**मुख्य महाव्यवस्थापक (नि.) कार्यालय, औ.वि.केंद्र, म.रा.वि.वि.कं.मर्या,**
**खापरखेडा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ४.१२.२००८ )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, मुख्य व्यवस्थापक यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

(१) " दिनांक १.६.२०००६ रोजी मुख्य महाव्यवस्थापक (नि) खापरखेडा यांना दिलेल्या तक्रार अर्जावरील अभिप्राय साक्षांकित प्रत द्यावी.

(२) दररोज काय कारवाही झाली त्याचा अहवाल.

(३) अर्जावर कार्यवाही करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिका-यांचे नांव.



(४) या अधिका-याने काय निर्णय घेतले.

(५) या निर्णयानुसार काय कारवाईचा आदेश देण्यात आला व असा आदेश दिला नसल्यास तो कधी देण्यात येणार आहे.

(६) नियमांचे उल्लंघन करुन झालेल्या रक्कमेची वसुली करण्याचे कंपनीत नियम असल्यास कोणत्या अधिका-यांकडून वसुली केली व आजपर्यंत किती वसुली झाली वसुली केली नसल्यास का करण्यात आली नाही."

३. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १८.६.२००७ रोजी "आपण दिनांक २३.४.२००७ च्या अर्जाद्वारे दिनांक १.६.२००६ च्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली असता, माहिती अधिकारी, औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा यांनी आपणास पत्र क्रमांक ३४९८ दिनांक ३०.४.२००७ द्वारे दिनांक १.६.२००६ च्या अर्जाची प्रत पाठविण्याबाबत कळविले होते. परंतु आपण सदर पत्र सादर न करता अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. तरी माहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार आपण दिनांक १.६.२००६ च्या आपल्या अर्जाची प्रत या कार्यालयास पाठवावी जेणेकरुन त्याबाबत माहिती देणे शक्य होईल." परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या पत्राप्रमाणे पुर्तता केलेली नसून सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.४.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.४.२००७ रोजी तत्कालीन माहिती अधिकारी यांनी आपला संदर्भीय अर्ज या कार्यालयास दिनांक २७.४.२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात आपण नमूद केलेला आपला अर्ज दिनांक १.६.२००६ ची प्रत या कार्यालयास सादर करावी, जेणेकरुन योग्य माहिती पुरविणे शक्य होईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या पत्राचा जावक क्रमांक हा ३४९८ असा दिसून येतो. व त्यामुळे माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे असे जन माहिती

अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळालेले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ज्यावेळेस अपीलकर्ता यांना दिनांक



१.६.२००६ च्या तक्रारीची जी प्रत उपलब्ध नाही, ती उपलब्ध करुन द्यावी, असे कळविले असताना सुध्दा अपीलकर्ता यांनी सदरची प्रत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तक्रारीवर कार्यवाही पेक्षा अपीलकर्ता यांना अधिका-यांना अडचणीत आणण्याचा हेतू दिसतो. अपीलकर्ता त्याच कार्यालयात सेवेत होते, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये दिनांक १.६.२००६ च्या तक्रारीची चौकशीची माहिती विचारलेली आहे, ती तक्रार मुख्य महाव्यवस्थापक यांचे कार्यालयात आपण दिलेली आहे. तसेच उप कार्यकारी अभियंता (स्थापना) परीक्षण यांचे कार्यालयात सुध्दा आपण दिलेली आहे, असे अपीलकर्ता यांनी सांगितले व दिनांक १.६.२००६ च्या प्रती वरुन दिसून येते. व त्यामुळे तक्रार स्विकारली पण आवक नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आली नाही. नोंद न घेण्याचा सुध्दा हेतू दिसतो. त्याकरीता तक्रार कोणी स्विकारली होती, याबाबतची प्राथमिक चौकशी करुन योग्य ती प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक राहील, जेणेकरुन यापुढे अशा प्रकारे तक्रार किंवा अर्ज स्विकारुन नोंद न घेतल्याबध्दल नोंद करण्याचे टाळले जाणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १.६.२००६ च्या तक्रारीची चौकशी करुन हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांची दिनांक १.६.२००६ ची तक्रार ही स्विकारली असून सुध्दा आवक नोंदवहीमध्ये नोंद केली नसेल अशा कर्मचा-यांची चौकशी करुन त्यांचे विरुध्द ३० दिवसांमध्ये योग्य ती सेवा नियमाप्रमाणे प्रशासकिय कारवाई करावी व अहवाल आयोगास सादर करावा.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

November०८Balk

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८२/२००७**

**१) श्री गोविंदा सोनु वलधरे,**
**मु.पो. पिंपळगांव (खांबी),**
**ता. अर्जूनी (मोर), जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.**

**३) जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.**

**उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ४.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे वसुली अधिकारी, गोंदिया डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, गोंदिया, तालुका शाखा, अर्जूनी मोर यांचेवर ४२० ची व इतर फौजदारी कार्यवाही करण्याबाबत मंत्रालयाने पाठविलेली दिनांक १०.९.२००७ ची तक्रार व सूचना याबध्दल झालेल्या कार्यवाहीच्या बध्दल माहिती टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ३०.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा सुध्दा नर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये तहसिलदार, अर्जूनी मोर यांनी जिल्हाधिकारी गोंदिया करीता पाठविलेले पत्र दाखल केले आहे. सदरच्या पत्रामध्ये "संदर्भीय सुनावणीची नोटीस प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांची या कार्यालयास दिनांक २१.११.२००८ रोजी प्राप्त झाली असून त्याची मुळ प्रत यासोबत माहिती तथा पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. या कार्यालयातील अभिलेख्यावरुन असे दिसून येते की, उक्त अपीलकर्ता यांनी या कार्यालयास दिनांक ३०.५.२००७ रोजीचा माहिती मिळण्यासाठी दाखल केलेला अर्ज पुढील कार्यवाहीस आपणास या कार्यालयाचे पत्र क्रमांक अका/दिदावे/केमाअ/प्रक्र-२०/०७/कवि/१०४८/०७, दिनांक १३.६.२००७ अन्वये पाठविले असून त्याची प्रत अर्जदारास सुध्दा दिलेली आहे. त्यानंतर उक्त अपीलकर्ता यांनी या कार्यालयास दिनांक ३०.६.२००७ रोजीचे दाखल केलेले प्रथम अपीलाबाबत प्रथम अपीलीय अधिकारी या कार्यालयातीन नसून तहसिलदार, अर्जूनी मोर हे सक्षम असल्याचे या कार्यालयाचे पत्र दिनांक १७.७.२००७ अन्वये अपीलकर्त्यास कळविले असून त्याप्रमाणे तहसिलदार, अर्जूनी मोर यांचेकडे प्रथम अपल दाखल करण्यास कळविले होते. करीता आपणास कळविण्यात येते की, सुनावणी नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे नायब तहसिलदार तथा जन माहिती अधिकारी व तहसिलदार तथा प्रथम अपीलीय अधिकारी, अर्जूनी मोर यांना सादर करावयाचे कागदपत्रांची यादी, पोचपावतीसह दोन प्रतीत मुद्येनिहाय माहिती तयार करुन सुनावणीचे दिवशी न चुकता वेळेच्या अर्धा तास आधी राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, रविभवन, नागपूर येथे हजर राहावे व तसे कार्यालयास अवगत करावे," असे कळविलेले दिसून येते. त्यावर तहसिलदार, अर्जूनी मोर यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही. व प्रथम अपील अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे दाखल केले नाही किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रथम अपील त्यांचेकडे आलेले नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना दोन पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना एकही पत्र मिळालेले नाही.४. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००७ रोजीचा माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांना दिलेला होता. व त्यामुळे त्या अर्जात मागितलेली माहिती ही जिल्हाधिकारी

कार्यालयातील माहिती अधिकारी यांनीच अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जिल्हाधिकारी यांनी अर्ज वाचला असता तर त्यांना काय माहिती मागितली आहे हे कळले असते. परंतु, अर्ज न वाचताच तहसिलदार यांचेकडे अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो. अर्ज हस्तांतर केलेला असला तरी तो तहसिल कार्यालयात उपलब्ध नाही असे तहसिलदार यांचे आयोगापुढे सांगणे आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपील अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच दाखल केले होते. व त्याबध्दलचा निर्णय हा जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देणे आवश्यक होते. जेव्हा माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणात मागितलेली असते तेव्हा त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित असते. व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी जी अर्ज हस्तांतरणाची कार्यवाही केलेली आहे ती योग्य नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीस येणे आवश्यक होते. व त्याकरीता पुढील तारीखेस जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी आयोगापुढे सुनावणीस हजर राहाणे संयुक्तिक राहील. अन्यथा, त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घेणे आवश्यक राहील.

## आ दे श

१) सदरच्या अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी सुनावणीस राज्य माहिती आयोगाकडे हजर राहावे. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांना पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३५३/२००७**
**अपील क्रमांक ३६९/२००७**

**<u>अपील क्रमांक ३५३/२००७</u>**

**१) श्री कवडू पिठूजी फुलझेले,**
**प्लॅाट नं.२४, प्रतापनगर, डॅा.मानेकरचे दवाखान्याजवळ,**
**नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,**
**नागपूर.**

**<u>अपील क्रमांक ३६९/२००७</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी,**
**मौजा बाभूळखेडा, तहसिल कार्यालय, नागपूर (शहर).**

**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**सा.क्रं.३९, मौजा बाभूळखेडा, तहसिल कार्यालय, नागपूर(शहर). उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ४.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००८ व १७.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ३५३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००७ रोजी मौजा बाभूळखेडा प.ह.नं.३९ येथिल नकाशे मिळण्याबाबत सन १९५० ते १९७५ पर्यंतचा कालावधी दिला आहे. मौजा बाभूळखेडा येथिल सर्व्हे नं. ६८/१ क, (२) ६८/१ ख (३) ६८/१ ग (४) ६८/१ च (५) ६८/१ झ, ची कार्यवाही नकाशे मिळण्याबाबत. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली

नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ६.२.२००८ रोजी अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी मोजणीची क प्रत फी भरुन मिळण्याचा अर्ज केला असेल तर क प्रत मिळते. सुनावणी दरम्यान अर्जदार यांना मोजणी अर्जाबाबत विचारले असता ते काहीही सांगु शकले नाही. तसेच सुनावणीच्या वेळी नकाशाची छायांकित प्रत दाखविल्या. नगर भूमापन कार्यालयाच्या नाहीत. जर अर्जदार यांनी मोजणी फी भरल्याची पावती दिनांक, मोजणी क्रमांक इ. माहिती पुरविली असती तर क प्रतीची नक्कल शोध घेवून देता आली असती. अर्जदार यांनी विचारलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे त्यामुळे देता येत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ अन्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. अपीलकर्ता यांनी निश्चित स्वरुपाची माहितीची मागणी केल्याचे नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांनी ती माहिती प्राप्त करावी. अपीलकर्ता यांचा अपील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ८.११.२००७ रोजी कार्यवाही नकाशा या कार्यालयात ठेवला जात नाही, असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याचप्रमाणे पुन्हा दिनांक २८.१.२००८ रोजी संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विषयांकित ख.नं.चे मोजणी बाबत कोणत्या मोजणी मामला क्रमांकची मोजणी सत्याप्रत पाहिजे आहे हे नमूद नाही. वास्तविक अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली होती. आजही सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच अधीक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी सुध्दा सांगितले की, त्यांच्या नगर भूमापन कार्यालयामध्ये कार्यवाहीचे नकाशे ठेवले जात नाहीत. मोजणी केल्यानंतरच व पोट हिस्याचा संबंध असेल तर सिमांकन दाखविण्यात येते. अन्यथा सिमांकन करण्यात येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या कार्यवाहीचे नकाशे हे नगर भूमापन कार्यालय हे उपलब्ध करुन देवू शकत नाही. सदरचे उत्तर योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३६९/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००७ रोजी तलाठी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून वरील प्रमाणेच संपुर्ण कार्यवाही नकाशाची माहिती

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००७ रोजी मंडळ अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ६.२.२००८ रोजी तलाठी यांनीच उत्तर दिलेले असून अर्जदार यांनी कोणत्या आदेशा विरुध्द अपील दाखल केले आहे व त्यांना कोणत्या आदेशाचा दिनांक हवा आहे याबाबत आदेशाचा क्रमांक व ते कोणत्या कोर्टात आहे याबाबत स्पष्ट उल्लेख अर्जदाराने केल्यास उक्त माहिती ताबडतोब सादर करण्यात येईल. सद्यपरिस्थितीत तलाठी दप्तराच्या आदेशाची माहिती उपलब्ध नाही. तलाठी दप्तराला उपलब्ध असलेल्या मौजा बाभूळखेडा येथील १९११-१२ चे नकाशाचे शिटवर फक्त ६८/१ व ६८/२ असेच बटे दाखविलेले आहे. परंतु, ६८/१ क, ६८/१ ख, ६८/१ ग, ६८/१ च, ६८/१ झ, या बटे नंबरची कारवाई नकाशावर झालेली नाही. सन १९५०-१९७५ या कालावधीमध्ये उक्त बटे नंबर बाबतची कारवाई नकाशात झालेली नाही, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस सुध्दा अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचे पोट हिस्से असलेले नकाशे उपलब्ध व्हावे म्हणून मागणी केलेली आहे व तसे त्यांचे म्हणण्याप्रमाणे तलाठी यांचेकडे उपलब्ध असून ते देत नाही असे त्यांचे म्हणण् आहे. त्या करीता जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या दप्तरात सन १९११-१२ या नंतर कोणत्याही प्रकारचे पोट हिस्से झालेले दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेले नकाशाची प्रत उपलब्ध करुन देवू शकत नाही. मात्र, अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो सोबत सदरच्या सव्हे नंबरच्या पोट हिस्याच्या संदर्भातील झालेल्या कारवाई नकाशाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या मुळ प्रती सुध्दा आयोगाच्या निदर्शनास आणल्या. परंतु मुळ प्रत ही त्यांच्या शेजा-यांची आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. मुळ प्रतीवरुन मात्र असे दिसून येते की, तशा प्रकारची कारवाई नकाशे हे उपलब्ध होते. परंतु तरीही जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे ते उपलब्ध नाही. व उपलब्ध असती तर पुरवण्याबाबत कोणतीच हरकत नव्हती.

पुर्वी ते कसे व कोणत्या आधारे उपलब्ध करुन दिले याची त्यांना माहिती नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी तलाठी कार्यालयातील सर्व अभिलेख्यांची पाहाणी/निरीक्षण करुन जर त्यांना सदरच्या नकाशाची मुळ प्रत उपलब्ध झाली तर त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेता येईल. मात्र उपलब्ध नसल्यास त्याबाबत नवीन तयार करुन देता येणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३५३/२००८ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३६९/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचे कार्यालयातील अभिलेख्यांचे निरीक्षण कार्यालयीन वेळेत तारीख व दिवस कळवून पाहाणी करावी. पाहाणी करताना त्यांना मुळ नकाशाच्या प्रती मिळाल्यास त्याची छायांकित प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांना कार्यालयीन वेळेतील वेळ व तारीख कळविल्यानंतर त्यांनी स्वतः तसेच मंडळ अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना तलाठी कार्यालयातील सर्व अभिलेखे निरीक्षणास/पाहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. त्यावेळेस मंडळ अधिकारी व तलाठी यांनी हजर राहावे. अपीलकर्ता यांना सदरच्या नकाशाची मुळ प्रत उपलब्ध झाल्यास त्याची छायांकित प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२८३/२००७**

**१) श्री राजू किसन वानखेडे,**
**श्रीराम वार्ड, बल्लारपूर, ता. बल्लारपूर,**
**जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, चंद्रपूर, प्रशसकिय इमारत,**
**बस स्टँडचे समोर, चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, चंद्रपूर, प्रशासकिय इमारत,**
**बस स्टँडचे समोर, चंद्रपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ५.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी १४.५.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे श्रीराम नागरी सहकारी पत संस्था मर्या.च्या संदर्भामध्ये दिनांक २०.४.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीचा झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल देण्यात यावा अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.५.२००७ रोजी आपण श्रीराम नागरी सहकारी पत संस्था या संस्थेविरुध्द तक्रार दिनांक २०.४.२००७ बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २ (च) अन्वये माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील साहित्य असा असून त्यामध्ये कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित, फाईल इ. चा समावेश असून

त्यामध्ये प्रश्नांची उत्तरे अपेक्षित नाही. व त्यामुळे आपला संदर्भिय अर्ज या स्तरावर नस्तीबध्द करणे क्रमप्राप्त ठरत आहे. व त्याच उत्तरामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.४.२००७ च्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भामध्ये दिनांक २३.५.२००७ रोजी सुनावणीकरीता हजर राहाण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे असे कळविण्यात आलेले आहे. यावरुन सदरच्या तक्रारीची चौकशी झालेली नाही व अहवालही नाही असा निष्कर्ष निघतो. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.७.२००७ रोजी देण्यात आला असून आपली तक्रार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका चंद्रपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी दिलेली आहे. संस्थेचे निबंधक या नात्याने आपण त्यांचे कार्यालयाशी व्यक्तीशः संपर्क साधावा. त्यामुळे आपण या कार्यालयास केलेली अपील निर्रथक असल्यामुळे आपणास त्यावर निर्णय देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. त्यामुळे आपला अर्ज या कार्यालयाच्या स्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे. परंतु, सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या तक्रार अर्जाची चौकशी झालेली नव्हती तर त्याबाबत तसे त्यांना कळविणे आवश्यक होते. सहाय्यक निबंधक तथा माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा चौकशी करुन योग्य तो कारण मिमांसा करणारा निर्णय देणे अपेक्षित असते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहितीच्या अर्जावरील माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर सदरचा अर्ज नस्तीबध्द होत नाही तर त्यात पुढील अपीलीय अधिकारी यांचे विवरण देणे आवश्यक असते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा अर्ज नस्तीबध्द होत नाही. तर पुढील अपीलीय प्राधिकरणाची माहिती देणे आवश्यक असते. माहितीच्या अर्जाची प्रक्रिया ही राज्य माहिती आयोगाने द्वितीय अपीलाचा निर्णय दिल्यानंतरच पुर्ण होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांना अर्धन्यायिक अधिकार आहे, त्यामुळे त्यांचे निर्णया विरुध्द अपील असल्याने कारण मिमांसा

देणारा निर्णय आवश्यक आहे. याची जाणिव त्यांना असणे आवश्यक आहे व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे अपेक्षित आहे.

४. असे असले तरी माहितीचा अर्ज दाखल करुन किंवा तक्रार दाखल करुन आज दीड वर्षाच्या वर कालावधी झालेला आहे व त्यामुळे सदरच्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी होऊन जो अहवाल तयार झालेला असेल किंवा निर्णय तयार झालेला असेल त्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना मिळाली तर त्यांचे समाधान होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.४.२००७ रोजी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी होऊन निर्णय झालेला असल्यास सदरच्या निर्णयाची प्रत म्हणजेच अहवाल अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२८६/२००७**

**१) श्री वाय.एस. देशभ्रतार,**
**सुगत भवन, कुंभारे नगर, तुमसर**
**पो.ता. तुमसर-४४१९१२, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त/प्रादेशिक संचालक,**
**(नगर पलिका प्रशासन), नागपूर विभाग, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ५.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुमसर यांचेकडे सन १९९४-९५ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"तुमसर नगर परिषद कार्यालयाचे पत्र क्रमांक तुन/साबा/५३, दि. ११.५.९४ अन्वये (१) भंडारा रोड जकात नाक्याचे बांधकाम (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाचे सभोवताल कंपाऊंड वॉल तयार करणे आणि (३) हुतात्मा स्मारकाचे सभोवताल तारेचे कुंपण तयार करणे या बाबतीत जी निविदा जाहिर/प्रकाशित करण्यात आली त्या संदर्भात:

(१) उपरोक्त कामे करण्यास तुमसर नगर परिषदेच्या मंजूरी संबंधाने (अ) विषय समिती/बांधकाम समितीने पारित केलेल्या ठरावाची प्रत. (ब) स्टँडींग समितीने पारित केलेल्या ठरावाची प्रत. (क) साधारण सभेने पारित केलेल्या ठरावाची प्रत.

(२) उपरोक्त कामांची अंदाजपत्रकिय किंमत ठरविण्यास जे एस्टीमेट तयार करण्यात आले त्या संबंधाने प्रत्येक कामाच्या खर्चाचे विवरण, याबध्दल माहिती द्यावी."

सदरची माहिती ही व्यक्त्‍ीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु, सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मात्र दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी माहितीचा अर्ज सुध्दा दाखल केला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्या प्रथम अपीलाचा निर्णय मात्र दिनांक २३.५.२०७ रोजी देण्यात आला असून आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ११.६.२००७ चा अर्ज कां दाखल केला असे विचारले असता, अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक ११.६.२००७ च्या अर्जामध्ये अधिक माहिती विचारली आहे. व त्यामुळे तोच अर्ज सुनावणीस घेण्यात यावा असे त्यांनी आयोगास सांगितले. त्या अर्जाप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २६.७.२००७ रोजी मुद्या क्रमांक २ व ३ चा दस्तऐवज प्राप्त न झाल्यामुळे आपणास माहिती पुरविणे शक्य होत नाही असे जे कळविलेले आहे त्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सदरचे काम हे नगर परिषदेचया माध्यमातून झालेले नाही, असे सांगितले व ते पुतळा समितीचे माध्यमातून झालेले आहे असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या कामाच्या संदर्भामध्ये स्थायी समितीचा ठराव आयोगाच्या निदर्शनास आणला. तसेच काढलेल्या निविदांच्या संदर्भामध्ये सुध्दा माहिती आयोगाचे निदर्शनास आणली. परंतु, तरीही जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यातील काम हे नगर परिषदेने केलेले नाही. असल्यास अपीलकर्ता यांना तपशिलात सविस्तर

उत्तर देणे आवश्यक होते. दस्तऐवज प्राप्त होत नाही, असे उत्तर दिल्यामुळे जन माहिती अधिकारी माहिती लपवित आहे असा त्यांचा अर्थ निघतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक २ व ३ चे बाबतची जी माहिती उपलब्ध असेल किंवा सत्य परिस्थिती जी असेल ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ११.६.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ व ३ च्या संदर्भामध्ये माहिती ही नगर पालिकेमध्ये शोध घेवून सत्य माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२८९/२००७**
**अपील क्रमांक २२९०/२००७**

**१) श्री राजेश हिरामण नितनवरे,**
**१०७, विंग-२, रजत संकुल, एस.टी. स्टॅन्ड जवळ,**
**नागपूर-४४००१८.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा डायरेक्टर,**
**महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र,**
**व्ही.एन.आय.टी परिसर, दक्षिण अंबाझरी रोड,**
**नागपूर-११.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र,**
**व्ही.एन.आय.टी परिसर, दक्षिण अंबाझरी रोड,**
**नागपूर-११.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ५.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ व १६.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २२८९/२००७ मध्ये दिनांक ३१.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी यांचेकडे सन १९९७-२००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

The officers of the Central Government, State Government, Public Sector Undertaking, Autonomus Body and all others semi-government

organizations are required to furnish annual property returns at prescribed intervals/by specified dates. Kindly supply certified copies of such property returns in respect of the following officers for the period mentioned against each.

१. Dr. A.K. Sinha, Director, MRSAC period from ३१.५.२००१ to ३१.१२.२००६

२. Mr. D.B.Deore, Admn.O.MRSAC period from १.१.१९९७ to ३१.१२.२००६

३. Mr. D.Dhar, Sr.Res.Sci. MRSAC period from १.१.१९९७ to ३१.१२.२००६

सदरची माहिती ही व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २९.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना वैयक्तिक माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व अधिनियमाचे कलम ८(१)(जे) प्रमाणे नाकारलेली आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.८.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योगय असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आल्याचे दिसून येते. व त्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपीलाच्या सुनावणी करीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

१. "The applicant Shri Rajesh Hiraman Nitnawre filed an application dated ३१.५.२००७ under RTI Act, २००५ for seeking Annual Returns of three officials of MRSAC. In response and being third party information therefore as per provision under RTI Act, २००५, the information Officer of MRSAC vide letter No.MRSAC/RTI-१८/१८-१,२ & ३/२००७ dated ५.६.२००७ sought consent of the third party in question for providing the information.

२. In response to the letter dated ५.६.२००७ of the Information Officer, all the three concerned officials, against whom the information was sought,

did not accord their consent for providing information with regard to annual property return. Accordingly, the Information Officer of MRSAC conveyed the Applicant vide letter No.MRSAC/RTI-१८/२००७/१११० dated २९.६.२००७ about non disclosure of the information being exempted under Rule ८-१(३).

३. Subsequently, the applicant filed an Appeal dated १६.७.२००७ before the First Appeallate Authority (FAA) of MRSAC and sought the Annual Property Returns of three officials of MRSAC.

४. It was observed that after the direction of the Hon'ble High Court in the Writ Petition No. १५६/२००३, Shri A.U.Pathrabe, Accounts Officer was allowed to join the duties at MRSAC on २.१२.२००६ and his status was kept under suspension. The process of taking decision in his case as per the direction of the Hon'ble High Court, Nagpur was in progress and during this period, Shri A.U. Pathrabe (dismissed Accounts Officer of MRSAC on fraudulent charges) and his colleagues/friends, (Shri R.H. Nitnaware and Shri Sunil Tayade) started submitting the application and till date they have together submitted ४१ applications and २१ appeals. In most of the case MRSAC has provided the information.

५. It is amply clear that the applicant and his colleagues/friends have filed the applications/appeals only at the behest and instance of Shri A.U.Pathrabe (dismissed Accounts Officers of MRSAC on fraudulent charges) for his purely personal interest and no public interest is involved at all. In few cases, it appeared that Shri Pathrabe has himself written the applications/appeals/letters and obtained the signatures of his colleagues/friends.

६. It was observed that the information sought by the Applicant was purely personal in nature and since the concerned officials did not consent for sharing the same and also since it does not involve public interest as per the Rule ८(१)(i) of the RTI Act, २००५, the information sought for was rejected by FAA, MRSAC.

७. It is also to mention that during the hearing of the second appeal of one Shri Tayade (colleague/friend of Shri A.U.Pathrabe/Shri nitnaware-applicant) held on २.५.२००८, the Hon'ble Commissioner issued orders to provide the documents to Shri Tayade by depositing the charges.

Accordingly, MRSAC initiated action for compilation of old voluminous record pertaining to १९९९-२००७ by engaging large number of office manpower and time and informed Shri Tayade to deposit the document charges for obtaining the information as per the order of the Hon'ble State Information Commissioner, Nagpur vide letter No.MRSAC/RTI-०६/६१५/२००८ dated ३१.५.२००८. The said letter was sent to Shri Tayade by speed post and the acknowledgement of receipt of the letter is on the record of MRSAC. However, Shri Tayade has not deposited the document charges with MRSAC so far.

८. This indicateds that the appellant is more interested in hampering the activities of MRSAC at the behest of the then Accounts Officer, who was dismissed from the services of MRSAC.

९. It also appears that the appellant has no public interest but merely at the instance of the then Accounts Officer, filing the applications/appeals for personal interest and to take revenge against few employees of

MRSAC by Shri A.U.Pathrabe and just to hamper the ctivities of MRSAC (kindly see enclosed Annexure-A)."

३. सदरच्या खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, श्री नितरवरे, अपीलकर्ता हे जी माहिती मागत आहे ती माहिती ही व्यापक जन हिताच्या दृष्टीने न मागता वैयक्तिक हितासाठी मागत आहे, असे दिसून येते. खुलाशामध्ये श्री ए.यु. पाठराबे, अकाऊंट ऑफिसर यांना निलंबित केल्यामुळे त्यांचे मीत्र म्हणून अशा प्रकारे अनेक अर्जाच्या माध्यमातून त्रास देण्याचे उद्येशाने ते माहिती मागत आहे असे दिसून येते. जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ज्या कारणामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे जे कळविले आहे त्या कारणांच्या गुणवत्तेच्या संदर्भामध्ये या अपीलाच्या माध्यमातून निर्णय देणे आवश्यक आहे असे वाटत नाही. मात्र, मागितलेली माहिती ही व्यापक जन हिताच्या दृष्टीने व वैयक्तिक आकसापोटी त्रास देण्याच्या हेतून माहिती मागत आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पारदर्शकता व जबाबदारी येण्याचे दृष्टीने, व्यापक जन हित साधण्याकरीता अपील करावयाचे असते. वैयक्तिक आकसाचा हेतू ठेवून माहिती मागण्याचा उद्येश तरतूदींचा निश्चितच नाही. अपीलकर्ता हजर असते तर त्यांना व्यापक जन हित काय, याबध्दल विचारता आले असते. परंतु, दिनांक १४.११.२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढून सुध्दा ते हजर नाहीत व त्यामुळे व्यापक जन हिताच्या दृष्टीने त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे शक्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २२९०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती ही जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी यांना मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"चिनार अपार्टमेंट, रामकृष्णनगर, नागपूर येथे MRSAC चा एक साधारण १२०० चौ.फुट क्षेत्रफळाचा प्लॅट आहे. हा साधारपणणे १९८९-९० मध्ये केन्द्राच्या संचालकाचा रहाण्याकरीता

विकत घेण्यात आला आहे व त्यांत मागील संचालक डॉ. अय्यंगार यांच्या मृत्यूपर्यंत राहात होते. हा फ्लॅट साधारण ६ ते ७ वर्षापासून रिकामा आहे असे समजते. तरी याबाबतीत खालील माहिती कृपया देण्यात यावी. (१) ही जागा कोणत्या अधिका-यांच्या राहाण्याकरिता घेतली गेली. (२) किती किंमतीला ती घेतली (३) MRSAC नियामक मंडळाने ही जागा विकत घेण्याकरिता मंजूरी दिली त्या मिटींगचे अजेंडा आयटेम नोट व मिनिटसची प्रमाणित प्रत देण्यात यावी. (४) जागा रिकामी असण्यास नेमका कालावधी व रिकामी राहण्याची कारणे (५) जागा रिकामी असण्याच्या कालावधीत करावा लागलेला दरवर्षीचा खर्च, जसे म्युनिसिपल ॲक्सेसण सर्व्हिस चार्जेसण विद्युत खर्च, पाणी करण मेंन्टेनंन्स चार्जेस इत्यादि. (६) फ्ल्ॅाट खाली असलेल्या कालावधीत संचालकांना देण्यात आलेला घरभाडे भत्ता. (७) या घरभाडे भत्याकरीता नियामक मंडळाची मंजूरी घेतल असल्यास त्याची माहिती व मिटींगची अजेंडा आयटेम नोट व मंजूरीचे मिनिटस यांची साक्षांकित प्रत." माहितीचा कालावधी १.७.२००० ते २८.७.२००७ असा आहे. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.७.२००७ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" In this connection, date wise explanation in the desired format is enclosed herewith for your kind perusal. Besides, the detailed reply is as under.

१. The applicant Shri Rajesh Hiraman Nitnaware filed an application dated २८.२.२००७ under RTI Act, २००५ for seeking information of flat at Chinar Apartment.

२. In response, the information officer of MRSAC vide latter No.dated २९.३.२००७ conveyed the applicant to deposit the charges of Rs. २६२/- including postal charges for obtaining the documents called for.

३. However, the applicant vide letter dated १७.४.२००७ changed the mode of obtaining the documents and desired to collect the information through a representative instead of receiving the documents by registered post.

४. MRSAC accepted request of the applicant for change of mode for collection of document and the applicant deposited an amount of Rs. १६२/-(excluding postal charges) on १७.४.०७ along with document charges for other three applications filed by him/his colleagues/friends under RTI Act.

५. In spite of submitting the documents charges for three applications at a time, MRSAC generated the documents and kept ready for collection by the applicant. However, till २१.४.२००७, the applicant did not collect the documents. Therefore, MRSAC sent letter dated १८/२२१.४.२००७ to the applicant informing him to collect the documents and thereafter he collected the documents on ३०.४.२००७. Hence there is no question of delay in supplying the documents.

६. It is observed that the applicant was provided with the document sought in his application dated २८.२.२००७ by the information Officer of MRSAC.

७. It appeared that the appeal dated ३०.६.२००७ was written by Shri A.U. Pathrabe (dismissed Accounts Officer of MRSAC on fraudulent charges) and the same was signed by the applicant. Even for depositing the charges for information against three applications, Shri Pathrabe himself wrote a letter which was signed by Shri Nitnaware. It amply shows that the applicant has filed the appeal at the behest and instance of Shri Pathrabe for his personal interest and not for any public interest.

८. In the first appeal, the Appellant sought few additional information/changed the contents of information, which were originally not sought in the application dated २८.२.२००७. It also appeared from the appeal that the Appellant has filed the appeal dated ३०.६.२००७ before the First Appellate Authority of MRSAC, which is beyond the statutory period of thirty days. Considering the above points and the available information being already provided by the Information Officer, the Appeal dated ३०.६.२००७ filed by the Appellant was rejected by FAA, MRSAC and the order dated १६.७.२००७ was issued to the Applicant.

९. It is, also noticed that after the direction of the Hon'ble High Court in the Writ Petition No. १५६/२००३, Shri A.U.Pathrabe, Accounts Officer was allowed to join the duties at MRSAC on २.१२.२००६ and his status was kept under suspension. The process of taking decision in his case as per the direction of the Hon'ble High Court, Nagpur was in progress and during this period, Shri A.U.Pathrabe, (dismissed Accounts Officer of MRSAC on fraudulent charges) and his colleagues/friends, (Shri R.H. Nitnaware and Shri Sunil Tayade) started submitting the application and

till date they have together submitted ४१ applications and २१ appeals. In most of the case MRSAC has provided the information.

१०. Further, it is to mention that during the hearing of the second appeal of one Shri Tayade (colleague/friend of Shri A.U.Pathrabe) on २.५.२००८, the Hon'ble Commissioner issued orders to provide the cocuments to Shri Tayade by depositing the charges.

Accordigly, MRSAC initiated action for compilation of old voluminous record pertaining to १९९९-२००७ by putting large number of office manpower and time and informed Shri Tayade to deposit the document charges for obtaining the information as per the order of the Hon'ble State Information Commissioner, Nagpur vide letter dated ३१.५.२००८, sent by speed post and the acknowledgement for receipt of the letter has been received by MRSAC. However, Shri Tayade has not deposited the document charges with MRSAC so far.

११. It seem that the appellant is more interested in hampering the activities of MRSAC at the behest of the then Accounts Officer, who was dismissed from the services of MRSAC than obtaining the information for public interest.

१२. It also appears that the appellant has no public interest but merely at the instance of the then Accounts Officer, filing the applications/appeals for personal interest and to take revenge against few employees of MRSAC by Shri A.U. Pathrabe and just to hamper the activities of MRSAC (kindly see enclosed Annexure-A)."

६. सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही व्यापक जन हिताच्या दृष्टीने नसून वैयक्तिक हिताने मागितलेली आहे असे दिसून येते. तसेच

पुन्हा त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने व त्रयस्थ पक्षाने ते पुरविण्यांत येवू नये असे कळविले असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी हया निश्चितच सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याकरीता पारित करण्यात आला आहे. परंतु, अपीलकर्ता व त्यांच्या मित्रांनी श्री अे.यु. पाठराबे यांचेकरीता अनेक अर्जांच्या माध्यमातून माहिती मागितलेली आहे. कलम ८(१)(ञ) प्रमाणे त्यात कोणतेही व्यापक जन हित दिसून येत नाही. तो निश्चितच अधिनियमाच्या तरतूदींचा गैरवापर आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २२८९/२००७ व २२९०/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२९१/२००७**

**१) श्री अनिल लक्ष्मण पानसरे तर्फे**
**ॲड.श्री प्रदिप बाबुलाल अग्रवाल,**
**C/o श्री प्रदिप अग्रवाल, २१०, अग्रसेन रोड,**
**गिरीपेठ, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**काटोल, ता. काटोल, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**त.सा.क्रं.५९, तलाठी कार्यालय, राऊळगांव,**
**ता. काटोल, जिल्हा नागपूर. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ५.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे अडॅ. श्री प्रदिप अग्रवाल हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा तलाठी, राऊळगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"१. गाव नमुना १ ते २१ (पुरक नोंद वहिसह) च्या १/०१/०१ ते २३/०४/०७ पर्यंतच्या प्रतीलीपी.

२. वरील कालावधीसाठी आपल्या कार्यालयात नियमीत ठेवलेल्या पिकांच्या नोंदवहीच्या प्रती.

३. नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्यातील आपल्या कार्यालयाच्या कार्य क्षेत्रामधील जमीनीवर परिणाम होणा-या नोंदणीकृत व्यवहाराचे नांदणी अधिका-यांचे वरील कालावधी करीता प्रत्येक महिन्याचे मासिक विवरण वहीचे प्रतिलीपी.

४. वरील कालावधी करीता प्रत्येक वर्षी ऑागस्ट महिन्यात तयार करावयाची ग्राम आदेर्श तक्ता याची प्रतिलीपी.

५. फेर फार करण्याकरीता नियम ९/१२ अंतर्गतची नोटीस तामील करण्याची जबाबदारी कोणाची? नोटीस तामील करण्याची पध्दत?

६. वरील कालावधीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १५४ नुसार किती प्रकरणात विक्रीपत्र नोंदविल्या नंतर फेर फार नोंदविण्यात आले नाही आणि त्याची कारणे?

७. वरील कालावधीमध्ये किती प्रकरणात शेतजमीन भो.वर्ग २ मध्ये असुनही विक्रीपत्र नोंदविण्यात आलेले आहे.

८. आपल्या कार्यालयीन कामकाजाचे वेळापत्रक आणि नागरिकांची सनदेची प्रत."

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने किंवा स्पिड पोस्टाने पुरविण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती आपणास पुरविण्यास तयार आहे. ही माहिती मिळण्यासाठीची पाने संख्या ६२०७ असून नियमानुसार अतिरिक्त शुल्क रुपये १२,४१४/- इतके आहे. सदर अतिरिक्त शुल्कांचा भरणा या कार्यालयास करावा किंवा नायब नाझर, तहसिल कार्यालय यांचेकडे दिनांक २६.५.२००७ पुर्वी करावा, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या पत्राच्या प्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी रुपये १२,४१४/- चा भरणा केलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दिनांक २२.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००७ रोजी एकुण पृष्ठ संख्या ६२०७ नसुन फक्त ४८१७ आहे. आपण माझ्याकडून जास्त रुपयाचा भरणा करुन घेतला हे योग्य नाही असा आक्षेप घेतलेला दिसून येतो. त्यावर पुन्हा दिनांक १७.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी खुलासा केलेला दिसून येतो. तो खालीलप्रमाणे आहे.

"विषयांकित संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपले दिनांक २३.४.२००७ चे अर्जान्वये आपणांस मापनमुल्याच्या प्रतिलीपीची पाने संख्या ६२०७ करीता नियमानुसार

अतिरिक्त शुल्क रुपये १२४१४/- अक्षरी बारा हजार चारशे चौदा रुपये आपण दिनांक २५.५.२००७ रोजी नायब नाझर तहसिल कार्यालय यांचेकडे केला. त्यानंतर सदर रेकार्डची झेरॉक्स कॅापीज करीता काटोल येथे नेवून झेरॉक्स काढण्यात येवून झेरॉक्स प्रती तयार झाल्यानंतर आपणास फोनवरुन संपर्क साधला असता आपण अर्जात नमूद केल्याप्रमाणे speed post द्वारे पाठवावे असे कळविले. हे खरे आहे. तसेच आपणांस रेकार्डचे झेरॉक्स प्रतिकरीता १२४१४/- रुपये भरणा करावयास कळविले होते, हे सुध्दा खरे आहे.

सदर रेकार्ड हा voluminous असल्यामुळे तपासता आला नाही. तसेच गांव नमुना आठ-ब हा झेरॉक्स करण्याकरीता त्या आकाराची झेरॉक्स मशिन काटोल येथे उपलब्ध नसल्यामुळे सदर नमुन्याचा रेकार्ड आपणांस पूरविता आला नाही. तसेच अपूर्ण रेकार्ड पाठविण्याची आपली तक्रार या पत्रावरुन दिसून येते. करीता सदर आपणांस पाठविण्यात आलेला रेकार्ड हा तपासून पाठविणे अशक्य असल्यामुळे सदर रेकार्ड (अपूर्ण असलेला/नसलेला) आपणांस तलाठी कार्यालय राऊळगांव येथे कार्यालयीन वेळेत बघावयास मिळेल. त्याकरीता आवश्यक सहकार्य मिळेल. यावरुन अपीलकर्ता यांनी सुध्दा संपूर्ण तलाठी कार्यालयामधील उपलब्ध असलेली सर्व माहिती मागितलेली असल्याने अशी माहिती कलम ७(९) प्रमाणे अपेक्षित नाही.

आपल्या पत्राप्रमाणे आपणांस ४८१७ माहितीची पाने संख्या पाठविण्यात आल्याचे आपण नमूद केले आहे. त्याबाबतचे नियमानुसार अतिरिक्त शुल्क रुपये ९६३४/- अक्षरी नऊ हजार सहाशे चौतीस रुपये पटले होते.

आपले कडून रुपये २७८०/- अक्षरी दोन हजार सातशे अंश्री रुपये जास्त भरुन घेतल्या गेले. तसेच या रकमेतून speed post चा खर्च  रुपये ३१०/- वगळता उरलेली रक्कम रुपये २४७०/- अक्षरी रुपये दोन हजार चारशे सत्तर रुपयेचे परताव्या करीता मा. तहसिलदार साहेब यांचेकडे अर्ज सादर करुन आपण त्यांचे परवानगीने नायब नाझर तहसिल कार्यालय काटोल यांचेकडून घेवून जावे." माहिती ही विलंबाने प्राप्त झाल्यामुळे तत्पुर्वीच दिनांक २९.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा हा विहित

मुदतीत दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे अशा प्रकारचे पूरसिस अपीलकर्ता यांनी दिलेले होते. अपीलाच्या सुनावणी दरम्यान ॲड.श्री प्रदिप अग्रवाल यांनी (अपीलकर्ता यांचे वकील) युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करण्याचे पत्र ३० व्या दिवशी त्यांना दिलेले असले तरी त्यांनी ४ थ्याच दिवशी खर्चाचा भरणा केलेला आहे. परंतु, त्यानंतर सुध्दा त्यांना माहिती विलंबाने मिळाली आहे. त्यातही मुद्या क्रमांक ३,७ व ८ ची माहिती त्यांना अजूनपर्यंत उपलब्ध झालेली नाही. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये दप्तरात उपलब्ध नाही, असे उत्तर दिलेले आहे. परंतु तोंडी खुलासा करताना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी असे सांगितले की, निबंधक यांचे कार्यालयाकडूनच त्यांचेकडे खरेदी विक्रीच्या नोंदीची माहिती आलेली नसल्यामुळे तसे उत्तर दिलेले आहे. मुद्या क्रमांक ८ मधील नागरिकांची सनद कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, नागरिकांची सनद ही सर्व तलाठी किंवा कनिष्ठ कार्यालयात शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. असे असले तरी तीनही मुद्यांच्या संदर्भात जी माहिती त्यांनी दिलेली आहे, ती योग्य आहे. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिली ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे ते विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी शेवटच्या दिवशी म्हणजे ३० दिवस पुर्ण झाल्यावर शेवटच्या दिवशी पत्र दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत अतिरिक्त खर्चाचा भरणा करता आला नाही. (अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे फी भरण्याची सूचना पाठविल्यापासून व फी चे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा, त्या पोट कलमा मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसाच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल, अशी तरतूद जरी असली तरी सुध्दा माहिती नंतर विलंबाने दिली असल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.) मात्र, अपीलकर्ता यांना दिनांक

२२.५.२००७ रोजी कळविले असल्यामुळे ते शास्तीस पात्र होणार नाही. विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे मात्र सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांनी मागितलेल्या माहितीच्या करीता भरणा केलेले अतिरिक्त शुल्क रुपये १२,४१४ ही रक्कम परत करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम परत करण्याकरीता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती प्रशासकिय कार्यवाही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सुरु करावी.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२९८/२००७**

**१) श्री डॉ. विजयकुमार नामदेवराव इंगळे,**
**बुराडे ले आऊट, देशमुख वाडी जवळ, शिवसेना चौक,**
**आलोडी, वर्धा, पो. मानस मंदिर, वर्धा, ता.जि. वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र. कुलगुरु,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ६.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी मा. कुलगुरु यांचे कार्यालयात "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, यांचेकडे सत्र २००३-२००४ बी.एड. प्रवेशा संदर्भात शिव वैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा येथे झालेल्या गैर प्रकाराची विद्यापीठाने केलेली चौकशी व त्यानुसार विद्यापीठाने तयार केलेला अहवाल, या अहवालाची सत्यप्रत मिळावी, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार" असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ५.६.२००७ रोजी "आपल्या मागणीप्रमाणे अहवालावर व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला नसल्यामुळे सद्यस्थितीत अहवालाची प्रत पुरविता येणार नाही," असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी डॉ. जी.एस. पाराशर, प्र-कुलगुरु यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.७.२००७ रोजी देण्यात

आला असून "व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतलेला नसल्यामुळे सद्यस्थितीत अहवालाची छायाप्रत पुरविता येणार नाही. ही बाब अर्जदाराला दिनांक ५.६.२००७ अन्वये निर्धारित कालावधीत कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अपील खारीज करण्यात येत आहे." सदरच्या याही निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी, "आज २००७ साली मी जो अहवाल मागत आहे तो अहवाल सत्र बी.एड. प्रवेश प्रक्रिया २००३-०४ सालचा आहे. त्याचकाळात रातुमनाविद्यापीठाने शिव वैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा संबंधित गैरकृत्यांचा अहवाल प्रदर्शित केला असता तर संस्थाचालकाचे खोटे स्वरुप उघड झाले असते व त्यांच्या विरुध्द कायदेशिर कार्यवाही केली असती. तो अहवाल प्रसिध्द न केल्यामुळे संस्थाचालक मनमानी करण्यास मोकळे झाले. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये संस्थाचालकांनी कर्मचा-यामार्फत खाडाखोडी करुन प्रवेश याद्या बदलविल्या. या प्रकारास प्राचार्य म्हणून मी आक्षेप घेतला तरीही हा प्रकार जबरदस्तीने संस्थाचालकांनी केला," अशा प्रकारचे कारण त्यांनी दिलेले आहे. "घटनेला ४-५ वर्ष होऊनही व्यवस्थापन परिषद निर्णय घेत नाही व त्यामुळे सदरच्या अहवालाची प्रत मला उपलब्ध होणे आवश्यक आहे. कोर्टात माझ्यावर चालु असलेल्या केसचा आत्मा हा अहवाल आहे. संस्थाचालक व अन्य यांनी केलेली गैरकृत्ये या अहवालामुळे स्पष्ट होईल. माझेवर लादलेले आरोप कितपत खरे कितपत खोटे हे कळेल. मला कामावर येण्यास अडथळे आणणे, माझा पगार जुलै, २००३ पासून आजपर्यंत रोखला तो मिळण्यास मदत होईल," अशी विनंती केलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेले नसल्यामुळे सदरचा अहवाल अंतिम झाला नसल्यामुळे अहवालाची प्रत दिलेली नाही. परंतु, अपीलकर्ता यांचे वर नमूद केलेल्या कारणांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अशा प्रकारचा अहवाल हा वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणे हे योग्य नाही व त्यामुळे सदरच्या अहवालाची प्रत जशी

आहे तशी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी दिनांक ४.५.२००७ च्या अर्जात मागितलेल्या अहवालाची जशी आहे तशी छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३०३/२००७**
**अपील क्रमांक २४५९/२००७**

**१) श्री संजय दत्तात्रय जोशी,**
**रा.सुटाळा खुर्द, ता.खामगांव,**
**जी.एस.कॅालेज, खामगांव, पो.ऑफिस ता.खामगांव,**
**जिल्हा बुलढाणा-४४४३१२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**बुलढाणा. जि. बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**खामगांव, ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ८.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता उशिरा हजर आहे. उत्तरवादी- जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रतिनिधी मात्र पी.एस.आय.यांना पाठविले आहे, ते उशिराने हजर झाले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कागदपत्रे दाखल केली नाहीत.

२. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००८ रोजी दोन पत्रामधून सदरचे अपील सुनावणीस घेण्यात यावे असे आयोगास पत्र दिलेले दिसून येते. आयोगाने दिनांक १५.११.२००८ रोजी सदरच्या अपीलाच्या सुनावणीची नोटीस काढून दिनांक ८.१२.२००८ रोजी म्हणजे आज अपीलाची सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. परंतु, अपीलकर्ता मात्र आज हजर झाले नाही. तसेच जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव हे सुध्दा हजर नाही व खुलासा सुध्दा दाखल केलेला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस

अधीक्षक, बुलढाणा यांच्या कार्यालयातून सुध्दा कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेले नाही. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक २३.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. व हे दोनही द्वितीय अपीले ही प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक १५.५.२००७ च्या निर्णया विरुध्द आहे. दोनही अपीलामध्ये माहितीचा अर्ज हा दिनांक १६.४.२००७ चा आहे. व दोनही अर्जामध्ये एकच माहिती मागितलेली असून एकाच अर्जाची छायांकित प्रत आहे. प्रथम अपील सुध्दा दिनांक ३.५.२००७ रोजी दाखल केले असून दोनही प्रथम अपीलाच्या अपील मेमोच्या छायांकित प्रती एकच आहे. व त्यामुळे सदरची अपील जरी दिनांक २९.१२.२००७ रोजी सुनावणीस ठेवण्यात आलेले असले तरी आज सुनावणीस एकत्रित घेण्यात आलेले आहेत.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांना तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीकरीता दिनांक १५.११.२००८ रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढून सुध्दा त्यांनी आयोगाच्या नोटीसची कोणतीही दखल घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळे आयोगाचा अवमान केलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हे जबाबदार अधिकारी असून सुध्दा व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असून सुध्दा आज आयोगापूढे हजर नाही. व त्यामुळे त्यांना सक्त ताकीद देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाचे कार्यालयात दाखल करणे आवश्यक असते अन्यथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही असाच अर्थ हा अपीलकर्त्यांच्या अपील मेमो मधून दिसून येण्याची शक्यता आहे. परंतु, या प्रकरणी अपीलकर्ता यांनीच सर्व कागदपत्रे दाखल केलेली आहे. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी कार्यालयातून सदरची कागदपत्रे दाखल करणे आवश्यक असते, याची नोंद प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांच्या कार्यपध्दतीबध्दल पोलीस महासंचालक यांना कळविणे आवश्यक राहील.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी एकुण अ ते त या मुद्यांवर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी उपविभागीय

पोलीस अधिकारी श्री जे.बी. डाखोरे यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यापुर्वीही त्यांनी दिनांक २१.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे त्यांच्या तक्रारीबाबत निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु, सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.५.२००७ रोजी देण्यात आलेला आहे व त्यात "मुद्यांच्या अनुषंगाने माहिती पुरविलेली नाही, तरी ती पुरविण्यात यावी," असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दिनांक ५.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अ ते त या मुद्यांबाबत मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक ८.६.२००७ रोजी त्यांनी तक्रार दाखल केलेली दिसून येते व त्या तक्रारीवर कार्यवाही सुरु आहे, असे कळविलेले दिसून येते.

५. वास्तविक, अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.४.२००७ च्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भात जी चौकशी झाली आहे, जो निष्कर्ष अपीलकर्ता यांना दिनांक २१.३.२००७ रोजी कळविण्यात आलेला आहे तो त्यांना दिसून येत नाही. अपीलकर्ता यांच्या तक्रारीवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी केलेली तक्रार ही फौजदारी स्वरुपाची नसून ती दिवाणी स्वरुपाचा वाद दिसून येतो. तसेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये खोटया तक्रारीची चौकशी कोणत्या नियमान्वये करता येते, असे विचारलेले आहे. परंतु, तक्रार सुरुवातीला खोटी नसते तर चौकशी केल्यानंतरच ती खरी किंवा खोटी हे निष्पन्न होते. त्यामुळे अपीलकर्ता हे सुरुवातीलाच स्वतःच तक्रार खोटी आहे असा निष्कर्ष काढून माहिती मागत आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल, उदा. कागदपत्रे, दस्तऐवज, टिपण्या, अभिलेखे इ. स्वरुपाची छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात जी चौकशी केलेली आहे, त्या चौकशीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे, अपीलकर्ता यांना वेळोवेळी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व माहिती अधिकारी यांनी दिनांक

३०.४.२००७ रोजी विहित मुदतीत कळविले आहे, ते योग्य असल्यामुळे सदरची दोनही अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे व त्याप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची दोनही अपील खारीज करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव हे राज्य माहिती आयोगापुढे सुनावणीस विना अनुमती गैरहजर राहील्यामुळे त्यांना ताकिद देण्यात येत आहे व सदरची बाब ही त्यांच्या गोपनिय अहवालात नोंद घेण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३०८/२००७**

**१) श्री  अशोक गजाननराव कळसकर,**
**मेन रोड, पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी  तथा उपवनसंरक्षक,**
**पांढरकवडा वनविभाग, पांढरकवडा, जि. यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक(वने),**
**वनविभाग, पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ८.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी २१.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांचेकडे "पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे पत्र क्रमांक पा.ओ./अकब्यु/अप/विचौ/यवतमाळ ०५/२५२७, दि. १०.१०.२००५ प्राप्त झाले काय. असल्यास त्या पत्राची साक्षांकित प्रत असल्यास आपल्या कार्यालयाकडून श्री के.एम.पोहणकर, लिपिक यांना दिलेले ज्ञापन असल्यास त्यावर श्री के.एम.पोहणकर यांनी दिलेले स्पष्टीकरण असल्यास त्यावर आपण घेतलेला निर्णय व पो.अ.ॲ.क.ब्यु.अमरावती यांनी पाठविलेला अहवाल या सर्व पत्र व्यवहाराची साक्षांकित प्रती," अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.५.२००७ रोजी "संदर्भिय अर्जाचे अनुषंगाने आपण महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये या कार्यालयास अर्ज

सादर केला होता. तरी माहितीचा अधिकार प्रकरण २ मधील ८(ग) नुसार माहिती पुरविता येत नाही," असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक, वन विभाग यवतमाळ यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक ६.७.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कामय करण्यात आलेला आहे व सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाचे कलम ८(ग) चा आधार कां घेण्यात आला असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, ती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व श्री किशोर पोहणकर, लिपिक यांनी सदर माहिती ही माझ्या जीविताशी अत्यंत महत्वाची असून भविष्यात माझ्या जिवितास माहिती दिल्यापासून धोका संभवतो. तरी माझी अशी विनंती आहे की, सदर माहिती संबंधीतांना देण्यात येवू नये, असे उपवनसंरक्षक यांना कळविलेले दिसून येते. परंतु श्री किशोर पोहणकर यांना अपीलकर्ता यांनी माहिती मागितली होती, अशा प्रकारचा पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी यांनी कलम ११ प्रमाणे केलेला दिसून येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी व लिपिक मिळून अशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. वास्तविक, सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे दोषी आढळून येतात. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास ते सेवा निवृत्त झाल्यामुळे हजर नाहीत. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता येत नाही व अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास ते सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात अर्थ नाही. परंतु, अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये ज्या प्रमाणे प्रक्रिया केलेली आहे, ती प्रक्रिया ही अत्यंत निष्काळजीपणे हाताळलेली आहे व याबाबत मुख्य वनसंरक्षक(प्रादे.), यवतमाळ यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतूदींचे प्रशिक्षण देणे आवश्यक दिसून येते.

४. असे असले तरी अपीलकर्ता यांना सदरची माहिती आता उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २१.३.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) सदरच्या निर्णयाची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३१८/२००७**

**१) श्री प्रितमसिंह उल्हाससिंह चव्हाण,**
**अनुश्री बिल्डींग क्वा.नं.१, कांतानगर,**
**अमरावती.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**समाज कल्याण संचालनालय, म.रा.पुणे-१**

**३) जन माहिती अधिकारी,**
**विभागीय समाज कल्याण कार्यालय,**
**विभायीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**व्ही.एम.व्ही.कॅालेज रोड, राठी नगर, अमरावती.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १०.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांचकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"(एक) "राजपुत भामटा" जा.प्र.चे रेकार्ड वरील मुळ यादी (इंडेक्स) ची छायांकित सत्यप्रत मिळणे करीता.

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी दिनांक २२.९.२०००

स.क.संचालनालय, पुणे येथून विभागीय जा.प्र.प समिती अमरावती विभाग, अमरावती यांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या "राजपूत भामटा" आ.प्र.च्या रेकार्ड वरील जाती प्रमाणपत्र

देण्यात आलेल्या व्यक्तींच्या नांवाच्या यादी (इंडेक्स)च्या मुळ प्रतीची छायांकित सत्यप्रत मिळणे करीता

(चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यक्तीश हवी आहे -व्यक्तीश:"

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१०.२००६ रोजी उप संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांना अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती अर्जाद्वारे करण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी खुलाशात म्हटले आहे व तोंडी सुध्दा सांगितले आहे. परंतु, अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. विहीत मुदतीत अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. परंतु, त्यानंतर समाज कल्याण संचालयाने प्रथम अपीलीय अधिकारी हे अमरावती येथे आहे, असे अपीलकर्ता यांना कळविले असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. वास्तविक, ज्या जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी माहीती मागितलेली होती, त्यांनी सदरची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही म्हणून दिनांक ६.१०.२००६ रोजी माहिती ही मुख्यालयात उपलब्ध असल्यामुळे अपीलकर्ता यांनी पत्राच्या आधारे संबंधीतास पुरविण्याची याद्वारे विनंती करण्यात येत आहे असे कळविलेले असल्यामुळे उप संचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय यांनी सदरच्या पत्राचे अनुषंगाने दखल घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे होता. परंतु, त्याऐवजी दिनांक १७.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना उपरोक्त संदर्भाकिंत विषयानुसार जात प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व्यक्तींची नांवे अमरावती विभाग, अमरावती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांना पाठविण्यात आली नाही. प्रलंबित प्रकरणाबाबत नस्ती अमरावती जात पडताळणी समिती यांना पाठविण्यात आली आहे. सदर्हु, नस्तीची छायांकित प्रत ही संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती यांना पाठविण्यात येत आहे. तरी सदर्हु नस्तीच्या यादीची छायांकित प्रत अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे उप संचालक, समाज कल्याण संचालनालय यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक

२५.१.२००७ च्या माहितीच्या अर्जानुसार कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रत संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांना अग्रषित केलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्या पत्राप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. समाज कल्याण संचालनालय या कार्यालयाचे दिनांक १५.११.२००८ रोजीची नोटीस गेल्यानंतर त्यांनी या कार्यालयास विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय हे प्रत्येक विभागाच्या स्तरावर कार्यरत आहेत. माहितीच्या अधिकाराखाली जन माहिती अधिकारी हे प्रत्येक कार्यालयातील संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती हे असून त्यांचे प्रथम अपीलीय अधिकारी हे अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तथा अतिरिक्त आयुक्त/अप्पर जिल्हाधिकारी संबंधीत महसुल विभाग हे आहेत. या संदर्भातील या संचालनालयाचे परिपत्रक दिनांक ११.१०.२००५ चे अवलोकन व्हावे असे कळविले आहे. असे जरी असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे आहे परंतु, जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची नस्ती नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांना पुन्हा पुन्हा विचारले असता त्यांचेकडे माहिती उपलब्ध नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे संचालक समाज कल्याण यांनी जबाबदारी स्विकारुन सदरची माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारे कार्यवाही करणे आवश्यक राहील. अन्यथा अधिनियमाचे कलम १८(२)(३) प्रमाणे संचालनालय, समाज कल्याण यांचे संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देण्याचे आयोगास भाग पडेल किंवा अधिनियमाचे कलम १९(८)(ग) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक होईल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी मागितलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून संचालक, समाज कल्याण यांनी ३० दिवसांचे आंत माहितीचा शोध अमरावती येथील कार्यालयात सुध्दा घेवून विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे-१ यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३२०/२००७**

**१) श्री लक्ष्मण तानका देवरे,**
**अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ,**
**८५, नवीपेठ, जळगांव-४२५००१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग,**
**गडचिरोली. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १०.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे सुध्दा दाखल केली नाहीत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले व क्रांति ज्योति सावित्री बाई फुलेंचे ४०x५० से.मी.आकाराचे रंगीत शासकीय फोटो आपल्या कार्य क्षेत्रातील शासकिय, निमशासकिय कार्यालये, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ग्राम पंचायती व प्राथमिक आरोग्य केंद्र पैकी किती ठिकाणी लागलेले नाहीत.

माहितीशी संबंधीत कालावधी- ६.१०.९३ ते दि. ३१.१२.२००६

(१) वरील कालावधीत शासकिय मुद्रनालयाकडे किंवा शासकिय डेपोकडे आपण महात्मा ज्योतिराव फुले व क्रांति ज्योतिसावित्रीबाई फुलेंचे किती फोटांची मागणी शासकिय मुद्रणालयाकडे मागणी केली होती. त्याचा

(२) तपशिल ४०x५० आकाराचे रंगीत शासकिय फोटो किती ठिकाणी लागले नाहीत त्यांची पूर्ण पत्ता व फोन नंबरसह यादी मिळावी."

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.३.२००७ रोजी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार तरतुदीनुसार सत्य प्रत आकारणी शुल्क रुपये व टपाल खर्च रुपये ३०/- (अक्षरी रुपये तीस ) या कार्यालयात भरणा करावे. तसेच निमशासकिय कार्यालय व माध्यमिक शाळेच्या बाबत आपणास हवी असलेली माहिती संबंधीत संस्थाकडून प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १०.४.२००७ रोजीचे पत्राप्रमाणे अपीलाची सुनावणी दिनांक १७.४.२००७ रोजी ठेवण्यात आली आहे. तसेच दिनांक २१.४.२००७ च्या पत्राप्रमाणे दिनांक २७.४.२००७ ला सुनावणी ठेवण्यात आली आहे, असे कळविण्यात आले. परंतु, अपीलकर्ता हजर नसल्यामुळे दिनांक ७.५.२००७ रोजीचे पत्रान्वये अपीलकर्ता यांना, प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी, आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये या कार्यालयाचे पत्र दिनांक ३.५.२००७ नुसार सर्व संबंधीत कार्यालय प्रमुखांना कळविण्यात आलेले आहे. सोबतच माहितीच्या अधिकाराखाली केलेला आपला अर्ज दिनांक २.२.२००७ चा अर्ज सुध्दा त्यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. वरील सर्व माहिती अधिका-यांची यादी पत्यासह यासोबत जोडलेली आहे, असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. मात्र, प्रत्येक खाते प्रमुखास व सर्व अधिका-यांना दिनांक ३.५.२००७ चे पत्र पाठविल्याची प्रत दाखल करण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी ज्या शासन निर्णयाचा आधार घेतलेला आहे, ते शासन निर्णय १९६९ व त्यानंतर १९९३ व २०००

या वर्षातील आहे. त्यांचे अवलोकन केले असता संपूर्ण जबाबदारी ही जिल्हा परिषदेवर टाकण्यात आलेले दिसून येत नाही. मात्र, शासन निर्णयाच्या प्रती हया जिल्हा परिषदेसह सर्व कार्यालयांना त्या त्या वेळेस अग्रेषित केलेल्या दिसून येतात. यावरुन सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे त्या त्या कार्यालयांना, शिक्षण संस्थांना आदेश देणे क्रमप्राप्त होते. परंतु, त्याबाबतची संकलीत करुन देण्याची किंवा तपासण्याची अंतिम जबाबदारी मात्र जिल्हा परिषदेवर दिसून येत नाही. व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांचेकडे एकत्रित संकलीत केलेली माहिती दिसून येत नाही. व अशा प्रकारची माहिती संकलीत करणे सुध्दा अति व्यापक असे काम आहे. माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास अधिनियमाच्या कलम ५(१) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन माहिती अधिकारी हे नियुक्त करण्याची तरतूद आहे व त्याप्रमाणे शासन कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक कार्यालये, शिक्षण संस्था हे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्या ठीकाणी माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. "**माहिती**" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे माहिती याचा अर्थ, सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल उदा. कागदपत्रे, दस्तऐवज, टिपण्या, अभिलेखे इ.च्या स्वरुपात असलेल्या कागदपत्रांच्या/दस्तऐवजांच्या किंवा अभिलेख्यांची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा आहे. माहिती संकलीत करुन देणे असा नाही. तसेच अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे ज्या सार्वजनिक प्राधिकरणात माहिती असेल, त्याच सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ती मागणे अपेक्षित आहे. व त्यामुळे संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये ज्या ज्या कार्यालयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती अपेक्षित आहे, त्या त्या कार्यालयामधील जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी माहिती मागणे अपेक्षित आहे.

४. असे असले तरी, अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये किंवा सदरच्या शासन निर्णयाची अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये दिनांक ३.५.२००७ रोजी सर्व शैक्षणिक संस्थंना शासन निर्णयाप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोच्या प्रतिमा लावण्याचे आदेश देण्यात आलेले असून सदरची माहिती ही परस्पर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी, असे कळविलेले दिसून येते. जिल्हा परिषदेने माहिती संकलीत करावयाची असल्यास सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी

लागेल व अधिनियमाच्या कलम ७(९) प्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना त्या त्या जन माहिती अधिकारी यांचेकडून ती माहिती उपलब्ध होऊ शकेल, त्याकरीता पुन्हा जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक प्राधिकरणांना म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा संबंधीत संस्थांना/कार्यालयांना अपीलकर्ता यांना विशिष्ट मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश देणे उचित होईल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणांना पुन्हा आदेश देवून अपीलकर्ता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश देण्यात यावे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३२२/२००७**

**१) श्री फैजान अख्तर व अब्दुल खालीफ,**
**हन्डी ओली, गुजरी बाजार कामठी, ता.कामठी**
**जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,**
**राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळा, कामठी,**
**कालभैरव मंदिर के पास, नयाबाजार, ता.कामठी,**
**जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**राष्ट्रीय उर्दू प्राथमिक शाळा, कामठी,**
**काल भैरव मंदिर के पास, नया बाजार कामठी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिक, राष्ट्रीय उर्दू प्राथमिक शाळा, कामठी यांचेकडे खालीलप्रमाणे सन २००० ते २००७ च्या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"(१) आप की शाला में नजमा बेगम शिक्षिका के रुप में कब से कार्यरत है तथा वे किस कक्षा को पढाती है. नियुक्ती पत्र की सत्यप्रत चाहिये.

(२) नजमा बेगम को कितनी पगार दी जाती है. उसका प्रमाण दे.

(३) आप की शाला में कार्यरत सभी शिक्षक कर्मचारी की २००० से २००७ तक की मस्टर रोल की सर्टीफाई कॅापी चाहिये.

(४) २००० से २००७ तक सिनियारीटी लिस्ट की सर्टीफाई कॅापी.

(५) शासन द्वारा प्रदान २००० से २००७ तक का सेक्शन व स्टाफ अपरुवल, १ ली से सातवी तक वर्ष २००७-०८ में पहली से सातवी तक आप के महा वर्गवार, टुकडीवार कितने विद्यार्थी और कितने शिक्षक है, इनकी संपूर्ण माहिती."

सदरचा अर्ज अपीलकर्ता यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेला होता. परंतु, पोस्टमनने दिनांक ८.८.२००७, १०.८.२००७, ११.८.२००७, १३.८.२००७, १४.८.२००७, १६.८.२००७ या तारखांना सुध्दा शाळेमध्ये कोणीही घेतलेला नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना परत पाठविण्यात आलेला आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी संस्थेचे अध्यक्ष यांचेकडे अपीलीय अधिकारी म्हणून तीच माहिती मागण्याकरीता अपील दाखल केले होते. परंतु सदरचे अपील सुध्दा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आलेले असल्यामुळे ते स्विकारलेले नाही, असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्याकरीता त्यांनी पोस्टाचा पुरावा दाखल केला आहे. त्यानंतर मात्र त्यांनी सदरचा अपील अर्ज हा शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठवून शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज हा शाळेचे माहिती अधिकारी यांना दिनांक १०.९.२००७ रोजी पाठविलेला दिसून येतो. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी एकुण तीन अर्ज केलेले असल्यामुळे सदरच्या अर्जाच्या कार्यवाहीच्या बाबत संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांना त्यांच्या इतर अर्जाच्या संदर्भात सुध्दा संस्थेकडे माहिती उपलब्ध आहे, घेवून जावी, असे चार वेळा कळविण्यात आलेले दिसून येते. त्या पत्रांच्या प्रती दाखल केलेल्या आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ७.८.२००७ च्या किंवा दिनांक २१.८.२००७ च्या

अपील मेमो प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.८.२००७ च्या अपील मेमो वरील माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३२९/२००७**

**१) श्री  भानुदास भिमराव पातोडे,**
**मु.तामशी, पो. बटवाडी, ता.बाळापूर,**
**जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन अकोला, ता.जि. अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आगार व्यवस्थापक,**
**राज्य परिवहन महामंडळ, अकोला, ता.जि.अकोला.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत.  जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री पी.डी. पीतळे, लेबर ऑफिसर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी जिल्हा आगार व्यवस्थापक, अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"१) प्रत्येक गाडीने वापरलेल्या ऑईल व डिझेल नोंदणी रजिस्टरच्या साक्षांकित सत्यप्रती. (२) रोख नोंदवही, नोंदवही व देयकांच्या नोंदी टोकनाच्या साक्षांकित सत्यप्रती. (३) साठा व पुरवठा रजिस्टरच्या साक्षांकित सत्यप्रती. (४) व्हाऊचर बुकाच्या साक्षांकित सत्यप्रती (५) प्रोसिडींग बुकाच्या साक्षांकित सत्यप्रती (६) अंकेक्षण व लेखा परिक्षण अहवालाच्या साक्षांकित सत्यप्रती (७) खरेदी केलेल्या व वापरण्यात आलेल्या मालाचे वर्णन, संपूर्ण तपशिल व बिलाच्या साक्षांकित सत्यप्रती."

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी विभागीय नियंत्रक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ४.७.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये सार्वजनिक हिताशी संबंधीत असलेली माहिती देण्याची तरतूद आहे. आपण मागितलेली माहिती ही सार्वजनिक हिताशी संबंधीत नाही. सदर माहितीचा सार्वजनिक हिताशी काहीही संबंध नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदी नुसार ८ (ञ) अन्वये सार्वजनिक हिताशी संबंध नाही अशी माहिती देण्यास बंधनकारक नाही. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहिती मागताना ती मोघम मागितलेली असून अतिशय व्यापक प्रमाणात ती मागितलेली आहे व त्यातही ती दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र दाखल करुन मागितलेली आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही दोन डेपो मधील असून ९० गाडयांची माहिती आहे. व ती अतिशय व्यापक प्रमाणात असून रजिस्टर हे दुप्पट अशा आकाराचे आहे. त्यामुळे झेरॉक्स करण्यासाठी प्रति पृष्ठ ७/- रुपये असे एकुण ३०,०००/-(तीस हजार फक्त )खर्च येऊ शकतो व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तरतूद नाही व त्यामुळे सदरची माहिती ही ८(ञ) प्रमाणे देता येणार नाही असे उत्तर दिलेले आहे. वास्तविक अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाची प्रशासकिय यंत्रणा ही माहिती उपलब्ध करण्यास प्रमाणा बाहेर वळवावी लागत असल्यामुळेच व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही, व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३२७/२००७**

**१) श्री सागर सुर्यभान खंडारे,**
**मु.पो.कसुरा, ता.बाळापूर, जि.अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ,**
**पंचायत समिती, बाळापूर, जिल्हा अकोला.**
**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय, कसुरा, ता.बाळापूर, जि. अकोला. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री बी.पी. पजई, विस्तार अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी ग्राम सचिव, ग्राम पंचायत कसुरा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"ग्रा.पं. कसुरा २००६-०७ अंतर्गत कोणत्या योजना राबविण्यात आल्या व कोणत्या कामासाठी संपूर्ण योजनेचा खर्च किती झाला तसेच बारावती आयोजांचा निधी किती आला व खर्च कोणत्या कामासाठी केला. आजपर्यंत ग्रा.पं.ला कोणकोणता निधी आला व कोणत्या कामासाठी खर्च झ ाला त्या खर्चाची तपशील माहिती आतापर्यंत हया योजनांवर अदा केलेल्या देयकाच्या झेरॉक्स प्रती दयावे व दलित वस्तीत किती निधी कोणत्या कामासाठी खर्च केला, हयाची तपशिल माहिती दयावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.५.२००७ रोजी माहितीचा खर्च, लेखा परिक्षण खर्च व इतर खर्च असे एकुण १४७०/-रुपये भरणा करावे व कागदपत्रे घेवून जावे असे कळविण्यात

आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांचेकडे सचिव हे दिनांक ३०.५.२००७ पासून आज तारखेपर्यंत कार्यालयात हजर नाहीत व मागितलेली माहिती देण्यास तयार नाहीत असे यावरुन निश्चित होते. तसेच इतरही आक्षेप त्यांनी घेतलेले दिसून येते. त्यावर दिनांक ११.६.२००७ रोजी आपण माहिती मागितलेली असता काही काम अपूरे असल्यामुळे मला २-३ दिवसाचा कालावधी देण्यात यावा, करिता अर्ज दिला आहे. आपण दिनांक ११.६.२००७ रोजी हजर असताना बॅगेत देयकाच्या छायांकित प्रती उपलब्ध नसल्यामुळे आपणास माहिती देता आली नाही असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक २७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असेच दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील व सदरच्या माहितीचा खर्च हा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सोसणे आवश्यक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३०.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देयात यावी.

२) सदरची माहिती ही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांनी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरच्या माहितीचा येणार रुपये १४७०/- खर्च व पोस्टाचा खर्च हा त्यांनी स्वतः करावयाचा आहे. व सदरच्या खर्चाची वसुलीची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८७/२००७**

**१) श्री सुभाषचंद्र केशव कोगजे,**
**कनक प्लॉट नं.१३३, गोकुळपेठ, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**नागपूर महानगरपालिका नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी,**
**धरमपेठ झोन, महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली नाहीत. सहाय्यक माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून झोनल ऑफिसर, धरमपेठ झोन, महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"सौ. नलिनी केशवराव जाधव यांचे प्लॉट नं. १३४ वरील घरांत सन २००५ नंतर झालेल्या बांधकामामुळे जे अनाधिकृत असल्याबध्दल आपण आपले कार्यालयाचे क्रं.३४९/एस.डी.ओ/OW झोन-II दि. २४.११ मध्ये प्लॉट नं. १३४ वाल्मिकी नगरचे वर निर्देशीत मालकाला आपल्या नोटीस मध्ये कोण कोणता भाग अनाधिकृत बांधला गेला म्हणून कळविले आहे, त्याचा कृपया तपशिल द्यावा. कारण हयापैकी काही बांधकामाचा माझे स्वास्थ्यावर व आर्थिक परिस्थितीवर

अनावश्यक परिणाम होत आहे. व प्रवर्तन अधिका-यांनी मालकाना नोटीस आपले कार्यालयाकडून पोहचली नाही असे कळविले आहे. तरी वरील नोटीसची सत्यप्रत तपशिलासह देण्याची कृपा व्हावी व त्याचे घराचे नवीन बांधकामाच्या नकाशाची प्रत द्यावी."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक २८.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.४.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ८ दिवसांचे आंत द्यावी, असे आदेश देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उलपब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा झोनल ऑफिसर धरमपेठ यांचेकडे केलेला असल्यामुळे त्या कार्यालयातील संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज हा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी वर्ग केलेला आहे असेच त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी सुध्दा माहिती अधिकारी हे हजर नव्हते असे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिसून येते व त्यावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी हे अतिशय बेजबाबदार आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या कार्यालयातील प्रथम अपीलाच्या सुनावणीचे कागदपत्र दाखल केले नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालय सुध्दा अतिशय बेजबाबदार आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबध्दलचा खुलासा त्यांनी आज हजर नसल्यामुळे १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा, त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती ही कायम होईल.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा आयोगाचे नोटीस प्रमाणे त्यांचे कार्यालयातील कागदपत्रे दाखल केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकिय कारवाई आयुक्त, महानगरपालिका यांनी करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे, पोस्टाने आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावी

५) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३४७/२००७**

**१) श्री शंकर लक्ष्मण गवई,**
**रा.बोरखेडी, ता. रिसोड,**
**जिल्हा वाशिम-४४४५०६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा,**
**जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,**
**अकोला.**
**३) जन माहिती अधिकारी तथा,**
**सहाय्यक जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,**
**अकोला.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १५.१२.२००८ )**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. बी.टी. पारवे यांनी वकीलपत्र सादर केले आहे. परंतु ते सुध्दा सुनावणीस गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, अकोला हजर नाही पण प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी "योगायोग मत्सव्यवसाय संस्था बोरखेडी या संस्थेचे नोंदणी करीता सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रती नोंदणीपत्र त्यासाठी लागणा-या निकशाचा अहवाल तसेच त्याच्या सर्टिफाईड नकला मिळण्याबाबत" माहितीचा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.३.२००७ रोजी नोंदणी निकषाची प्रत पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच मत्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. या संस्थेचे आपण सभासद नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११ अन्वये संबंधीत संस्थेच्या मुख्य प्रवर्तकास सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पदुम), अकोला यांना नोटीस पाठवून निवेदन सादर करण्यास त्यांना

कळविलेले आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११ अन्वये त्या संस्थेची माहिती आपणास द्यावी किंवा कसे याबाबत त्या संस्थेच्या पदाधिका-याला लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्याची संधी देण्यात आल्याशिवाय ही माहिती प्रकट करणे शक्य नाही. करिता, आपण सदर संस्थेशी संपर्क साधून आपणास हवी असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी. नंतरच आपण मागितलेल्या माहितीचा विचार करता येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यात कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना आतापर्यंत दिलेली नाही, असे नमूद केलेले दिसून येते. परंतु, प्रथम अपील, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे पर्यंत आलेले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने जे उत्तर दिलेले आहे ते दिनांक ९.३.२००७ रोजी देण्यात आलेले आहे. जावक नोंदवहीवरुन निर्गमित केल्याचे दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांना ते प्राप्त झालेले त्यांच्या प्रथम अपीला वरुन दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे अर्ज आल्यानंतर जी प्रक्रिया करावयाची असते ती सुरुवातीला ४-५ दिवसांत करावयाची असते. परंतु, कलम ११ ची प्रक्रिया सुरु न करता दिनांक ९.३.२००७ रोजी त्याबध्दल प्रक्रिया करावी लागेल असे कळविणे याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांना कायद्याचे कोणतेही ज्ञान आहे असे दिसून येत नाही. माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावयाची असते याचा अर्थ ३० दिवसांचे आंत सर्व प्रकारची प्रक्रिया करणे आवश्यक असते. आज जन माहिती अधिकारी हे हजर नाहीत. त्यांनी कोणत्याही प्रकारचा अर्ज सुध्दा पाठविलेला नाही. व माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबतची जबाबदारी ही अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची असते. अन्यथा अधिनियमाचे कलम २० प्रमाणे त्यांचे विरुध्द माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही म्हणून शास्ती लादण्याची तरतूद आहे. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जरी त्यांचेकडे त्यांच्या कार्यालयात प्राप्त

झालेले अपील हे सादर झालेले नसेल तर ती त्यांची अकार्यक्षमता आहे व त्यांनी ज्या कर्मचा-यांनी ते सादर केले नाही त्या कर्मचा-यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक ठरते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम जे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्याकडे प्रथम अपील सादर केले नसेल त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर दाखल झालेल्या प्रथम अपीलाची सुनावणी ३० दिवसांचे आंत घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध असलेली माहिती योग्य ती प्रक्रिया करुन छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय करावा.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३४६/२००७**

**१) श्री काशिनाथ धोंडप्पा भूसनुर,**
**वसंत सह.ग्रामीण गृह निर्माण संस्था मर्या. लोहारा,**
**मु.पो. लोहारा, ता.जि. यवतमाळ. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा,**
**उपविभागीय अधिकारी, यवतमाळ**
**जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १५.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी मा.महोदया आभा शुक्ला, आयएएस, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना त्यांच्या कार्यालयात भूखंड विक्रीची परवानगी मिळण्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "१६ जानेवारी, २००६ रोजी उक्त विषयाचे आवेदन पत्र आपणाकडे सादर केले होते व त्याची प्रत अेस.डी.ओ. यवतमाळ यांचेकडे वेगळी पाठविली आहे. त्याची छायाप्रत माहितीसाठी यासोबत जोडली आहे. नव्वद दिवसांचा कालावधी केव्हाच लोटून गेला आहे. आज मितीस एक वर्ष चार महिने पूर्ण होऊन गेलेत. तरी देखील उक्त (एक) मधील परवानगी मिळाली नाही. हयाबाबत आपले कार्यालयातील संबंधीत लिपीकांशी प्रत्यक्ष संपर्क साधला असता एस.डी.ओ.चा अहवाल अप्राप्त आहे असे सांगितल्या जाते. एस.डी.ओ.च्या कार्यालयामध्ये शिरस्तेदाराशी संपर्क साधला असता त्यांनी अधिनस्त कनिष्ठ कर्मचा-यांकडे अंगुली निर्देश करुन वाट लावे. अशी टोलवाटोलवीची उत्तरे मिळतात. अशा प्रकारची प्रशासकिय कामकाजाची शोकांतीका गंभीर आहे. वास्तविक महराष्ट्र शासकिय कर्मचा-

यांच्या बदल्यांचे विनियमन आणि कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम १०(१)(२) चे उल्लंघन जाणिवपुर्वक करण्यांत आलेले आहे. सबब संबंधीतावर उक्त अधिनियमाचे कलम १०(१)(२)(३) नुसार कारवाई करण्याची विनंती करतो. तसेच आपण केलेल्या कारवाईचा तपशिल मला अवगत करण्याची कृपा करावी. तसेच मी महसूल विभागाचा प्रामाणिक कर्मचारी असून देखील मला विहित मुदतीचे आंत परवानगी कां देण्यात आली नाही. मी आवेदनामध्ये निवेदन केलेल्या खुलासेवार माहितीच्या आधारे मला यथाशिघ्र भूखंड विकण्याची परवानगी देण्यांस कांहीच अडचण नव्हती. परंतु कालापव्यय करुन लालफितशाहीचा हिसका मला दाखवण्याच्या उद्येशाने प्रकरण जाणून बुजून बेजबाबदारपणे दुर्लक्षित करुन हाताळण्यांत आले. जर महसुल सेवानिवृत्त कर्मचा-याला असा त्रास होतो आहे तर इतर सामान्य जनतेचे काय हाल होत असतील ते परमेश्वरच जाणे. अशा प्रकारच्या कामकाजातून पारदर्शक प्रशासकिय काम म्हणावयाचे काय. मला यथाशिघ्र भूखंड विकण्याची परवानगी देण्याची कृपा करावी ही विनंती. असामान्य विलंबामुळे असा हा अर्ज नाईलाजास्तव सादर करणे भाग पडत आहे. हयात पुन्हः पोस्टमनची भूमिका वटविण्याचे कामकाज कृपया करु नका, ही विनंती आहे."

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : "आवेदकाचा अर्ज मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कार्यालयात प्राप्त झालेला असून मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्रं.राजस्व-२/कावि-५७५/०७ दिनांक १४.६.२००७ नुसार या कार्यालयात आवश्यक कार्यवाही करीता प्राप्त झालेला आहे. आवेदकाने माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये सादर केलेल्या अर्जात माहिती न मागविता भूखंड विक्री करण्याची परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज केला आहे. आवेदकास या कार्यालयाचे पत्र

क्रं.उविअ/प्रस्तु-१/कावि-५९७/०७ दिनांक २५.६.२००७ नुसार त्यांना प्रकरणात दिनांक ९.७.२००७ रोजी हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु ते दिनांक ३०.७.२००७ रोजी प्रकरणात हजर झाले व त्यांना माहितीची आवश्यकता नसून त्यांना प्रकरणात भूखंड विक्री करण्याची परवानगीची आवश्यकता आहे. प्रकरणात आवश्यक कागदपत्रे दाखल करण्याकरीता त्यांना सूचित करण्यात आले होते. त्यांनी प्रकरणात कागदपत्रे दाखल करण्याकरीता वेळ मिळण्याबाबत विनंती केली होती. प्रकरणात प्रचलित नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यात येवून महसूल प्रकरण तयार करण्यात आले. सदर प्रकरणात संपूर्ण कार्यवाही करण्यात आलेली असून या कार्यालयाकडून सविस्तर अहवालासह मुळ प्रकरण मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कार्यालयात पुढील कार्यवाही करीता सादर करण्यात आलेले आहे.त्याबाबत आवेदकास या कार्यालयाचे पत्र क्रं.उविअ/प्रस्तु-१/कावि-५३३६/०८ दिनांक ११.१२.२००८ नुसार कळविण्यात आले असून त्याची प्रत यासोबत जोडली आहे. आवेदकाने माहितीचा अधिकार २००५ अन्वये उपलब्ध असलेली माहिती न मागता भूखंड विक्री करण्याची परवानगी मागितलेली आहे. आवेदकास या कार्यालयाचे पत्र क्रं.उविअ/प्रस्तु-१/कावि-५९७/०७ दिनांक २५.६.२००७ नुसार त्यांना प्रकरणात दिनांक ९.७.२००७ ला हजर होण्याकरीता कळविण्यात आलेले होते. परंतु ते दिनांक ३०.७.२००७ ला स्वत: हजर झाले. त्यांनी प्रकरणात माहितीचा अधिकार अधियिम २००५ अन्वये त्यांना माहितीची आवश्यकता नसून त्यांना त्यांचे भूखंउ विक्री करण्याची परवानगी मिळणेबाबत विनंती केल्यावरुन त्यांना प्रकरणात आवश्यक कागदपत्रे दाखल करण्याकरीता सूचित केले होते. त्यांनी प्रकरणात कागदपत्रे दाखल करण्याकरीता वेळ मिळण्याची विनंती केली होती त्याबाबतची प्रत यासोबत जोडली आहे. सदर भूखंउ विक्रीचे प्रकरणात या कार्यालयाकडून सविस्तर अहवालासह मुळ प्रकरण मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कार्यालयात सादर करण्यात आलेले आहे. त्याबाबत आवेदकास या कार्यालयाचे पत्र क्रं.उविअ/प्रस्तु-१/कावि/५३३६/०८ दिनांक ११.१२.२००८ नुसार कळविण्यात आले असून त्याची प्रत यासोबत जोडली आहे."

४. मागितलेल्या माहितीवरुन व उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी भूखंड विक्रीची परवानगी मागितली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३५८/२००७**

**१) श्री अरविंद केशवराव देशमुख**
**मु.करडा, पो. मोठेगांव, ता. रिसोड**
**जिल्हा वाशिम.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद, वाशिम.,**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**जि.प. बांधकाम विभाग, वाशिम, जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १६.१२.२००८ )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांचेकडे २००६-०७ या आर्थिक वर्षात जि.प.बांधकाम विभागाकडून रिसोड तालुक्यात झालेल्या कामाचा अहवाल सविस्तर माहिती. दिनांक ३.४.२००७ पर्यंत आपल्या विभागाकडून रिसोड तालुक्यात करण्यात आलेली कामांची नांवे, कामाची किंमत, कामाची स्थिती, पुर्ण, अपूर्ण, देयकाची स्थिती पुर्ण अपूर्ण, देयकाची रक्कम.. इ. माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २४.७.२००७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना दिनांक

७.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे कळविलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक १०.६.२००७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उपविभागीय अभियंता यांन सुनावणीस बोलाविले होते असे त्यांचे म्हणणे आहे. व सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये दोन दिवसात माहिती देण्यात यावी असे आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक ४.८.२००७ रोजी उप अभियंता यांनी अपीलकर्ता यांना ६ पृष्ठांच्या माहिती करीता रुपये १२/- चालनद्वारे भरावे असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १०.८.२००७ रोजी पाच प्रपत्रे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

३. यावरुन अपीलकर्ता यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे उपअभियंता हे माहिती अधिकारी म्हणून अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता तसेच संबंधीत विलंबास जबाबदार असलेले कर्मचारी/अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी करावयाची आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३६०/२००७**

**१) श्री गौतम नारायण वासनिक,**
**मु. शहापूर, पो. पथरई, ता.रामटेक,**
**जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख कार्यालय, रामटेक,**
**ता. रामटेक, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १६.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी (प्राप्त दिनांक ३.९.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले नाही. सर्वांचे म्हणणे ऐकुण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय शेत सव्हे नंबर १५४, १६,६,७,१५,५ मौजा शाहपूर प.ह.नं. २६ शेत जमीन मोजणीचा तपशिल दिनांक १७.५.२००७ शेत मोजणी दिनांक ४.५.२००७ च्या शेत मोजणी बाबत. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दिनांक २३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, जमीन मोजणीचा विषय हा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, रामटेक यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडून जमीन मोजणीचा तपशिल माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००७ रोजी सुध्दा प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. खंड विकास अधिकारी यांनी

दिनांक ७.८.२००७ रोजी आपण केलेल्या अपील संबंधीत विषय हा या कार्यालयाशी नसून तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख रामटेक यांचेशी आहे. तरी आपण त्या कार्यालयाशी संपर्क साधून अपील करावे असे कळविण्यात आलेले आहे. परंतु, तशा प्रकारचे प्रथम अपील अपीलकर्ता यांनी दाखल केलेले नसून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो.

खुलासा : "वरील संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सविनय विनंती पूर्वक खुलासा सादर करण्यात येत आहे की, मौजा शहापूर प.ह.नं.२६ ता.रामटेक येथील भू.क्रं.७ ची मोजणी करणे बाबत मा. उपविभागीय अधिकारी रामटेक यांचे दिनांक २६.४.२००७ रोजी दिलेल्या सूचने प्रमाणे लाभ धारक यांनी सुध्दा भू.क्रं. ६,१६ ची मोजणी फी भरल्यामुळे अर्जदार श्री नारायण शंभू वासनिक व लाभधारक श्री गुलाब सखाराम डोनाडकर यांना नोटीसाद्वारे कळवून दिनांक ४.५.२००७ रोजी प्रथम ६ व १६ ची ताबा वहीवाटी नुसार मोजणी करण्यात आली. त्यामध्ये मोक्यावरील ताबा वहीवाट व प्रचलीत नकाशा यात तफावत असल्यामुळे भू.क्रं. ७ चे जागेवर ताबा वहिवाट नसल्यामुळे सिमांकन करण्यात आले नाही. याबाबतची माहिती उपस्थित पंचा समक्ष माहिती समजावून दिली व मोजणीचा अहवाल मा. उपविभागीय अधिकारी रामटेक यांना दिनांक ९.५.२००७ व २२.५.२००७ रोजी सादर करण्यात आले. तसेच गौतम वासनिक यांनी या कार्यालयास दिनांक २३.५.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जाप्रमाणे मोजणी केलेल्या प्रकरणाची माहिती समजावून मोजणीची क प्रत ४.६.२००७ रोजी अर्जदाराने स्वतः नेली. दिनांक १७.५.२००७ रोजी मोजणी केलेल्या प्रकरणाची मोजणी फी न भरल्यामुळे अर्जदारास माहिती समजावून दिले क प्रत देण्यात आली नाही. करीता माहितीस्तव सविनय खुलासा सादर."

खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते

व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३५६/२००७**

**१) श्री गजानन प्रल्हाद रोकडे,**
**रा. लोणी, पो. वटफळी, ता. नेर,**
**जिल्हा यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, नेर, ता. नेर, जिल्हा यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी,**
**ग्राम पंचायत लोणी, ता. नेर, जिल्हा यवतमाळ.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १६.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून सरपंच, ग्राम पंचायत लोणी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

"खरेदीनुसार ठराव, ठरावानुसार आठ मिळण्याबाबत. ग्रा.पं. लोणी वार्ड १, घर नंबर ३१/२ असा आहे. एकुण चौ.फुट ४०६९ चौ.फुट ची मला ग्रा. पंचायत लोणी येथून आळ नक्कल देण्याबाबत. २६/२ २००७ ते १५ दिवसात देण्यात यावे. १०.२.२००४ रोजी श्रीहरी नारायणराव यावले यांचे कडून रितसर खरेदी बाबत ग्रा.पं. लोणी ग्रा.पं. मध्ये नोंद केली आहे. खरेदी श्रीहरी नारायणराव यावले यांच्या मालकीची जागेची खरेदी करुन दली व ती सर्व जागा ४०६९ चौरस फुट आहे. तरी खरेदी प्रमाणे नोंद घेतली आहे. तरी ४०६९ ची फेर फार देण्यात यावे. त्याचप्रमाणे खरेदी ज्याने ठराव घेण्यात आले आहे त्या ठरावाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी."

सदरची माहिती व्यक्त्ीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १५.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना व श्रीमती टी.आर. भारती यांना सदर अपील निकाली काढावयाचे असल्यामुळे दिनांक २१.५.२००७ ला पंचायत समिती कार्यालयात सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे दिनांक २१.५.२००७ ला उपस्थित राहीले नाही म्हणून पुन्हा दिनांक १९.६.२००७ रोजी पत्राप्रमाणे दिनांक २५.६.२००७ ला उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे सुध्दा अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानुसार दिनांक २६.६.२००७ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी गट विकास अधिकारी यांना सदरच्या प्रकरणात तपासणी करुन सचिव, कार्यालय पातळीवर माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी संपूर्ण जबाबदारीने आपले काम करण्यास्तव आदेश देण्यात यावे व आपण प्रकरणात अपीलीय अधिकारी असल्यामुळे प्रकरण निकाली काढावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ३०.६.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी ग्राम सेवक यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर सचिव, ग्राम पंचायत यांनी गट विकास अधिकारी यांना दिनांक ५.७.२००७ रोजी पत्राने वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. त्यामध्ये दिनांक २.७.२००० रोजी ग्राम पंचायत लोणी कार्यालयात श्री भाष्करराव कावरे यांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. ठराव क्रमांक १ नुसार श्री गजानन रोकडे यांनी घेतलेल्या जागेची प्रत्यक्ष पाहाणी करण्यात येईल. त्यानुसार श्रीमती यावल यांची मुळ खरेदी सादर केली नाही. खरेदीच्या वेळचा मोजमापाचा कोणताही रेकार्ड ग्राम पंचायत दप्तर सादर केले नाही. यावरुन असे निदर्शनास येते की, ग्राम पंचायत नमूना-८ ला असलेली नोंद योग्य असून सभेने ठरावाला मंजूरी दिलेली आहे. सदरची माहिती विहित मुदतीत देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांनी नमूना-८ ची माहिती अपीलकर्ता यांना देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु माहिती चुकीची आहे म्हणून अपीलकर्ता यांनी ती घेतली नव्हती. मात्र ग्राम पंचायतीच्या दिनांक २.७.२००७ च्या ठरावा नंतर माहिती घेतलेली आहे. परंतु नमूना-८ चुकीचा

दिला आहे. जिल्हा परिषद यवतमाळ एस.डी.ओ. साहेब यांचे आदेशाप्रमाणे नमूना-८ दिलेला नाही, असा आक्षेप नोंदविलेला आहे. त्याचप्रमाणे दिनांक ६.६.२००८ रोजी हा ठराव चुकीचा आहे असाही आक्षेप ठरावाच्या प्रतीवर घेतलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या खरेदी खतामध्ये दिलेल्या क्षेत्रफळाच्या प्रमाणे नोंद झालेली नसल्यामुळे माहिती चुकीची आहे असा आक्षेप त्यांनी घेतलेला दिसून येतो. परंतु, चौकशी अंती बरोबर आहे असे निष्पन्न झालेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना योग्य त्या सक्षम अधिका-याकडे तक्रार करता येईल. परंतु, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांना दिनांक २६.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३६९/२००७**

**१) श्री उत्तम पुंडलीक ठाकरे,**
**मु.पो. देगांव, ता. बाळापूर,**
**जिल्हा अकोला-४४४५०२ अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर,**
**जिल्हा अकोला. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १७.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे वतीने कक्ष अधिकारी श्री एस.पी. सोनकुसरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाचे अवलोकन केले असता त्यांनी २६.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांनी "**आवश्यक ती माहिती मी घेतली आहे. माझेकडून कोणतीही तक्रार राहीली नाही. मी सुनावणीस हजर राहाणार नाही. कृपया माझी अपील नस्तीबध्द करण्यात यावी, ही विनंती,**" असे आयोगास त्यांचे पत्र दिनांक १५.१२.२००८ अन्वये लेखी दिले आहे. तसेच उत्तरवादी यांनी, अपीलकर्ता यांना माहिती दिली असल्याबाबत, आयोगाकडे खुलासा सादर केला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १७.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

November०८Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३७०/२००७**

**१) श्री उत्तम पुंडलीक ठाकरे,**
**मु.पो. देगांव, ता. बाळापूर,**
**जिल्हा अकोला-४४४५०२** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, बाळापूर, ता. बाळापूर,**
**जिल्हा अकोला.**
**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत कार्यालय, देगांव, ता.बाळापूर,**
**जिल्हा अकोला.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १७.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री ए.एम.शिंदे, हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री एस.पी.सोनकुसरे, कक्ष अधिकारी, पं.स. बाळापूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाचे अवलोकन केले असता त्यांनी ९.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांनी "**मला संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे माझी कोणत्याही प्रकारची तक्रार राहीली नाही. त्यामुळे दिनांक १७.१२.२००८ रोजी होणा-या सुनावणीस मी हजर राहू शकत नाही. कृपया सदर अपील नस्तीबध्द करण्यात यावे, ही विनंती,**" असे आयोगास त्यांचे पत्र दिनांक १५.१२.२००८ अन्वये लेखी दिले आहे. उत्तरवादी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रावरुनही अपीलकर्ता यांना माहिती मिळाल्याचे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १७.१२.२००८** **( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३७२/२००७**

**१) श्री चंद्रकांत रामभाऊ चिमोटे,**
**५२५, गुरुमाऊली, नंदनवन ले आऊट,**
**नागपूर-४४०००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था नागपूर (शहर-१),**
**१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट, उमरोड रोड,**
**नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासक,**
**फॉरेस्ट डिपार्टमेंट एम्लाईज को-ऑप.सोसायटी लि.नागपूर**
**कार्यालय सेन्टर पाईंट शाळेच्या बाजूला, काटोल रोड,**
**नागपूर-४४००१३.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १८.१२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासक हे आज हजर नाहीत. संस्थेतर्फे सचिव सुध्दा हजर नाहीत. परंतु, लिपिक हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी प्रशासक तथा माहिती अधिकारी फारेस्ट डिपारर्टमेंट एम्लाईज को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांचेकडे "निवडणुक २००७ मध्ये उभे असलेले उमेदवारांची माहिती. निवडणुकीत उभे असलेल्या २३ उमेदवारांपैकी संस्थेला आर्थिक देणे असलेल्या उमेदवारांचा तपशिल संपूर्ण माहिती. उमेदवारांचे नांव, थकीत रक्कम, जमा केली असल्यास ती तारीख दिनांक ९.५.०७ चे अगोदर भरली आहे किंवा कसे. सदर बाब निवडणुक निर्णय अधिका-यांस कळविलेली आहे किंवा कसे." अशी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद

करुन महिती मागितलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २.७.२००७ रोजी तत्कालीन प्रशासक श्री पी.एन. शेंडे यांनी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती ही संस्थेची निवडणुक २००७ शी संबंधीत असल्यामुळे सदर मुद्यांची माहिती निवडणुक अधिकारी यांचेशी संबंधीत आहे. सबब सदरचा अर्ज निवडणुक अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. मुद्या क्रमांक २ : सदर बाब निवडणुक निर्णय अधिका-यास कळविली आहे किंवा कसे. (२) निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सदर बाबत माहिती लेखी स्वरुपात मागितली आहे त्यामुळे कळविण्यात आलेले नाही असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १०.७.२००७ रोजी माहिती निवडणुक अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही व त्यामुळे देता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे उप निबंधक सहकारी संस्था यांचेकडे दिनांक २१.७.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.८.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात आलेले असून सचिव, फारेस्ट डिपार्टमेंट एम्लॉईज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी यांना अपीलकर्ता यांना दिनांक १३.६.२००७ च्या अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती, आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, सदरच्या आदेशाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रशासक म्हणून संस्थेकडेच असणे आवश्यक आहे व त्यामुळे प्रशासक श्री पी.एन. शेंडे यांनी सदरची माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता त्यांनी दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे सकृत दर्शनी श्री पी.एन. शेंडे प्रशासक यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झ ाली नाही त्याबाबत संस्थेचे सचिव यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, निर्णयाच्या

वेळेस निवडणुक होऊन संस्थेचे संचालक मंडळ व सचिव होते व त्यामुळे संस्थेनी माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर पुन्हा काही संचालक बरखास्त झालेले असून सचिव सुध्दा नाही व प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झालेली नसेल तर त्याबाबत आज संस्थेचे सचिव नसल्यामुळे जबाबदारी निश्चित करता येत नाही. अधिनियमाचे कलम २० प्रमाणे सर्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिका-यास शास्ती करता येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही दिनांक १६.१२.२००८ च्या पत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसते व तसे अपीलकर्ता यांनी मान्य सुध्दा केलेले आहे. मात्र वर नमूद निष्कर्ष काढल्याप्रमाणे माहितीचा अर्ज प्राप्त झालेल्या वेळेस व त्या कालावधीत प्रशासक असल्यामुळे प्रशासक हेच माहिती अधिकारी असतात व त्यामुळेच ते दोषी आढळून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन प्रशासक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाईची शिफारस करण्यात येते.

२) सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी म्हणून विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

November०८Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३७८/२००७**
**अपील क्रमांक २३७९/२००७**
**अपील क्रमांक २३८०/२००७**

**अपील क्रमांक २३७८/२००७**
**अपील क्रमांक २३७९/२००७**

**१) श्री बळीराम माधवराव इढोले पाटील**
**प्लॉट नं.७, स्वामी विवेकानंद नगर,**
**C/o श्री उलेभाले, नगरसेवक, लाखाळा,**
**वाशिम-४४४५०५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वाशिम, ता.जि. वाशिम.**
**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्याला, अडोळी, ता.जि. वाशिम.** **उत्तरवादी.**

**अपील क्रमांक २३८०/२००७**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद, वाशिम.**
**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वाशिम. ता.जि. वाशिम.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.१२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००७ रोजी एकुण तीन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. **अपील क्रमांक २३७८/२००७** मध्ये दिनांक १५.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी सचिव, ग्राम पंचायत अडोळी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "जानेवारी २००६ ते मार्च, २००७ या काळात अडोळी येथे केलेल्या एकुण शेततळयाचे व इतर कामाचा मोजमाप पुस्तीकेतील (M.B.) नोंदीच्या

प्रमाणित प्रतिसह तपशिलवार माहिती. (२) जानेवारी २००६ ते १५ मे, २००७ या कालावधीत शासनाच्या विविध योजने अंतर्गत ग्राम पंचायत अडोळीला पंचायत समिती, जिल्हा परिषद व इतर कार्यालयामार्फत मिळालेल्या अनुदानाची कोणत्या येजने अंतर्गत किती रक्कम मिळाली याची प्रमाणित सत्यप्रतिसह तपशिलवार माहिती." सदरची माहिती रजिस्टर टपालासह आवश्यक खर्च भरण्यास तयार आहे, असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणीच्या नोटीसेस काढलेल्या आहेत परंतु, निर्णय दिलेला दिसून येत नाही. व विस्तार अधिका-याला सुनावणी लावून अपील प्रकरण निकाली काढण्यात यावे, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज हा त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. मात्र, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज हा त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिलेला होता व त्यांनी शिपायास तो स्विकृत करावा अशा प्रकारे आदेश दिले होते. त्याप्रमाणे शिपायाची सही त्यावर दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व ती माहिती त्यांना विना मुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक २३७९/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी सचिव, ग्राम पंचायत अडोळी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "नोव्हे. २००६ ते मे २००७ पर्यंतच्या ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या ठरावाबाबत जमा खर्चाचा तपशिल बाबत माहिती. नोव्हे. २००६ पासून मे २००७ पर्यंतच्या ग्राम पंचायत अडोळी येथील ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या ठरावाच्या प्रमाणित केलेल्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यांत. (२) ग्राम पंचायत अडोळीच्या नोव्हे. २००६ पासून मे २००७ च्या कालावधीतील सर्व योजनेच्या जमा खर्च रजिस्टरच्या (cash book) च्या व पासबुकांच्या प्रमाणित केलेल्या झेरॉक्स प्रति देण्यात याव्यांत." सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ७.७.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाशिम यांना श्री इढोळे पाटील यांनी सदर माहिती ग्राम पंचायतीला एक महिन्यापूर्वी मागितली होती. सादर माहिती ग्राम पंचायतीने पुरविली नसल्यामुळे त्यांनी या कार्यालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपील निकाली काढण्याच्या दृष्टीने परत दिलेले आहे. आपण कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी या पत्राद्वारे आपणास पुनश्च आदेशित करण्यात येते की, सदर अपीलावर सुनावणी लावून आपण प्रत्यक्ष कार्यवाही करावी व संबंधीतास माहिती पुरवावी जेणेकरुन सदर अपील अर्ज निकाली निघेल. परंतु, तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांचे वरील प्रमाणेच म्हणणे आहे. तसेच माहिती अधिकारी यांचे सुध्दा वरीलप्रमाणेच म्हणणे आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. **अपील क्रमांक २३८०/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम यांचेकडे खालीलप्रमाणे माहित मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :

(१) "१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च, २००७ या वर्षात सर्व ग्रा.पं.मध्ये केलेल्या शेत तळयांचे, कॅाक्रीट रस्त्यांचे, कॅाक्रीट फडयांचे, पांदण रस्त्याचे, दलीत वस्ती सुधार योजने मधून तसेच इतर योजनेमधून आणि विविध फंडातून केलेल्या वेगवेगळया कामांची जामा खर्चासह हया सर्व कामांच्या मोजमाप पुस्तीकेतील (M.B.) नोंदीच्या प्रमाणित सत्य प्रतिसह आणि संबंधित अभियंत्यांच्या व लाभार्थ्यांच्या नांवासह पंचायत समिती वाशिम स्तरावरील सर्व कामांची तपशिलवार माहिती." सदरची माहिती रजिस्टर टपालासह आवश्यक सर्व खर्चासह भरण्यास तयार आहे असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.५.२००७ रोजी

गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदर माहिती ग्राम पंचायत स्तरावरची असल्यामुळे आपण सदरची माहिती सचिव, ग्राम पंचायत यांचेकडून मागविण्यात यावी. करीता आपला संदर्भिय अर्ज या कार्यालयाकडून नामंजूर करण्यात येत असून अर्ज आपणाकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यामुळे आपली तक्रार या कार्यालयातून खारीज करण्यात येत आहे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यावरुनही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दिनांक ३१.५.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. त्या अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ७.६.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाशिम यांना अर्जदारास त्वरीत माहिती पुरविण्याबाबत आदेश करण्यात आले होते व तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

७. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती जर ग्राम पंचायत स्तरावर उपलब्ध असली तरी सदरची माहिती ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी गट विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु, सदरची माहिती अति व्यापक असल्यामुळे अपीलकर्ता यांना सशुल्क देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २३७८/२००७ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विना मुल्य माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती त्यांनी व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचा अतिरिक्त खर्च हा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाचा आहे.

२) अपील क्रमांक २३७९/२००७ हे अंशता मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५/५/२००७ (२३/५/२००७) च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय

मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरच्या माहितीचा खर्च हा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाचा आहे.

३) अपील क्रमांक २३८०/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २१.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहितीसाठी येणा-या खर्चाचे विवरण कळवावे. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर ३० दिवसांमध्ये त्यांना माहिती उपलब्ध उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.१२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२५५/२००७.

श्री. नानकराम गुरुदासमल दासवाणी,
कन्नमवार वार्ड, ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चिलमूलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक उपआयुक्त, (सा. प्र.)
नगरपालिका प्रशासन, नागपूर- ४४० ००१.

श्री. सी. एम. सदावर्ते,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनमुती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, देसाईगंज यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक ३१.५.२००६ रोजी झालेल्या नगरपरिषद स्थायी समिती सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक २(४) ची अंमलबजावणी करण्यात निष्काळजी करणारे मुख्याधिकारी, श्री. बि. वाय. कुर्वे हयांचेवर कार्यवाही करण्याबाबतचा ठराव नगरपरिषद सभेत नगराध्यक्ष श्री. जैसाभाई मोटवाणी घेणार आहेत काय ? हयाची माहिती मिळण्याबाबत ठराव घेणार असतील तर कां घेणार नाही हयाची कारणमिमांसाची माहिती मिळण्याबाबत. २) गटाराचे बांधकामामुळे सार्वजनिक पाणी पुरवठा पाईप लाईनला झालेल्या नासधुसीचा खर्च नियमानुसार संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात विलंब कां होत आहे ? ३) श्री. साई वसंत शहा मदीर ते श्री. सुरेश मोटवाणी यांचे घरासमोर टाकण्यात आलेल्या ८०० एम.एम. पाईपच्या जाईंटमध्ये केडल (जाईंटरिंग) टाकण्यात आले नाही तरी आपले कार्यालय पाईप खोलून पाहणी करतील काय ? (सदर बाब असत्य निघाल्यास खोदणीचा खर्च अर्जदार भरण्यास तयार आहे.) ४) श्री. मोतीवाला ते करीम मेडीकलचे श्री. खानानी यांचे घरापर्यंत ८०० एम.एम. चे ३ पाईप तुटलेले टाकण्यात आल्यामुळे गटर लाईनचा पाणी जवळच्या बोरींग मध्ये येत आहे. तरी नगरपरिषद कार्यालय हयाची चौकशी करुन पाईप बदलण्याचे कार्य करतील काय ? हयाची माहिती मिळण्याबाबत. ५) भूमीगत गटार

बांधकामामध्ये अतिरिक्त होणारा खर्च रुपये ६.५७ लक्ष यास नगरपरिषदेची मंजूरी न घेता खर्च करण्यात आला असे दिनांक ३१.५.२००६ रोजी झालेल्या नगरपरिषद स्थायी समिती सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक २(४) मध्ये नमूद आहे. आपले दिनांक २०.३.२००७ च्या पत्राप्रमाणे हे असत्य आहे. तरी असत्य ठराव घेणाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात येईल हयाची माहिति मिळण्याबाबत. ६) अर्जदाराने दिनांक १.२.२००७ रोजी जोडपत्र - अ मध्ये असे नमुद केले की, फक्त ५-६ फुटाने बांधकामात सलाख वापरण्यात आली. परंतु आपल्याकडून ५ ते ६ टन (मुद्या क्रमांक ६, दिनांक २०.३.२००७ चे आपले पत्र) सलाख वापर करण्यात आलेला नाही असे दिशाभूल करणारे उत्तर कां देण्यात आले ? हयाची माहिती. ७) भूमिगत गटार बांधकामावर सप्लाय होणारे पाईप हे नगरसेवक श्री. नागदेवेच्या नावाने आल्यामुळे हयाची चौकशी करणे आवश्यक नाही कां ? नगरसेवकाला नगरपरिषदेची ठेकेदारी वा कंत्राटदारास सहाय्य करता येते कां ? हयाची माहिती. ८) दिनांक ४.९.२००६ रोजी अर्जदाराने गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही दिन ७८ तक्रार क्रमांक ४ अन्वये केलेल्या तक्रारींची चौकशी नियमानुसार विहित मुदतीत होऊन अहवालाची प्रत १ महिन्यात तक्रारकर्त्यांस देणे आवश्यक आहे. तरी चौकशीत जाणीवपूर्वक ६ महिण्याचा प्रदिर्घ काळ लावणाऱ्या चौकशी अधिकाऱ्यांवर आपले कार्यालय काय कार्यवाही करणार आहेत ? हयाची माहिती मिळण्याबाबत. ९) अर्जदाराने नगर परिषद कार्यालयात दिनांक ७.२.२००७, दिनांक ५.२.२००७, दिनांक १२.७.२००६, दिनांक ८.१.२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर आपल्या कार्यालयाकडून काय कार्यवाही झाली हयाची माहिती मिळण्याबाबत. सदरची माहिती वैयक्तिक घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.३.२००७ रोजी प्रभारी मुख्य लिपिक तथा सहाय्यक माहिती अधिकारी हे आजारी रजेवर गेलेले असल्याने दुसरी सोय होईपर्यंत आपण मागितलेली माहिती निर्धारीत कालावधी पेक्षा १५ दिवस उशिराने पुरविण्यात येईल असे कळविण्यात आल्याचे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.५.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक ३०.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली तरी ती दिनांक २७.६.२००७ रोजी घेतली असल्याने व समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्नाचे माध्यमातून मागितलेली आहे व त्यामुळे सदरची माहिती ही अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नाही तरी सुध्दा दिनांक ३०.५.२००७ रोजी त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.५.२००७ रोजी माहिती दिली किंवा नाही याबद्यलचा उल्लेख दिसून येत नाही व माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये मागितलेल्या माहितीचे विश्लेषण करणे सुध्दा आवश्यक आहे व त्यात अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नसली तर त्याप्रमाणे निर्णय देणे आवश्यक आहे. परंतु कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अर्जातील मागितलेली माहितीची चौकशी न करता अपील निकाली काढावयाची आहे अशा पध्दतीने ठोकळेबाज निर्णय दिलेले दिसून येतात. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे कोणत्याही प्रकारचे आकलन हे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना दिनांक २०.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या दिनांक ९.२.२००७ रोजीच्या अर्जाचे संदर्भात दिलेल्या माहितीचे उत्तर जोडलेले आहे व त्यावरुनच दिनांक २२.३.२००७ च्या अर्जामध्ये प्रश्न उपस्थित केलेले दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील साहित्याचे स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल उदा.:- अभिलेख, दस्तवेज, परिपत्रके, इत्यादी त्यांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या आहे व त्यामुळे दिनांक २९.३.२००७ रोजी जे माहिती अधिकारी असतील त्यांनी तसे विहित मुदतीत उत्तर देणे आवश्यक होते. प्रभारी मुख्य लिपिक तथा सहाय्यक माहिती अधिकारी हे आजारी रजेवर गेलेले असले तरी अशा प्रकारचे कारण देणे अपेक्षित नाही. अधिकारी रजेवर गेले असले तरी कार्यालय बंद होत नाही प्रभारी अधिकाऱ्यांने माहिती देणे आवश्यक आहे. कारण अर्जाप्रमाणे माहिती देण्यास मुदत आहे. ही सर्वसाधारण बुध्दीसुध्दा अधिकारी वापरत नाहीत याचेच आश्चर्य वाटते व त्यामुळे दिलेले उत्तर हे

बेजबाबदारपणाचे उत्तर आहे असे असले तरी मुळातच अर्ज हा अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे नसल्यामुळे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८५९-८६२/१.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२६२/२००७.

श्री. दौलत अभिमानजी कुंडलवार,
मु. पो. करंजी रोड, ता. केळापूर,
जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कोडगिरवार एन. पी.,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री. प्रशांत रुमाले,
जनमाहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, पांढरकवडा,
जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पांढरकवडा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मौजे करंजी रोड, ग्राम पंचायत करंजी येथील सचिव यांनी सादर केलेला सन २००१ ते ५/६ सालातील जमा खर्चाचा मासिक व वार्षिक अहवाल मिळणेबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १७.४.२००७ रोजी माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. दिनांक २४.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असा खुलासा दाखल केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती घेण्यास नकार दिला त्यामुळे माहिती पुरविता आली नाही असे खुलाश्यात म्हटले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक २९.१.२००७ रोजी तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी श्री. के. ए. वारेपार, सचिव, ग्रामपंचायत करंजी रोड यांना माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे उपलब्ध करुन द्यावी याकरिता पत्र दिलेले दिसून येते. परंतु पुढे

त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. वास्तविक सदरची माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे सचिव, ग्रामपंचायत किंवा जनमाहिती अधिकारी यांनाच माहिती मागणे आवश्यक होते. परंतु गट विकास अधिकारी यांना मागितल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. असे असले तरी तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी ज्या ज्या माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिले होते तेच माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहेत असे दिसून येते. माहिती उपलब्ध असेल किंवा नसेल त्याबाबत अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कळविणे आवश्यक असते. परंतु अपीलकर्ता व सचिव, ग्रामपंायत यांच्यामध्ये बोलणे झाले होते असे तत्कालीन गट विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र त्याबाबत अपीलकर्ता हा मौन धारण करीत आहे. गट विकास अधिकारी यांना माहिती मागितल्यावर त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती ही सुध्दा विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे त्यांना शक्य होते. नंतर मात्र त्यांनी कार्यालयातील वार्षिक माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो व त्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत सचिव हेच माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहेत असे दिसून येते. तत्कालीन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे पदभार आल्यानंतर सदरची माहिती त्या पदभारात नव्हती हे आज आयोगापुढे सांगणे पेक्षा तत्कालीन गट विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी यांना कळविणे आवश्यक होते व त्यामुळे दोन्ही अधिकारी सदरची माहिती उपलब्ध करुन न देण्यास जबाबदार दिसून येतात व दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांना ताकीद देणे आवश्यक राहील व अपीलकर्ता यांना सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. माहिती उपलब्ध करुन देण्यास जो खर्च येणार आहे तो तत्कालीन माहिती अधिकारी किंवा सचिव ग्रामपंचायत यांनी स्वतः करणे संयुक्तिक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून मागितलेली माहिती ही अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास येणारा खर्च हा वैयक्तिकरित्या संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा सचिव, ग्राम पंचायत यांनी करावा. शासकीय निधिचा वापर करु नये.

२) तत्कालीन गट विकास अधिकारी व तत्कालीन सचिव, ग्राम पंचायत यांना सदरच्या निर्णयाचे माध्यमातून ताकीद देण्यात येत आहे व तशी लेखी ताकीद त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी देणे आवश्यक आहे.

३) निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**
HIREKHAN/BHUJI/८६३-८६५/२.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७०/२००७.

श्री. ललितकुमार बनारसीलाल अग्रवाल,
मु. पो. ता. सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया.

**..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. बी. चौधरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (पुरवठा)
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. डी. के. वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांचे तर्फे श्री. पी. एच. आठवले, वकील हे हजर असून त्यांनी युक्तिवाद केला. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय आयुक्त, (पुरवठा शाखा) नागपूर यांचेकडे दिनांक ३०.३.२००७ ला केलेल्या तक्रारीवर तसेच या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी कोणत्या अधिकाऱ्याला नियुक्त करण्यात आले होते त्या आदेशाची सत्यप्रत. तक्रारीत नमुद मुद्या क्रमांक १ पासून १४ पर्यंत करण्यात आलेल्या चौकशी प्रमाणे संपूर्ण मुद्यांवर चौकशी अहवालाची सत्यप्रत. या चौकशी अहवालावर विभागाने घेतलेल्या निर्णयाची प्रत. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.६.२००७ रोजी पंजीबध्द डाकेने अपीलकर्ता यांना सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी तथा माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीच्या पूर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००७ रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.७.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, या अपीलाचे सुनावणीकरिता कोणत्याही पत्र मिळाले नव्हते. मात्र अपीलाचे निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तक्रार वरील चौकशी ही झालेली दिसून येत नाही व त्यामुळे त्या कालावधीत अहवाल उपलब्ध करुन दिलेला नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांची असे सांगितले की, सदरच्या तक्रारीचा अहवाल

आता दिनांक १.१२.२००८ रोजी उपलब्ध झाला असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे त्या वेळेस जी माहिती उपलब्ध होती ती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या तक्रारी वरील चौकशीचा अहवालाची प्रत ही दिनांक १.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी यांना उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची प्रत हा निर्णय मिळाल्या पासून ३ दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः किंवा रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८६६-८६७/२.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७१/२००७.

श्री. संतोष गणेशप्रसाद पाठक,
नेहरुनगर, ता. तुमसर,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

श्री. डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
परीक्षा नियंत्रक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी कागदपत्रे सादर केली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (कोहचाडे प्रकरणी) कॉलेज नं. १३७८, सेंटर नं. १६३, नोंदणी क्रमांक ६२४९३ बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाचे हयांचे टॅब रेकॉर्डमधून सत्य माहिती बाहेर काढण्याबाबत (नांव पुष्पलता फत्तुजी बावनकर) सदर व्यक्ति ही ५ व्या वर्गाचा इंग्रजीचा १ पॅरेग्राफ वाचण्याच्या लायकिची नाही व तसेच सदर व्यक्तिचे आपल्या कार्यालयातील एका अधिकाऱ्यांशी जवळचे संबंध असून ती व्यक्ति नेहमी रिव्हॅल्युऐशन मध्येच मार्क पाठवून पास होत असे. सदरची माहिती टपालाद्वारे देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे लेखी विचारणा केल्या शिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व त्याकरिता पुष्पलता फत्तुजी बावनकर यांचा पत्र व्यवहाराचा पत्ता या विभागास पाठविल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही घेता येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार अपीलार्थीने मागितलेली माहितीबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून अर्जदाराने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे आणि सदर माहिती केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(त्र) मधील नमूद तरतुदीनुसार गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला कळविलेली बाब योग्य असल्यामुळे दाखल केलेली अपील खारीज करण्यात

येत आहे. सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना दिनांक १२.६.२००७ रोजी निर्गमित केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे हे दिसून येते. त्याबाबत अपीलकर्ता यांना विचारले असता सध्या कोहचाडे प्रकरण गाजत आहे. त्या प्रकरणी संबंधित माहिती पुष्पलता फत्तुजी बावनकर यांच्या बी. ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाचे निकालाबाबत शंका आहे म्हणून त्यांनी ती माहिती मागितलेली आहे. अपीलकर्ता यांना त्यात व्यापक जनहित काय आहे असे विचारले असता त्याबद्यलचा व्यापक जनहित नाही तरी त्यात स्वतःचे हिताकरिता त्यांनी ती माहिती मागितलेली नाही त्यामुळे त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्यास त्या त्रयस्थ पक्षाला अधिनियमाच्या कलम ११ प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांना विचारणे बंधनकारक आहे व त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाचा पत्रव्यवहाराचा पत्ता मागितलेला आहे त्याबाबतची प्रतीपूर्ती न कतरता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना सदरची माहिती हवी असेल तर त्यांनी पुष्पलता फत्तुजी बावनकर यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता जनमाहिती अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे व अशा प्रकारे पत्ता कळविल्यावर जनमाहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे सुलभ राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्रयस्थ पक्ष पुष्पलता फत्तुजी बावनकर यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता जनमाहिती अधिकारी यांना दिल्यास जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेऊन अपीलकर्ता यांना कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८६८-८७०/३.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७३/२००७.

श्री. पांडुरंग महादेव बोंदरे,
शास्त्रीनगर, वार्ड नं. २,
धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एस. मुळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, कृषि अधिकारी,
अमरावती विभाग, अमरावती - ४४४ ६०५.

श्री. ए. एस. गजभिये,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर असून त्यांचे वतीने श्री. मधुभाऊ ऊजगांवकर हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धामणगांव रेल्वे यांचे कार्यालयात खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आपल्या अधिकारात तालुक्यातील गांववार झालेल्या ३१ मार्च २००७ अखेर काम पुर्ततेच्या अहवालाची प्रत मिळण्याबाबत. सोबत जोडलेल्या प्रोफार्मा अ नुसार माहिती देण्यात यावी. दिनांक १ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००७ अखेर पर्यंतची संपूर्ण माहिती प्रोफार्मा नुसार नमुद करावी. सदरची माहिती डाकेद्वारा घेणार असेनमुद केलेले दिसून येते. सोबत प्रोफार्मा अ जोडलेला दिसून येतो. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला दिसून येतो. परंतु तरीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी पुन्हा दिनांक १४.७.२००७ रोजी प्रथम अपील अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक २५.७.२००७ रोजी तालुका कृषि अधिकारी, धामणगांव रेल्वे यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे व विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे दिनांक १७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच दिनांक १४.७.२००७ चे प्रथम अपीलाची पण दखल घेण्यात आलेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना माहिती द्या म्हणून पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला दिसून येत नाही. यावरुनच अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती या कार्यालयात

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे गांभीर्य आहे असे दिसून येत नाही. माहिती अपूर्ण मिळाली परंतु त्याबाबत अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती आहे असे म्हणणे किंवा ती कशा प्रकारे अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे ती आयोगापुढे सिध्द करावी लागते. त्यामुळे अपूर्ण व दिशाभूल करणारी माहितीचा मुद्दा निकालात निघतो. मात्र विलंबाचे बाबत तालुका कृषि अधिकारी, धामणगांव रेल्वे हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तालुका कृषि अधिकारी, धामणगांव रेल्वे यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांना ताकीद देण्यात येत आहे व त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ३.१२.२००८**

HIREKHAN/BHUJI/८७१-८७२/३.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७४/२००७ व अपील क्रमांक २२७५/२००७.

श्री. सुरेशचंद्र बनारसीलाल जयपुरीया,
द्वारा - योगेश मेडीकल स्टोअर्स,
गांधी चौक, शेगांव,
जि. बुलढाणा - ४४४ २०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगरपालिका प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, शेगांव,
ता. शेगांव, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी एकच द्वितीय अपील दिनांक १०.८.२००७ व दिनांक १.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे विना अनुमती गैरहजर असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली दिसून येतात. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे श्री. पी. एम. लोळे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगांव यांचेकडे शेगांव शहर के सभी रास्ते दुरुस्ती में कितनी लागत लगी तथा कौन कौन से रास्ते दुरुस्त किये सदरचा कालावधी सन २००६-२००७ मधील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिगत घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००७ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगांव यांनी शेगांव शहरातील रस्ते दुरुस्तीचे काम सन २००६-०७ मध्ये झालेले नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक २६.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना रस्ता दुरुस्तीवर झालेला खर्च कळविण्यात आलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक ४.६.२००७ रोजी तपशीलात माहिती कळविण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे दिनांक ८.६.२००७ रोजी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलामध्ये माहिती खोटी दिली अशी विनंती केलेली दिसून येते. त्याप्रमाणे माहितीचे अवलोकन केले असता माहिती अपूर्ण आहे हे निश्चित दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील मेमोमध्ये मुद्या क्रमांक ५ जी माहिती त्यांना तपशीलात उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे त्यावर जनमाहिती अधिकारी तथा अभियंता यांनी

असे सांगितले की, त्या वर्षामध्ये दुरुस्ती कामे केलेले नव्हते, नव्या रस्त्यांची कामे केले असता व त्यामुळे तसे असले तरी नवीन रस्त्याची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी रस्ता दुरुस्तीची माहिती मागितलेली असल्यामुळे व रस्ता दुरुस्ती झाली नसेल तसे त्यांना विहीत मुदतीत कळविण्यात आले होते असे असले तरी दिनांक २६.४.२००६ व दिनांक ४.६.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करु दिलेली आहे त्याबद्यल पुन्हा तपशीलात कळविणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.२.२००७ च्या अर्जात रस्ता दुरुस्तीबद्यल माहिती मागितलेली होती व दुरुस्ती झालेली नाही असे उत्तर देण्यात आले होते व त्यामुळे ते उत्तर योग्य आहे परंतु दिनांक २६.४.२००७ व दिनांक ४.७.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबद्यलची तपशीलात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ३.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/८७३-८७४/३.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७७/२००७.

श्री. प्रशांत नारायणराव डाफ,
मु. मालवीया वार्ड,
पो. ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर असून प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे श्री. एम. एस. चौधरी, नायब तहसिलदार, वरोरा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वरोरा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) फेरफार क्रमांक ५६ वर आराजी एक एकर सेवा सहकारी सोसायटी दिनांक १८.१०.६२ व आराजी १ एकर सोशल वेलफर ऑफीस, चांदा यांना विकल्याबद्यल फेरफार १५ याचा दिनांक १९.६.१९६१ फेरफार क्रमांक २३८, दिनांक २१.१०.१९६२, फेरफार क्रमांक २६९, दिनांक ९.११.१९६३, फेरफार क्रमांक २७४, दिनांक २९.५.१९६८ हया प्रमाणे कोणत्या रेकॉर्डच्या आधारे फेरफार, पटवारी रेकॉर्ड श्री. आनंदराव माधव डाफ यांची जमीन घेण्यात आली आहे याची माहिती उचित फी घेऊन लेखी स्वरुपात देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी तहसीलदार, वरोरा यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ५.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.११.२००६ रोजी देण्यात आलेला असला तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक ११.४.२००७ रोजी मिळाले व उपलब्ध झालेली माहिती तसेच अपीलाचा निर्णय यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते ती मंडळ अधिकारी यांचे रेकॉर्डवरुन तयार करुन दिलेली आहे. अर्थातच ही माहिती अपीलकर्ता यांना सुध्दा आहे. अपीलकर्ता यांना ज्या फेरफाराचे संदर्भामध्ये फेरफार कशाचे आधारावर घेतले आहे त्या कागदपत्राची माहिती मागितलेली होती. परंतु सदरची कागदपत्रे किंवा फेरफार हा मागील ३८ वर्षा पुर्वीची असल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नाही व देता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. वास्तविक फेरफाराचे संदर्भातील अभिलेख तहसीलदार कार्यालयातील अभिलेखागारात उपलब्ध

असतात व त्यामुळे तहसीलदार कार्यालयातील अभिलेखातून शोध घेणे आवश्यक होते. तसा शोध घेतलेला दिसून येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही अर्ज केल्यापासून ३० दिवसात उपलब्ध करुन द्यावयाची असते. याबाबत ही मुदत पाळलेली दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकरी यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती विलंबाने दिली तरी अपूर्ण दिलेली आहे व कागदपत्रे दिलेली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय देऊन सुध्दा निर्णयाची प्रत ही ६ महिन्यांनी दिलेली आहे यावरुन तहसील कार्यालयातील किंवा उपविभागीय कार्यालय यांच्या कार्यालयातील कार्यपध्दतीचे दर्शन होते. ही दोन्ही कार्यालयातील बेजबाबदारपणा दिसून येतो. त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय जरी दिलेला असला तरी निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना ६ महिन्यांनी उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांना शिस्त आणणे भाग पडेल. तसेच अपीलकर्त यांनी मागितलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन त्यांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती कागदपत्राचे स्वरुपात मागितलेली आहे त्या कागदपत्रांचा शोध हा तहसील कार्यालयातील अभिलेखागारात घेऊन उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१.२००६ च्या अजाचे अनुषंगाने मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातील कर्मचारी किंवा अधिकारी यांनी निर्णयाची प्रत ही अपीलकर्ता यांना ६ महिन्यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ४.१२.२००८**

HIREKHAN/BHUJI/८७५-८७७/४.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७८/२००७.

श्री. देवराज उत्तमराव पाचुरकर,
सर्वोदय कॉलनी, कॉंग्रेसनगर रोड,
अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. पी. जी. भागवत,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे बांधकाम निविदेबाबत २००६ ते २००७ आर्थिक वर्षातील खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) निविदा क्रमांक २/२००६ कामाचे नांव - चांदूर जहानपूर ते लेहेगांव रस्त्याकरिता रेती व माती वाहतुक करणे सदर काम मला (देवराज पाचुरकर सुशिक्षित बेरोजगार) १०% कमी दराने मिळाले असता तसेच अनामत रक्कम भरण्यासंबंधी कार्यालयीन पत्र पाठवून सुध्दा ताबडतोब रद्य करुन फेर निविदा काढण्यात आली. याची मला कोणतीच पुर्व सुचना देण्यात आली नाही. याकामासाठी प्रतिस्पर्धी ठेकेदारांची नावे, त्यांनी भरलेली निविदा दरे तसेच फेरनिविदेसाठी देण्यात आलेली जाहिरात तसेच फेरनिविदा काढण्यासंबंधीची कारणे त्याचप्रमाणे रामगांव ते माटरगांव रस्त्यासाठी रेती, माती वाहतुक करणे या कामाची निविदे संदर्भात सर्व माहिती देणे. २) निविदा क्रमांक २/२००६ (अ) चांदूर जहानपूर ते लेहेगांव रस्त्यासाठी रेती व माहिती वाहतुक करणे, (ब) रामगांव ते माटरगांव रस्त्यासाठी रेती व माती वाहतुक करणे या फेर निविदे प्रक्रियेची संपूर्ण माहिती उदा. ठेकेदारांची नांवे, निविदा दर टक्केवारी, अनामत रक्कमेचा डी. डी. तसेच १०% पेक्षा जास्त कमी दराने निविदा भरली असतांनाचे नियम तसेच सुशिक्षित बेरोजगार व बेरोजगारांच्या सोसायटी याबाबत शासन व जिल्हा परिषद प्रशासनाचे धोरण या नियमावलीची संपूर्ण माहिती. ३) सदर फेर निविदेमध्ये जिल्हा परिषद प्रशासनाचा काय नफा वा तोटा झाला याची माहिती. ४) सदर निविदा प्रक्रिया ३-४ महिण्यात ३ वेळा पार पडली. या प्रक्रियेची ३ वेळेच्या जाहिरातीची माहिती देणे यात फेरफार झाला असेल तर त्याची कारणे वा माहिती. ५) सदर कामासाठी मी आपणाकडे निविदा उघडण्यासाठी

वारंवार आलो परंतु प्रत्येक वेळेस टाळाटाळ करण्यात आली आणि ही वादग्रस्त निविदा प्रक्रिया परस्पर संशयास्पदरित्या उघडण्यात आली का ? याची कारणे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे कार्यालयात दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विनाविलंब कां उपलब्ध करुन दिली असे विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री. प्रकाश गोतमारे, निविदा विभाग, सहाय्यक लेखाधिकारी (बांधकाम) जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे दिनांक ५.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आदेश दिले होते. सदरच्या आदेशाची प्रत जोडण्यात आलेली आहे.
तरीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दिनांक २२.२.२००७ रोजी स्मरणपत्र दिले होते व त्यानंतरही निविदा विभागातील श्री. प्रकाश गोतमारे यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांस दिनांक १.३.२००७ रोजी पुन्हा स्मरणपत्र दिलेले आहे. त्यानंतर दिनांक ९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कार्यालयात मार्च अखेरची कामे असल्याने सध्यास्थितीत आपण मागितलेली माहिती पुरवू शकत नाही करिता आपण मागितलेली माहिती ३१.३.२००७ नंतर पुरविण्यात येईल त्यामुळे तेवढा कालावधी देण्यात यावा असे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांनी अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २२.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले तसेच निर्णय हा दिनांक १३.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून त्यामध्ये सुनावणी दरम्यान श्री. देवराव पाचूरकर यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी (बांधकाम) यांचेकडून देण्यात आली. परंतु देण्यात आलेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक १३.६.२००७ ला घेण्यात आली त्यावेळी उपलब्ध दस्तावेज मधून निविदा कक्ष प्रमुख यांचे मार्फत आवश्यक असलेली माहिती अर्जदार श्री. देवराव पाचूरकर यांना देण्यात आली व तसे ३० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला असल्यामुळे विनामुल्य देण्यात आली व अपीलकर्ता यांचे समाधान झाले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही दिनांक १३.६.२००७ रोजी उपलब्ध झाली म्हणून ती विलंबाने उपलब्ध झ ालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्यास माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेण्यात येते अशा अधिकारी व कर्मचारी यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजण्यात येईल व सहाय्य घेणाऱ्या कर्मचाऱ्यांने जर माहिती अधिकारी यांचेकडे माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असेल तर संबंधित कर्मचारी सुध्दा अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र आहे. सदरच्या प्रकरणामध्ये निविदा विभागातील श्री. प्रकाश गोतमारे यांना ३ वेळा आदेश देऊन सुध्दा त्यांनी वेळेत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे श्री. प्रकाश गोतमारे हे दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक राहिल.

श्री. प्रकाश गोतमारे आज अपीलाचे सुनावणीस हजर नाहीत. परंतु कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या पत्राच्या छायांकित प्रती सादर केलेल्या असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास त्यांनीच विलंब केलेला आहे हे दिसून येते व त्यामुळे सदरची अपील अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे

.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून श्री. प्रकाश गोतमारे, निविदा विभाग (बांधकाम), जिल्हा परिषद, अमरावती यांनी माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यासाठी विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसूली ही सक्षम अधिकाऱ्यांनी लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८७८-८८१/४.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२८१/२००७.

श्री. दादाजी सदाशिव नाकतोडे,
मु. पो. कुरुड, ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

जनमाहिती अधिकारी तथा
महाप्रबंधक,
वैनगंगा क्षेत्रीय ग्रामीण बँक,
१२०/३, सिव्हील लाईन,
जुना वरोरा नका, पो. बॅग क्र. १२५,
चंद्रपूर- १. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे विना अनुमती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. शाम मंद्दीवार, वरिष्ठ अधिकारी, मुख्य कार्यालय, चंद्रपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक, वैनगंगा क्षेत्रीय ग्रामीण बँक, शाखा देसाईगंज यांच्याकडे दिनांक १ एप्रिल २००५ ते १ जुलै २००७ पर्यंत १) उपरोक्त कालावधीत खातेदारांच्या रकमेचे अपहार झाले आहे का ? २) आजपर्यंत किती खातेदारांच्या तक्रारी आहेत ? ३) मार्च २००७ नंतर किती जणांना कर्ज वाटप केले ? ४) चोप/कोरेगांवच्या शेतकऱ्यांना पिक कर्ज देण्याते येत आहे का ? ५) ना देय प्रमाणपत्रासाठी बँक घेत असलेल्या रकमेची पावती देते का ? नसल्यास कां ? माहिती अर्जदार व्यक्तिशः येऊन घेऊन जाईल. अर्जदार दारिद्र रेषेखालील आहे असे नमुद केलेले आहे. परंतु प्रमाणपत्र जोडलेले दिसून येत नाही. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांना

१ व २ मुद्दे वगळून ३, ४ व ५ मुद्यांवर माहिती देण्यात आलेली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्याच दिवशी द्वितीय अपील सुध्दा दाखल केलेले आहे. याचा अर्थ प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील नाही. माहिती जी उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य दिसून येते. मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.७.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ ची माहिती हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ४.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८८२-८८३/४.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२८२/२००७.

श्री. पारसनाथ कन्हीराम जैस्वाल,
प्लॉट नं. ७, बँक कॉलनी,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. अंबाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. आर. व्ही. रामटेके,
जनमाहिती अधिकारी तथा
कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००६ रोजी जनसंपर्क अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Please inform of the relevant rules by providing a certified copy of the same, which prevented the AUTHORITIES CONCERNED from calculating and releasing Gratuity Payment to the undersigned right from the day and date of his appointment in a Temporary Cadre of Helper i.e. with effect from the २४th of January १९६९, which at the later stage stood regularised with effect from १st of January १९७१. २) Please inform of the relevant rules by prowiding a certified copy of the same, which empowered and simultaneously permitted the AUTHORITIES CONCERNED to release and effect the Gratuity Payment 'RIGHT FROM THE DAY AND DATE OF TEMPORARY APPOINTMENT' to all those retired MSRTC EMPLOYEES, who initiated JUDICIAL PROCESS for the purpose. ३) Please provide a certified copy of relevant Calculation sheets, on the Authenticity of wich the said Gratuity stands released and paid to the undersigned right form the day and date of Regularisation i.e. १st of January १९७१ to the date of retirement i.e. ३०th of

September २००५. ४) Please provide a certified copy of relevant calculation sheet, on the Authenticity of which the PF's final settlement stands effected to the undersigned on RETIREMENT. ५) Please provide the certified copies of relevant extracts of Leave Records of the undersingned including the calculation sheets on the Authenticity of which the final Final Payment towards Leave Encashment stands effected to the undersigned on RETIREMENT. ६) Please enlighten the undersigned of the increased/enhanced rates of DA, right from the १st of January २००४ to the ३०th of September २००५, by furnishing the certified copies of the same. ७) Please inform as to by when would the undersigned's left over Gratuity for the duration of २४th of January १९६९ to the ३१st of December १९७० be released alongwith a copy of relevant calculation sheets. ८) Please inform as to by when sould the Proportionate Difference of Arrears not only of LEAVE ENCASHMENT but also of GRATUITY on account of ENHANCED RATE OF DA from time to time till the date of retirement i.e. ३०th of September २००५, be released to the undersigned by providing a copy of relevant calculation sheets of the same. ९) Please inform of the NAME AND DESIGNATIONS including Telephone Numbers of the APPELLATE AUTHORITY of your Department, stands designated mandatorily under the relevant provisions of the Right to Information Act, २००५. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी प्रथम दाखल केले. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १.३.२००७ रोजी काही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा त्यांनी ती अपूर्ण असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे निश्चित दोषी आढळून येतात. त्यानंतर प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. दिनांक १.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी ती पूर्ण माहिती नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले असल्यामुळे त्यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २८.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती त्यांना उपलब्ध झाली नसेल ती माहिती हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने त्यांना ती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमांचे कलम २०(२) अन्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर विभाग, नागपूर यांना स्वतंत्रपणे पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाटविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२८८/२००७.

श्री. श्रीराम सितारामजी भातकुलकर,
कुंभारपेठ, वार्ड नं. १४,
ता. नरखेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चिलमूलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त, (सा.प्र.)
नगरपालिका प्रशासन,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. अशोक प. गऱ्हाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद,
नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नरखेड यांच्याकडे दिनांक ४.४.२००६, दिनांक ७.४.२००६ व दिनांक १५.४.२००६ च्या तक्रारी संबंधाने नगरपरिषदेने केलेल्या कारवाईची माहिती. माहितीचा कालावधी दिनांक ११.११.१९९७ ते दिनांक २२.२.२००७ तक्रारी अर्जासंबंधाने व बांधकाम परवानगी संबंधाने माहिती मिळणेबाबत. सोबत आवश्यक माहितीची टिप्पणी मुद्या १ ते १२ जोडली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली हीम्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी नगरपरिषदेचा ज्या अभिलेखाची पडताळणी अपीलार्थीला करावयाची आहे तो अभिलेख कार्यालयीन वेळी पडताळणी करिता प्रतिवादीने उपलब्ध करुन देण्यात यावा. अभिलेखाची तपासणी केल्यानंतर अपीलार्थीने त्यांना आवश्यक माहितीकरिता प्रतिवादीकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज सादर करावा. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आंत प्रतिवादीने अपीलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेशित करीत आहे अशा प्रकारचा निर्णय देऊन सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अर्ज दिलेला होता असे आयोगास सांगितले व

आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु सदरच्या अर्जाची प्रत आयोगाकडे दाखल केलेली नाही. मात्र प्रथम अपीलामध्ये निर्णय देऊन सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपीलकर्ता यांनी त्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही. अपीलकर्ता यांनी तोंडी युक्तीवाद करतांना दिनांक १३.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध झाली असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र त्यानंतरही कागदपत्राची प्रत यामध्ये दाखल केलेली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे परंतु ती माहिती ही निश्चितपणे विहित मुदतीचे नंतर उपलब्ध झालेली दिसून येते व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्याकरिता अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्याने अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८८८-८९०/५.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२९३/२००७.

श्री. देवाभाऊ भगवान ऊराडे,
विस्तार अधिकारी पंचायत,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर.

श्री. एम. डी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे सादर केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही यांना श्री. अरुण डी. मादेश्वर यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी मनोहर कापकर, नवरगांव यांच्या गैरशिस्त व गैरवर्तणूकीबाबत चौकशी करुन बडतर्फ करण्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला. त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा प्राथमिक चौकशी अहवाल व कागदपत्रे (पुरावे) ची छायांकित प्रती मिळण्याबाबत माहिती अर्ज. माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी श्री. डी. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही यांच्याकडे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.७.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यात अपीलार्थी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर श्री. अरुण मुदेश्वार यांनी श्री. एम. एच. कापकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत नवरगांव यांचे विरुध्द विरुध्द केलेल्या दिनांक १६.१.२००७ च्या तक्रारीतील पंचायत समिती, सिंदेवाही यांचे स्तरावरील बाबीची श्री. डी. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी (पंचायत) हे (यापुर्वी दिनांक १.२.२००७ अन्वये गट विकास अधिकारी, सिंदेवाही यांनी चौकशी अधिकारी म्हणून नेमल्याप्रमाणे) ८ दिवसाचे आंत चौकशी पूर्ण करतील व तसा चौकशी अहवाल आपले अभिप्रायासह माहिती अधिकारी

यांना सादर करतील व त्यानंतर अपीलार्थ्यांना त्याचे अपील अर्जातील मागणी प्रमाणे माहिती अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही हे माहिती पुरवितील असा निर्णय दिलेला दिसतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा संबंधित विस्तार अधिकारी यांचे कडून अर्जदारास माहिती प्राप्त झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार होती. परंतु अर्जदार यांनी सदरच्या माहितीबाबत वारंवार विचारणा करुन श्री. डी. बी. ऊराडे यांची माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन द्या असा दररोज तगादा लावत होते म्हणून प्रथम अर्जदाराची माहिती द्वितीय अर्जदाराला मिळाली नाही त्यामुळेच अपील दाखल करण्यात आलेले होते. म्हणून श्री. अरुण डी. मादेश्वर यांचेमार्फत सदर चौकशी अहवालाची प्रत प्रत्यक्ष माझेकडून दिनांक १६.८.२००७ रोजी प्राप्त केलेली आहे. यामध्ये माझा काहीही हेतू नाही. सबब खुलसा सादर केलेला आहे व माहिती अधिकारी श्री. अरुण डी. मादेश्वर यांच्या माहितीचा मागणीचा अर्ज पुरावा म्हणून सादर केलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना मात्र मागितलेली माहिती मिळाली नाही असे दिसून येते. एका अर्जदाराने माहिती मागावी व त्यांना ती उपलब्ध करुन दिली व तसेच दुसऱ्या अर्जदाराने तीच माहिती मागितली म्हणून पहिल्या अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली त्यामुळे दुसऱ्या अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे म्हणणे म्हणजे अधिनियमाच्या तरतुदीचे अज्ञान आहे किंवा सर्व सामान्य ज्ञान नाही असे दिसून येते. प्रत्येक अर्जाची प्रक्रिया ही स्वतंत्र आहे. एकंदर अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी सुध्दा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही यांना श्री. डि. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी तथा चौकशी अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले असून सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व यावरुन सदरचे विस्तार अधिकारी श्री. डी. एस. सावसाकडे हे दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २६.२.२००७ रोजीच पत्र दिलेले असल्यामुळे सुध्दा श्री. डी. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सिंदेवाही हेच जबाबदार दिसून येतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यास श्री. डी. एस. सावसाकडे हे विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असल्याचे आयोगाची खात्री झाल्याने श्री. डी. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी यांना अधिनियमाचे कलम ५(४)(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.२.२००७ च्या अर्जा प्रमाणे हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ६.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/८९१-८९३/६.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२९९/२००७.

श्रीमती विमला डी. मधुरा,
प्लॉट नं. १८, गेहानी ले आऊट,
राजनगर, काटोल रोड, नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
गड्डीगोदाम, नागपूर.

श्री. राजन अजय भूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
गड्डीगोदाम, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. ए. एम. भादीकर, कार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३.५.२००७ व दिनांक १०.५.२००७ रोजी दोन अर्जाचे माध्यमातून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. References see at the bottom (below) Information required :- १) Which documents Shri D. J. Wilfred submitted to M.S.E.D.C.L. to change the name of original consumer to that of in his and his family members of names. २) Who was the officer incharge who has authorised the change in names of consumer ? ३) Why house survey was not to be before changing the names of consumers of the meters ? ४) Why my NOC was not obtained before changing the names of consumer although, I am undisputed owner of a partner the house No.१५०. १) With reference to FIR No. ३३३०/२००, dated ९.३.२००७ kindly issue a certified copy of the application under RTI Act, २००५ of Shri D. J. Wilfred asking for information regarding utilization of energy supplied by MSEDCT at plot No. १८, Gehami lay out, Rajnagar. २) With ref. to your letter No. NUZ/EE/CLDN/Rev/३५९३, dtd. २७.७.२००५ addres to me, kindly intimate under which rule of MSEDCT you have transfare & energy meters to Shri D. J. Wilfred and his family members living under one roof and having one kitchen at plot No. १८, Gehami lay out, Rajnagar, Nagpur. Note :- This information and

documents me be given to me by registered post at the earliest. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांना संबोधित केलेले आहे. मात्र सदरचे अपील हे सिव्हील लाईन डिव्हीजन मध्ये दिलेले दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे अपेक्षित माहिती त्यांना उपलब्ध झाली असली तरी ती दस्ताऐवजाचे माध्यमातून उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हाणे असे आहे की, माहिती त्यांना चुकीची मिळाली. प्रथम अपीलाचे निर्णयाविरुध्द द्वितीय अपील असते. परंतु दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले याचा अर्थ प्रथम अपीलाचे निर्णया विरुध्द द्वितीय अपील नाही. त्यावर अपीलकर्ता यांची वीज चोरी पकडण्यावरच ही माहिती मागणे त्यांनी सुरु केले. जो पर्यंत वीज चोरी सुरळीत होती तो पर्यंत कोणत्याही प्रकारचे वाद त्यांनी उपस्थित केले नाही असे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तरीही अपीलकर्ता यांच्या दोनही अर्जामध्ये मागितलेली मुद्दे निहाय माहितीच्या संबंधामध्ये जी जी कागदपत्रे किंवा दस्ताऐवज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असतील त्याची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.५.२००७ व दिनांक १०.५.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेली मुद्येनिहाय माहिती ज्या संबंधामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्या पासून १५ दिवसाचे आंत विनामुल्य पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८९४-८९६/६.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३०१/२००७.

श्री. विकास गणपतराव शेंडे,
नागरी बँक कॉलनी,
राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मागे,
हिंदनगर, वर्धा - ४४२ ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगर पालिका, नागपूर.

श्री. एस. एस. हस्तक,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे पाणी पुरवठा नियम, गैरव्यवहार नुकसान भरपाई ४४, एम.आय.जी. मानेवाडा कॉलनी निर्माण झाल्यापासून प्रपत्रात जोडलेली आहे रजिस्टर पोष्टाने पाठवावी. पत्रामध्ये एकूण ६ मुद्ये उपस्थित केलेले आहेत. त्यापैकी ४, ५ व ६ हया ३ मुद्यांची कार्यवाही करुन मिळावी अशा प्रकारची विनंती अपीलकर्ता यांची आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.३.२००७ रोजी आपण पाणी पुरवठा विभागासंबंधी माहिती मागविली असल्याने आपला अर्ज माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग, नागपूर महानगरपालिका, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे. तरी याबाबतचा पुढील पत्रव्यवहार त्यांचे कार्यालयाशी करण्यात यावा असे निगम अधिक्षक, महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना कळवून प्रतिलिपी कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग, नागपूर महानगरपालिका, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे हस्तांतरण केल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.४.२००७ रोजी माहिती अधिकारी जलप्रदाय विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना एकूण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २४.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ९.७.२००७ रोजी निर्णय दिलेला असून एकंदरीत अपीलार्थीनी मागणी केल्याप्रमाणे त्यानां उपलब्ध असलेली आवश्यक माहिती

मिळाली आहे व मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांची काही त्यांची काही तक्रार असल्यास संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करुन तक्रारीचे निवारण करण्याची त्यांना मुभा आहे. त्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करुन निकालात काढण्यात येते. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्या निर्णयामुळे सुध्दा समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावाणीमध्ये अपीलकर्ता यांनी कार्यवाही करुन मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती विहित मुदतीत उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे तसेच कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करण्याच्या संदर्भात अधिनियमात तरतुद नसल्यामुळे अपीलकर्ता यांची विनंती मान्य करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ८.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/८९७-८९९/८.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३०६/२००७.

श्री. एम. व्ही. मानमोडे,
प्रेरणानगर, प्लॉट नं. ३४,
उमरसरा, ता. जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रामानुज चौधरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
वनवृत्त कार्यालय, स्टेट बँक चौक,
यवतमाळ.

श्री. डी. डी. आंधळगांवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधिक्षक, (निर्देशन विभाग)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
वनवृत्त कार्यालय, स्टेट बँक चौक,
यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा निर्देशन विभाग, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), वनवृत्त, यवतमाळ यांचे कार्यालय यांचेकडे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वनसंरक्षक वनकर्मचारी वनकामगार संघटना म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. महसूल वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ क्रमांक एस-३०/०४/प्र.क्र. ३९२/फ ४, दिनांक २१.६.२००६ पत्रानुसार शासनास मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रशासन मार्फत किंवा योग्य मार्गाने सादर मुद्दे निहाय अभिप्राय. तसेच सदरच्या पत्राचा निर्णय शासनास मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना सादर अहवाल प्रत दिनांक १५.५.२००६ च्या निवेदनानुसार अहवाल प्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.३.२००७ (दिनांक १३.२.२००७) रोजी अपीलकर्ता यांना उपरोक्त संदर्भीय अर्जान्वये मागविण्यात आलेली माहिती यासोबत जोडून पुरविण्यात येत आहे. सदर माहिती मिळाल्याची पोच पाठवावी ही विनंती. सोबत सहपत्र वरील प्रमाणे असे दिलेले आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००७ रोजी प्रथम

अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय न देता सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २६.४.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा निर्देशन विभाग, यवतमाळ यांनी अपीलकर्ता यांना "परंतु या कार्यालयाकडून आपण उपस्थित केलेल्या मुद्यांवर शासनास किंवा अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना अहवाल सादर व्हावयाचा आहे. सदर प्रकरणी परिच्छेद निहाय उत्तर तयार केले असून शासनाकडे मंजूरीस सादर केले आहे. शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत आपणास पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये विहित कालमर्यादेत माहिती दिली नाही. तसेच अहवाल सादर केल्याचे व शासनाचे मंजूरी नंतर मला माहिती देण्यात येईल त्यामुळे माहिती अप्राप्त होती. तसचे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी म्हणून एकाच अधिकाऱ्याने स्वाक्षऱ्या केलेल्या स्पष्ट दिसून येत असल्याने शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्राधिकृत सक्षम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रकरण सादर केलेले दिसून येत नाही. तसेच सहपत्र २ व ४ मध्ये नमुद केल्यानुसार अहवाल शासनाकडे सादर केले असल्याने कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना माहितीचे अधिकारातील उपरोक्त वर्णनाची माहिती मिळणेबाबत अर्ज दिनांक २७.६.२००७ अन्वये सादर केले त्यांचे कडील दिनांक ९.७.२००७ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यवतमाळ यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी माहितीच्या अधिकारातील नमुद शासन पत्रातील वर्णनाची माहिती अद्याप पावेतो शासनास सादर केली नसल्याचे व ती प्रदिर्घ विलंब लक्षात घेता तात्काळ दोन दिवसात सादर करण्याबाबत उल्लेखीत असलेले पत्र दिले. प्रदिर्घ कालावधी पासून अद्यापही माहिती मिळालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा अभिप्राय अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना दिनांक १४.७.२००६ रोजी पाठविण्यात आला होता. तसेच मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यवतमाळ यांना माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे व त्यामुळे सदरचे अपील पाहिले होते असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु शासनाचे दिनांक २१.६.२००६ चे पत्रानुसार अभिप्राय अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे पाठविले आहे. त्या अभिप्रायाचाची प्रत उपलब्ध आहे. त्या अभिप्रायाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक १३.२.२००७ च्या अर्जामध्ये शासनाच्या दिनांक २१.६.२००६ च्या पत्राअन्वये जे अभिप्राय अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रशासन किंवा लोक आयुक्त यांचेकडे सादर केलेले आहे त्या अभिप्रायाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ८.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३१०/२००७.

श्री. सारंगधर रघुनाथ पवार,
रोकडीया हनुमाननगर, शेगांव,
ता. शेगांव, जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती वसुधा नाईक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (संशोधन)
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ, आदिवासी विकास भवन, नागपूर.

श्री. आर. आर. गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ, आदिवासी विकास भवन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००७ रोजी माहिती अधिकारी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचे स्थापनेपासून ३०.४.२००७ पर्यंत ठाकूर, ठाकर जमातीच्या उमेदवारांच्या वैधता प्रमाणपत्रासंबंधी वैध/अवैध आदेशांच्या प्रति. २) अनुसुचित ठाकूर जमातीचे गुण वैशिष्टे माहिती प्रती. ३) ठाकर जमातीची गुण वैशिष्टे माहिती प्रती. ४) म ठाकूर व क ठाकूर यांची गुण वैशिष्टे माहिती प्रती. ५) म ठाकूर व म ठाकर यांची गुण वैशिष्टे माहिती प्रती. ६) क्षत्रिय ठाकूर यांची गुणवैशिष्टे माहिती प्रती. ७) वैश्य ठाकूर गुणवैशिष्टे माहिती प्रती. ८) भाट ठाकूर यांची गुणवैशिष्टे माहिती प्रती. ९) ब्रम्हभाट ठाकूर यांची गुणवैशिष्टे माहिती प्रती. १०) नागपूर समितीच्या स्थापनेपासून भ्रष्ट्राचार प्रतिबंधक कायद्याखाली पकडल्या गेल्याच्या कर्मचाऱ्यांची माहिती. कर्मचाऱ्याचे नांव, रक्कम घेतांना पकडले ती माहिती व सद्य:स्थितीत त्याची स्थिती व त्यांचेवर झालेली कार्यवाही याबद्यलची माहिती. ११) दक्षता पथकात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती. कर्मचाऱ्यांचे नांव, पद, रुजू दिनांक, एकाच ठिकाणी किती वर्ष झाले याची माहिती. नोट :- सदर मुद्दा क्रमांक १ ते ११ ची माहिती आपल्या कार्यालयात उपलब्ध आहे व ती कागदपत्राच्या स्वरुपात मी मागितली आहे. त्यामुळे विविध कलमे वापरुन नाकारु नका ती तात्काळ उपलब्ध करुन द्या हि विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक

२९.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.७.२००७ रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केल्या वरती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिति यांचेकडून आदिवासी समाजाबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अतिशय व्यापक प्रमाणात दिसून येते व त्यात त्या समाजाचे बद्यलचे संशोधनात्मक माहिती सुध्दा मागितलेली दिसून येते. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे. मुद्या क्रमांक १ :- अपीलकर्त्यांने नागपूर समितीच्या स्थापनेपासून ते दिनांक ३०.४.२००७ पर्यंत ठाकूर जमातीच्या उमेदवाराच्या वैधता प्रमाणपत्राचे वैध व अवैध आदेशाच्या प्रती मागितलेल्या आहेत. सन १९९२ पासून ते २००७ पर्यंत एकूण १५ वर्षाची माहिती उमेदवाराने मागितलेली आहे. समिती दरमहा ३०० ते ५००० प्रकरणी निर्णय देते. १५ वर्षाची माहिती विचारात घेता हजारो प्रकरणाचे संस्करण व तपासणी करुन माहिती देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे नियम ७(९) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधन सामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने सदर माहिती पुरविणे शक्य नाही. मुद्या क्रमांक २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ :- नुसार म ठाकूर, क ठाकूर, वैश्य ठाकूर, क्षत्रिय ठाकूर, भाट ठाकूर, ब्रम्हभाट ठाकूर, गुणवैशिष्टये माहिती मागितलेली आहे. वास्तविक पाहता ज्या उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र समितीला तपासावयाचे आहे त्या त्या उमेदवाराने त्यांचे जाती विषयक माहिती समितीला विहित प्रपत्रात भरुन व सुनावणीचे दरम्यान समितीला देणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरणानुसार उमेदवाराने दिलेल्या माहितीच्या आधारे व उमेदवाराने दिलेल्या कगदपत्राचे आधारे समिती प्रकरणनिहाय निर्णय देत असते. त्यामुळे सदरची माहिती नाकारण्यात आलेली आहे. मुद्या क्रमांक १० :- सदरची माहिती निरंक समजण्यात यावी असे उमेदवारास कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे उमेदवारास माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मुद्या क्रमांक ११ :- दक्षता पथकात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती, कर्मचाऱ्यांचे नांव, पद, रुजू दिनांक, एकाच ठिकाण कार्यकाळ याची माहिती उमेदवाराने मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(च) व कलम २(झ)(एक) नुसार मागितलेली ही "माहिती" व "अभिलेख" या संज्ञेनुसार देणे अभिप्रेत नसल्याने तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१)(बी)(IX) अन्वये कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती ही कार्यालयात लावण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याने शासकीय सुटया वगळता कार्यालयात येऊन माहिती घेऊन जावी. त्यामुळे सदरची माहिती देण्यात आलेली नाही. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबईचे विशेष खंडपीठाकडे ठाकूर या जमाती संदर्भातील एकत्रित याचिकेची सुनावणी सुरु आहे. वरील प्रमाणे खुलाश्याचे अवलोकन केले असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असे दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा विहित मुदतीत उत्तर दिलेले असून ते योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ८.१२.२००८**

HIREKHAN/BHUJI/९०३-९०५/८.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३१४/२००७.

श्री. प्रमोदकुमार हरिश्चंद्र अग्रवाल,
मनोहर चौक, पोलीस लाईन मागे,
गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. जे. वरखेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, गोंदिया.

श्री. वाय. ए. चिंधालोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.१२.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Copy of Akhiv Patrika. २) Pherphar application No. २७६७ with application & all documents, Order sheet, Note sheet. ३) Pherphar No. २७६७ Panji. ४) Application for Mutation filed after १५.२.२००७ by the purchase of the above Plot status of the application. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना सदरचे प्रकरण या कार्यालयाचे पत्र क्रमांक गोंदिया नझुल/फेर.प्रक्र./२००७, दिनांक ५.३.२००७ अन्वये मा.अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचे मागणीनुसार त्यांचे कार्यालयात जमा करण्यांत आल्याने या कार्यालांत विषयांकिंत प्रकरण उपलब्ध नाही. त्यामुळे मागितलेली माहिती आपणास कृपया पुरविता येणार नाही. तरी आपण नमूद कार्यालयांत रितसर अर्ज दाखल करुन मागितलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी प्रथम अपील तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक १२.४.२००७ रोजी निर्णय दिलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायम करण्यात आले होते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल झालेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये अपील दाखल झाले असल्यामुळे अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांनी सदरचे प्रकरण मागविले होते व त्यामुळे त्यांच्याकडे पाठविण्यात आलेले होते व हीच वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेली होती. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर पुन्हा उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे अपील दाखल झाले होते त्यामुळे सदरचे प्रकरण पुन्हा नागपूर कार्यालयात पाठविण्यात आले आहे. आता सदरच्या अपीलाचा निर्णय लागला असून प्रकरणातील अपीलकर्ता यांनी अपील मागे घेतले असल्यामुळे सदरची संपूर्ण नस्ती तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचे कार्यालयात परत येईल असे तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांनी सांगितले. त्याप्रमाणे सदरच्या प्रकरणातील नस्ती ती परत आली नसल्यास तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर प्रादेशिक, नागपूर यांचे कार्यालयाकडून सदरची नस्ती मागून घेऊन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांनी छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९०६-९०८/१०.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३१३/२००७.

श्री. जगदिश मानिकराव खैरकर,
प्लॉट नं. ८६, साकेत नगर,
सुयोगनगर रोड, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, (सं व सु मंडळ)
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
पहिला माळा, विद्युत भवन, नागपूर रोड,
भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
पहिला माळा, विद्युत भवन, नागपूर रोड,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी विना अनुमती गैरहजर आहेत. सदरच्या अपीलाचे सुनावणीची नोटीस कार्यालयाने दिनांक १५.११.२००८ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात सदरच्या नोटीस ही मिळालेली असली पाहिजे हे गृहीत धरुन विनाअनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (प्रशासन) म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रविभाग, भंडारा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. स्वतःच्या आरोपपत्राच्या संबंधी मे २००६ ते मार्च २००७ आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन १) मला आपले पत्र क्रमांक अअ/भंडारा/साप्रवि/आरोपपत्र/गोप/७१७, दिनांक १२.१२.२००५ अन्वये देण्यात आलेल्या आरोपपत्रानुसार दिनांक १०.४.२००६ व दिनांक २०.५.२००६ रोजी प्रविभाग, भंडारा येथे घेतलेल्या चौकशीचे कार्यवृत्त. २) वरील चौकशी संपल्यानंतर माझ्याकडून देण्यात आलेल्या बचावपत्राचे निवेदनावर स.प्र.नी सादर केलेले (Comments) ज्याचा उल्लेख चौकशी अधिकारी हयांनी स्पटीकरण म्हणून केलेला आहे. सदरची माहिती प्रद्यत केलेल्या व्यक्तीद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.५.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), संवसु मंडल, भंडारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ८(१) मधील पोट कलम (ज) जसे ज्यामुळे अपराध्याचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे

या प्रक्रियामध्ये अडथळा येईल अशी माहिती या तरतुदीनुसार आपणांस पत्र व्यवहाराच्या प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.७.२००७ रोजी देण्यात आला असून विषयान्वये आपण प्रथम अपील सादर केले असून आपण केलेल्या मागणीप्रमाणे रुपये २६/- चा भरणा या कार्यालयात करावा व त्याबाबतची रितसर पावती या कार्यालयात सादर करावी. तद्नंतरच आपणांस वरील विषयान्वये दस्तऐवज/माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये १७/- चा भरणा केलेला दिसून येतो व त्याप्रमाणे एकूण १७ कागदपत्रे दिनांक २३.८.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती वास्तविक अपीलकर्ता यांचे विरुध्द जी चौकशी प्रलंबित होती त्या चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली होती असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांना पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व रुपये २६/- ऐवजी रुपये १७/- कां अपूर्ण घेतले हेही त्यांना कळविण्यात आलेले नाही व त्यामुळे त्यांना न्यायालयात दावा दाखल करण्यास उशिर झाला आहे असे त्यांनी तोंडी सांगितले. आज जनमाहिती अधिकारी हजर नाहीत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत हा न्यायालयाचा अवमान आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही या दोन्ही अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती मागितल्याच्या संदर्भात जी जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली संपूर्ण माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, भंडारा हे अपीलाच्या सुनावणीस हजर न राहिल्यामुळे मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, भंडारा यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी. प्रथम अपीलीय अधिकारी अधिक्षक अभियंता, (सं व सु मंडल) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, भंडारा यांचे कार्यालयातून सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेले नसल्यामुळे त्यांनी योग्य ती समज संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १०.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९०९-९११/१०.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३१७/२००७.

श्री. जयंतराव भिमराव जाधव,
१२ तितिक्षा, विदर्भ हाऊसिंग कॉलनी,
बुलढाणा - ४४३ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सु. ह. ठाकरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय कृषि संचालक,
अमरावती विभाग, अमरावती.

श्री. पी. के. लहाने,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सरकारी तलावाजवळ, धाड रोड,
टी. बी. हॉस्पीटल जवळ, बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिक्षक, बुलढाणा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. कृषि विभागाबाबत (सोबत जोडले आहे) माहितीचा कालावधी जुलै, २००५ ते डिसेंबर, २००६ माहितीचा तपशील मुद्या क्रमांक १ ते ४१ सोबत जोडले आहे. कृपया प्रत्येक मुद्यांची माहिती सविस्तर द्यावी मोघम देवू नये. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ६.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या संबंधित माहिती दिनांक २८.२.२००७ पुर्वी या कार्यालयाकडे न चुकता पाठवावी. अन्यथा आपणाविरुध्द अध्यादेशातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदरच्या उत्तराचे अनुषंगाने दिनांक १५.३.२००७ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांनी विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना अपीलकर्ता यांना दिनांक २७.२.२००७ चलान भरण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु त्यांनी अद्यापपर्यंत या कार्यालयास चलान भरल्याची पावती सादर केलेली नाही या कारणास्तव त्यांना सदर माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर दिनांक १६.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे पालन करण्यास कसूर केलेला आहे. करिता मी मागितलेली माहिती मोफत देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. त्यानंतर दिनांक २३.३.२००७ रोजी माहिती अधिकारी कार्यालय विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी पुन्हा माहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा अर्जदाराने मागितलेल्या १ ते ४१ मुद्यांपैकी मुद्या क्रमांक

३३, ३४, ३५, ३७, ३८, ३९ व ४१ बाबतची माहिती अद्याप अप्राप्त आहे तेंव्हा त्याची पूर्तता तातडीने करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक १०.४.२००७ रोजी (दिनांक १७.४.२००७) रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक ३०.३.२००७ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम १९७९ च्या नियम २० खाली प्रशासकीय कार्यवाही कां करण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण हि कारणे दाखवा नोटीस मिळताच ३ दिवसात सादर करावे असे ही आदेश दिलेला दिसतो. मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारे प्रशासकीय किंवा अन्य कार्यवाही झालेली दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही असे जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ४१ मुद्यांची असल्यामुळे सदरची माहिती तयार करुन देण्यास विलंब झाला व त्यानंतर मागितलेल्या अतिरिक्त माहितीच्या खर्चाचा भरणा करण्यास कळविले व ती माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात पाठविली. वास्तविक माहिती ही अर्जदारास अपीलकर्ता यांनी मागितली असता माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांचे कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविण्याची आवश्यकता नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या ४१ मुद्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जी माहिती कार्यालयात उपलब्ध असू शकत नाही अशी माहिती त्यांना बऱ्याच मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते व तसेच मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे. सदरची माहिती संकलीत करुन किंवा तयार करुन अर्थातच उपलब्ध करुन देण्यास विलंब होणार साहजिकच आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कळविणे आवश्यक असते. त्यातही माहिती तयार करुन देण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्याची छायांकिंत प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते त्यात बहुतांश माहिती ही छायांकित प्रती किंवा कागदपत्रांच्या स्वरुपात अर्ज केलेल्या वेळेस उपलब्ध असेलच असे नाही. असे असले तरी विलंब झाला असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या मागणी प्रमाणे माहिती ही मोफत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जी माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात पाठविण्यात आलेली आहे ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आंत अपीलकर्ता यांना जी माहिती तयार आहे त्या माहितीची छायांकित प्रत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) रजिष्टर पोष्टाचा व छायांकिंत प्रतीचा खर्च हा जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
बुलढाणा यांनी वैयक्तिक करावयाचा आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १०.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२३/२००७.

श्री. सुरेश मोतीराम डोरले,
११३, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स,
सेमिनरी हिल्स, नागपूर - ४४० ००६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. देवेंद्र प. रेवतकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा कृषि अधिकारी,
भंडारा - ४४१ ९०४.

श्री. अरुण कस्तूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
भंडारा - ४४१ ९०४.

..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भंडारा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Please refer my letter dated १२.१.२००७, १५.२.२००७, १७.३.२००७ & २४.४.२००७ on the subject Survey No. ८०/२ A/No. ५४ Damage of Agriculture Land due to Flood and requested to deposit relief into UCB bank A/n- ५८८१. In this regard please provide me the following information under the seesion ६ of Right to Information Act, २००५. १) What action has been taken on my above applications ? २) who is the officer nominated for the action ? ३) What decision taken by the officer ? ४) If decision taken by the officer for Sr No. ३, what action has been done ? ५) If decision has not been taken then who is the responsible officer for the same & what is the time period for this action ? Please provide the copies of explaination of the party if any. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून कृषि सहसंचालक, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. असे असले तरी दिनांक १९.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने तालुका कृषि अधिकारी, भंडारा यांना त्यानुसार दिनांक २३.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना पत्राद्वारे माहिती

उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यातही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात विचारलेले दिसून येते. दिनांक १९.५.२००७ च्या अर्जातून मागितलेली माहिती त्यात दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १८.७.२००७ रोजी विभागीय कृषि सहसंचालक यांनी तालुका कृषि अधिकारी, भंडारा यांना सदरचे अपील हस्तांतरण करुन श्री. सुरेश मोतीराम डोरले यांनी मागितलेली माहिती त्यांना तात्काळ पुरविण्यात यावे असे कळविण्यात आले असून सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्येही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी जरी अपीलकर्ता यांच्या प्रकरणामध्ये गुणवत्तेच्याबाबत निर्णय घेण्याचा प्रयत्न केला असला तरी माहितीच्या अर्जाप्रमाणे मात्र विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १९.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" जमा करावी.

२) अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक १९.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय ५ मुद्यांची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हा कृषि अधिकारी, भंडारा यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२४/२००७.

श्री. राजू किसन वानखेडे,
श्रीराम वार्ड, ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एस. डडमल,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहेरी,
जि. गडचिरोली.

श्री. एन. डी. इटकेलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत समिती, अहेरी,
जि. गडचिरोली.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. कार्यालयीन अधिक्षक हजर आहेत व जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी, अहेरी, पंचायत समिती यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री. वसंतराव सिताराम काळे, रा. स्वामी विवेकानंद वार्ड, गाडगे महाराज पुतळयाजवळ, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे राहात असून ते आपल्या पंचायत विभागात ग्राम विकास अधिकारी पदावर कार्यरत होते व दिनांक २८.२.२००३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांची जन्म दिनांक २५.२.१९४५ अशी आहे. त्यांना आतापर्यंत दिनांक ६.८.२००२ पासून १) नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता १५% थकबाकी, २) एकस्तर पदोन्नती (Fixation व थकबाकी), ३) वाढीव घरभाडे भत्ता थकबाकी आदी लाभ कां देण्यात आले नाहीत याचा अहवाल देण्यांत यावा. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना न मिळाल्यामुळे त्यांना दिनांक २१.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २२.८.२००७ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्याबाबतही निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १८.५.२००७ रोजीचे पत्र हे त्यांना पाठविले होते व त्याकरिता पत्राची प्रत सादर करुन जावक पंजीसुध्दा दाखल केलेली आहे व जावक पंजीमध्ये अपीलकर्ता यांना सदर पत्र पाठविल्याचे दिसून येते व त्यामुळे दिनांक १०.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे कार्यवाही विहित मुदतीत झाली असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. वास्तविक अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती अर्थातच निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात आहे व त्यामुळे त्या संबंधामध्ये आता अधिक्षक यांनी सांगितले की मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात सुध्दा आता कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे त्यांचा चेक आणलेला आहे. त्यामुळे सदरची माहितीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध होत असल्यामुळे व दिनांक १०.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे पूर्ण माहिती उपलब्ध होत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना दिनांक १०.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ११.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९१९-९२१/११.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२५/२००७.

श्री. आनंद रघुनाथ वैरागडे,
डॉ. आंबेडकर भवन समोर,
कॉलरी रोड, ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एफ. मस्के,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
(बांधकाम संधारण व सुव्यवस्था उपविभाग)
महाराष्ट्र राज्य विद्युत विज कंपनी मर्यादित,
जि. चंद्रपूर.

श्री. बी. डी. मते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
बांधकाम संधारण व सुव्यवस्था उपविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत विज कंपनी मर्यादित,
ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांधकाम स. व सु. उपविभाग, बल्लारशाह यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) पिठाच्या गिरणीकरिता विज पुरवठयाची मागणी केली असता तेव्हाचे विज पुरवठा घेण्याकरिता सादर केलेल्या कागदपत्राच्या नकला देण्यांत याव्या ? २) एप्रिल महिन्याच्या विद्युत बिलामध्ये चार्ज ऑफ एक्सेस डिमांड दिलेली आहे ती कशासाठी व कोणत्या कारणासाठी घेण्यांत आलेली आहे ? ३) मंजूर भार १० एच.पी. असून मंजूर KVA ४ अशा प्रकारे दर्शविलेली आहे. जेंव्हा की संलग्न भार १० एच.पी. असून कन्ट्रॅक्टर डिमांड ८ KVA दर्शविलेले आहे तर मंजूर ४ KVA कसा काय ? याची माहिती. ४) मी १.३.१९८६ ला आपल्या विभागाकडून विद्युत पुरवठा घेतला होता तो आता एप्रिल, २००७ च्या विद्युत बिलामध्ये डेट ऑफ कनेक्शन २.३.२००७ दर्शविला आहे तो कां व कशाकरिता बदल करुन दर्शविला आहे ? त्या दर्शविण्यामागे वितरण कंपनीचा उद्येश काय आहे ? ५) एप्रिल महिन्याचे आय.पी.चे बिल इंग्रजी भाषेमध्ये देण्यात आलेले आहे ते महाराष्ट्र राज्याच्या राज्यभाषा मराठीमध्ये कां देण्यात आलेली नाही

याचे कारण काय आहे ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे माहिती ही दिनांक १.६.२००७ रोजी पोष्टाने पाठविण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही व त्यामुळेच त्यांनी प्रथम अपील हे दिनांक १०.७.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १.६.२००७ मध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती ही तयार करुन दिलेली आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन उत्तर दिले तरी त्यातून पुन्हा प्रश्न उपस्थित होतात. असे असले तरी विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे असे जावक पंजीवरुन दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.८.२००७ रोजी सुध्दा उपकार्यकारी अभियंता यांनी दिनांक ८.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १.६.२००७ ला आपल्याला माहिती पाठविलेली आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे पुन्हा माहिती पत्राची झेरॉक्स आपल्याकडे पुन्हा माहितीकरिता पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु सदरची माहिती ही अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे मुद्येनिहाय माहितीची छाननी केल्यावर प्रत्येक मुद्यांच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विद्युत पुरवठा घेण्याकरिता सादर करण्याकरिता सादर केलेली कागदपत्रे ते १९८६ ची असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तसचे मुद्या क्रमांक २, ३ च्या संदर्भामध्ये ज्या नियमांचा आधारे देयके चार्ज केली जातात त्याचा आदेश उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्रमांक ४ प्रमाणे चुक झाली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केलेली आहे व ती चुक सुधारलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मुद्या क्रमांक ५ प्रमाणे मात्र देयके हे मराठी भाषेमध्ये असली पाहिजे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व ते योग्य आहे असे दिसून येते. मुद्या क्रमांक २, ३ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ८.५.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २, ३ च्या संदर्भामध्ये जे नियम असतील व जे आदेश असतील त्या नियमाची किंवा आदेशाची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) मुद्या क्रमांक ४ प्रमाणे जी सुधारणा करावयाची आहे ती सुधारणा करण्याच्या संदर्भात जी कार्यवाही केली असेल त्या कार्यवाहीची प्रत त्वरित त्यांना देण्यात यावी.

३) मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे देयके हे मराठी असेल याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई यांच्याकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ११.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**
HIREKHAN/BHUJI/९२२-९२४/११.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२८/२००७.

श्री. भानुदास भिमराव पातोडे,
मु. तामशी, पो. बटवाडी,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रमेश भवरलाल जैन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग प्रमुख (अंकेक्षण व तपासणी),
विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँक,
ता. जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
शाखा व्यवस्थापक,
विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँक,
शाखा बाळापूर, ता. बाळापूर,
जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अलमेलकर, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून शाखा व्यवस्थापक, विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँक, शाखा बाळापूर यांना खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आपल्या शाखेत ज्या गटांनी खाते उघडले आहे त्या गटांची यादी व पुर्तता केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती. २) कर्जाचे प्रस्ताव टाकलेल्या व कर्ज घेतलेल्या गटांच्या अधिकार पत्र, कर्ज मागणी पत्र, गटाचे जमा खर्च पत्रक, करार पत्र, कर्ज मंजूरी पत्र, अनुदान प्राप्त पत्र, विमापत्र व गटाने व्यवसायासाठी खरेदी केलेल्या बिलांच्या साक्षांकित सत्यप्रती. ३) बचत गटांच्या कर्जा विषयीचे बँकेचे धोरण स्पष्ट करावे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असेही नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.६.२००७ रोजी विहित मुदतीत माहितीचा अधिकार कायदयाच्या कलम ८(डी) व (जे) नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक ५.७.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.८.२००७ रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला आहे व अपील हे नस्तीकृत करण्यात आलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याही निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलाचे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे. १) That, the Respondent Bank would like to clarify its position by filing on record, the relevant facts of the case which are as under. २) That, it is most resectfully submitted that the Appellant, Shri Bhanudas Patode, had sought information from the Respondent Bank, with regard to :- (a) List of various Bachat Gats with all the relevant documents, having opened accounts with the Respondent Bank. (b) Loan applications/Loan proposals submitted by various Bachat Gats, related documents, authority letters, statements of income and expenses, letters of loan sanction, details of subsidies, insurance papers and bills pertaining to purchases made by such Bachat Gats, and (c) The policy of bank with regard to sanction of loans vis-a-vis various Bachat Gats. ३) That, the Respondent would like to humbly submit that the Appellant has moved similar Applications under the Right to Information Act in the past also. It is found that he is in the habit of seeking information from the Respondent Bank every now and then, on the ground that such information is required in public interest. In the past, the Bank has supplied necessary and relevant information to him, to which he was otherwise entitled. However, the information which is confidential in nature and which is in the form of personal nature vis-a-vis the customers of the Bank could not be supplied to the Appellant. ४) That, the Respondent would like to submit that the Respondent is a Regional Rural Bank sponsored by Govt. of India, Government of Maharashtra and Central Bank of India. It has its branches in five Districts of Vidarbha Region, i.e. Akola, Washim, Yavatmal, Buldhana and Amravati. It has about ९६ branches in these districts. ५) That, the information sought by the Appellant, which is the subject matter of the present Appeal, could not be provided to him in view of Sections ८(d) and (i) of the Right to Information Act. The detailed reasons for the same are as under. ६) That, like any other Bank, the Respondent Bank also functions as a Trustee vis-a-vis its customers. All the deposits of the Members of the Public are retained by the Bank in confidence till such time as the individual customers may desire. Against such deposits, loans are advanced/disbursed by the Bank to the borrowers after due scrutiny of the loan applications. Therefore, it is the prime duty of the bank to keep all the banking transactions confidential, whether in relation to its depositors or the borrowers. Otherwise, if such financial transactions are made public, it may have an adverse impact on the socio-economic situation in the local area and it may also further lead to personal rivalry, quarrels, violence, frauds etc. ७) That, it is humbly submitted that if the Bank discloses information to a third person with regard to the amounts deposited by the customers of the bank and /or if it discloses information pertaining to the loans advanced to the borrowers, the financial interest of the Depositors and the Borrowers can ce adversely affected. Therefore, it is the humble submission of the Bank that under Section ८ of the Right to Information Act, the information sought by the Appellant could not be provided to him as it is of highly confidential nature. ८) That, it is further submitted that even otherwise, in today's competitive world, the Respondent has to compete with other banks to ensure that its business interest is not adversely affected in any manner. Hence, if the information sought by the customers but it would also lead to disassociation of the customers with the Respondent Bank and that may adversely affect the business of the Bank. For this reason also, the

information sought by the Appellant has been rightly rejected by the Bank u/s ८(d) of the Act. ९) That, it is humbly submitted that names and addresses of the Depositors/Borrowers, their respective amounts of deposits/loans, agreements with regard to the loans disbursed by the Bank etc. are very vital documents for the bank in case the bank finds that the Borrowers have failed to repay the loan amount. Therefore, if the information is leaked out at any stage, it would definitely and adversely affect the banking business of the Respondent. For this reason also, the information could not be supplied to the Appellant. In fact, if such information is provided to any third party, the regular customers and borrowers of the Bank would definitely disassociate themselves with the Respondent Bank. १०) That, it is humbly submitted that the Government has provided various facilities to Bachat Gats particularly with regard to those who are below poverty line. The Government is making efforts to encourage formation of more and more Bachat Gats and is trying to assist them financially in terms of the directions of the Reserve Bank of India, NABARD etc. The representatives of such financial institutions also assist the Bachat Gats to secure loans from the banks. ११) That, however, it is noticed that some individuals try to pretend to be the Representatives of the non-government organizations, secure information from the Banks about Bachat Gats, pass on the said information to Women Finance Development Corporation, District Rural Development Authority, NABARD, Reserve Bank of India etc. and without making any efforts on their own, they try to claim remuneration for the services provided as non-government representatives. Therefore, to avoid such a precarious situation, the Bank has rightly rejected the request of the Appellant for information in question. १२) That, it may also be appreciated that during the relevant period, as many as ५९ Bachat Gats have opened accounts with the Respondent Bank. For each Bachat gat, the information and the documents run upto ६० pages. Thus, for ५९ Bachat Gats, the information runs into more than ३५०० paes. Further, during the relevant period, loan has been disbursed to more than २८ Bachat Gats. In each loan transaction, the documents run into about १०० pages. Therefore, in २८ loan cases, the information runs into about २८०० pages. Therefore, the total number of pages with regard to the savings account and loan accounts would run into more than ६५०० paes. The Appellent has not pinpointed as to why he wants to have such voluminous information from the Respondent Bank. Moreover, the certificate that the Appellant that he is below poverty line is actually in the name of Patode Bhimrao Jyotirm and it is not in the name of Patode Bhanudas Bhimrao. Therefore, it is submitted that the Appellant has tried to mislead the bank in this regard. १३) That, it is once again submitted that the information sought to by the Appellant is vague and at the same time, it is quite voluminous. No reasons have been furnished as to why this information is required by the Appellant. Further, the Appellant, being a third party, not connected with any of the loan transactions between the Bank and its borrowers, ought to have explained to the Bank as to why and under what circumstances he required Xerox copies of each and every loan transaction that took place between the Bank and its borrowers/Bachat Gats. The Bank is of the view that the Appellant wants to gather such information either for his personal interest or to settle score with the Bachat Gats operating in the local area. There is absolutely nothing on record that would

support the demand of the Appellant that he has sought the information in public interest or that he is going to benefit the interest of the public at large by collecting such information. १४) That, for all these reasons, the information, sought by the Appellant could not be provided to him in view of Section ८(d) and (i) of the Right to Information Act. १५) That, to the best of the knowledge of the Bank Officials, the Appellant claims to be a journalist in the local area and the Bank has reliably learnt that complaints have been registered against him by the local people, with the Govt. Authorities and the Police, of veiled threats, harassment etc. Hence, the Bank feels that the bonafides and the intention of the Appellant in seeking such voluminous record are also in doubt. १६) That, earlier also, the Appellant had moved this Hon'ble Appellate Authority by filing appeal no. १८१४/२००७. On that occasion also, this Hon'ble Authority was pleased to reject the appeal of the Appellant vide order dated ३.१०.२००८. १७) That, for all these reasons, the Appeal as filed is false, frivolous and misconceived. Appeal itself is devoid of substance. It appears that the Appeal has been filed only to harass the Bank and its officers without any valid reason. Hence, the Appeal deserves to be dismissed summarily and by imposing exemplary costs on the Appellant for abuse of the process of law. दाखल केलेले आहे. वरील खुलाश्यावरुन असे दिसून येते की, मागितलेली माहिती ही बँकेच्या खातेदाराची आहे. अर्थात बँकींग नियमाप्रमाणे बँकेच्या खातेदाराची माहिती ही उपलब्ध करुन देता येत नाही व त्याच उत्तराचे आधारे जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(डी)(जे) चा आधार घेतला आहे व ते योग्य आहे. ८(डी)(जे) प्रमाणे खातेदाराची माहिती ही वैयक्तिक माहिती आहे व त्याचप्रमाणे व्यापक जनहित साधेल असे दिसून येत नाही व त्याचप्रमाणे माहिती अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९२६-९३२/११.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३३०/२००७.

श्री. भानुदास भिमराव पातोडे,
मु. तामशी, पो. बटवाडी,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनचनकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जि. अकोला.

श्री. जी. जे. इंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
खरेदी अधिकारी,
जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,
जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००७ रोजी (प्राप्त दिनांक ३.५.२००७) जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) वरील तिन्ही विक्रेत्यां विषयी कोणती पात्रता आवश्यक आहे ? त्यासाठी कोणते नियम, अटी व मार्गदर्शन तत्वे आवश्यक आहेत ? २) बाळापूर तालुक्यातील घाऊक व अर्धघाऊक परवाना धारकांनी खरेदी केलेल्या मालाच्या बिलांच्या सांक्षांकित सत्यप्रती. ३) साठा व विक्री रजिस्टरच्या आणि किरकोळ विक्रेत्याने खरेदी केलेल्या पावत्यांच्या साक्षांकित सत्यप्रती. ४) किरकोळ विक्रेत्यांची यादी. ५) विक्रेत्यांची निवड करतांना कोणते निकष लावले जातात ? (संबंधित जी.आर. साक्षांकित सत्यप्रती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक ३१.५.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी सबब तहसिलदार, बाळापूर यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेला अर्ज न्याय प्रक्रियेमध्ये असल्याने या कार्यालयामध्ये माहिती अधिकारान्वये माहिती मिळणेस्तव परत प्रकरण नव्याने सुरु करणे व त्याच अर्जाचे अपील करणे हे उचित नसल्याने आपण उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांचेकडे अपील दाखल केल्यास आपले अर्जानुसार माहिती उपलब्ध होईल व आपणास योग्य तो न्याय मिळेल असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.६.२००७ रोजी उपरोक्त विषयानुसार जिल्हा पुरवठा

अधिकारी, अकोला हे माहिती अधिकारी नसून अपील अधिकारी आहेत. तसा त्यांचे कार्यालया समोर बोर्ड लावलेला आहे. त्या कार्यालयाचे माहिती अधिकारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला हे असून अपील अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी असल्याने आपला अपील अर्ज त्यांचेकडे पाठविण्यात येत आहे. याबाबत नोंद घ्यावी व यापूढे त्यांचेशी संपर्क करावा असे कळविलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, बाळापूर यांना हीच माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषा प्रमाणपत्र दाखल करतात व व्यापक प्रमाणातील माहिती मोघम स्वरुपात मागत असतात. आजच आयोगापुढे अपीलकर्ता यांच्या तिन्ही अपीलांची सुनावणी आहे. तिन्ही अपीलामध्ये अशाच प्रकारची वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणातील दारिद्र रेषा प्रमाणपत्र जोडून माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांचा व्यवसाय दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदीचा पुरेपूर माहिती असून सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी यांना त्रास देण्याचा उद्येशाने माहिती मागत असतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९३३-९३५/११.१२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२६/२००७.**

श्री. शत्रधुन रामभाऊ भालतिलक,
मु. पो. कसुरा,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला.

श्री. अशोक दाभाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
कसुरा, ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१२.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. संजय उंबरकर, वरिष्ठ सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००७ रोजी अध्यक्ष, ग्रामिण पाणी पुरवठा स्वच्छता समिती, कसुरा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. विहीरीचा निधी मंजूर किती करण्यात आला व किती खर्च करण्यात आला तसेच मिटर घर खोली करिता निधी किती आला व किती खर्च करण्यात आला. तसेच वापरण्यात आलेली पाईप लाईन ही लोखंडी किती पी.व्ही.सी. वापरण्यात आली व या पाईप लाईन वर किती निधी आला व किती खर्च करण्यात आला याबाबत सत्य प्रतिसह माहिती देण्यात यावा. तसेच वापरलेले मटेरीयल सिमेंट, लोहा, गिट्टी याकरिता किती निधी आला व कोणकोणत्या कामावर किती निधी खर्च करण्यात आला तसेच या कामाकरिता आलेल्या मटेरियलचे मिस्त्रण कशा पध्दतीने तयार करण्यात आले ते मिक्सर मशीनद्वारे तयार करण्यात आले किंवा मंजूरांच्या हाताने तयार करुन या कामावर वापरण्यात आले. तसेच पाण्याची टाकी राहत्या घरापासून किती मिटर अंतर असावी याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. तसेच महाजल योजनेच्या कामाकरिता शासनाकडून आलेला निधी किती व कशा प्रकारे खर्च करण्यात आला याची सत्य प्रतिसह माहिती व आलेल्या निधीच्या संपूर्ण देयकाच्या सत्यप्रतीसह माहिती देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार व टपालाद्वारे देण्यात यावी त्यासाठी लागणारा टपालाचा अतिरिक्त खर्च

मी शासनाच्या नियमानुसार देण्यास तयार आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.६.२००७ रोजी सचिव, ग्रामपंचायत कसुरा यांनी महाजल पाणी पुरवठा योजनेच्या माहितीचे सर्व कागदपत्र जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अकोला यांचेकडे प्रत्येक महिण्याचे हिशोब सादर असतात तेंव्हा आपण जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अकोला येथे पैसे भरुन संबंधित पाणी पुरवठा योजनेची माहिती घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.७.२००७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी माहिती त्यांचे कार्यालयात दिनांक ३१.७.२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आवश्यक त्या सर्व दस्ताऐवजासह आपण स्वतः उपस्थित राहावे असे कळविलेले असून अपीलकर्ता यांना सुध्दा सदरच्या पत्राची प्रत दिलेली असून दिनांक ३१.७.२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस स्वतः उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १६.७.२००७ रोजी सुध्दा कार्यकारी अभियंता यांनी अध्यक्ष/सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, कसुरा यांना सदरच्या सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु दिनांक ३.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना आपले आदेशाची अवहेलना करुन मला मी मागितलेली माहिती मला अजून पर्यंत देण्यात आलेली नाही. मी संपूर्ण भरणा भरण्यास तयार आहे व तसेच कसुरा येथील पाण्याच्या टाकीचे जागेचे स्थलांतर करणे बाबत सुध्दा निर्णय प्रलंबित ठेवलेला आहे. आपण सदर प्रकरणाची योग्य ती पुनश्च दखल घेऊन मला माहिती देण्यात यावी. दिनांक ३१.७.२००७ रोजी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश अध्यक्ष/सचिव यांना दिलेले दिसून येते व त्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. त्यावर अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, कसुरा यांनी रुपये ४००/- चा भरणा करण्याची पावती दिनांक १४.८.२००७ रोजी पाठविण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती घेण्यास नकार दिलेला आहे असे दिसून येते. रुपये ४००/- चा भरणा करण्यास सुध्दा नकार दिलेला आहे व ही बाब त्यांना दिनांक ८.७.२००८ रोजी कळविण्यात आलेले आहे व श्री. वि. से. ताथोड व श्री. प्र. सा. इंगळे साक्षीदार असे दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००८ रोजी लोकशाही दिनी तक्रार केलेली दिसून येते. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (महाजल योजना) यांच्या बैठकीमध्ये आपल्या समोर झालेल्या मिटींगमध्ये श्री. शत्रुध्द रामभाऊ भालतिलक यांना माहिती देण्यात यावी अशा प्रकारचा ठराव सुध्दा झालेला दिसून येतो. दिनांक ३१.७.२००७ रोजी ग्राम पंचायत कसुरा येथे अर्जदार श्री.शत्रुध्द रामभाऊ भालतिलक, कसुरा यांनी मागितलेल्या माहितीच्या अधिकारा विषयी महाजल पाणी पुरवठा योजनेचे माहिती पत्रक व त्याचे सत्यप्रत बिल देण्यासाठी बोलाविले असता ते हजर झाले नाहीत. त्याकरिता पाच पंचा समक्ष तसे लेखी स्वरुपात लेखी घेऊन पंचनाम्याचे कागदपत्र जिल्हा परिषद, मुख्य अधिकारी यांना सादर करण्यात येत आहे. खालील एकूण ६ पंच मंडळ व ५ सदस्य व सरपंच यांच्या सहया दिसून येतात. पुन्हा दिनांक ७.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती देण्यास ग्रामसेवक, श्री. अंभोरे व इतर असे एकूण ५ नागरिकांची साक्ष घेण्यात आली. या पंचमंडळी समक्ष असे लिहून घेण्यात आले की, श्री.शत्रुध्द रामभाऊ भालतिलक, कसुरा हे माहिती घेण्यास तयार नसुन त्यांनी वर अपील केलेली आहे मोठया साहेबां जवळून माहिती घेऊ असे बोलले. करिता पाच पंच मंडळीच्या स्वाक्षरी घेतलेले दिसून येते. तसेच दिनांक ३१.७.२००७ रोजीचे पत्र अपीलकर्ता यांना रुपये ४००/- चा भरणा करावा असे सचिव, ग्रामपंचायत कसुरा यांनी दिलेले दिसून येते. दिनांक २२.८.२००७ रोजी सुध्दा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, अकोला यांनी पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २२.८.२००७ रोजी रुपये ४८६/- भरुन माहिती घेऊन जावी असेही पत्र दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार असून सुध्दा माहितीच्या करिता खर्चाचा भरणा केलेला नसल्याने माहिती उपलब्ध होऊ शकली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २६.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या खर्चाचा भरणा सचिव, ग्रामपंचायत, कसुरा यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत केल्यास त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ११.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९३६-९३९/११.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३३२/२००७, अपील क्रमांक २३३३/२००७ व अपील क्रमांक २३३४/२००७.

श्री. माधव अर्जुन खुटेमाटे,
प्लॉट नं. १९, चवरे ले आऊट,
गुरुद्वाराच्या मागे, पाण्याच्या टाकीजवळ,
चंद्रपूर (तुकुम), जि. चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. डी. पेंद्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २३३२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून अधिक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मी अधिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर काम करीत असतांना दिनांक २०.१.२००७ ते ९.४.२००७ पावेतो परावर्तीत रजा उपभोगली. सदर प्रकरणातील कार्यालयीन टिपणीचे (Note sheet) प्रमाणित प्रतीची मला आवश्यकता आहे. त्याकरिता नियमानुसार लागणारी फी मी स्वतः भरण्यास तयार आहे. करिता उपरोक्त टिपणीची प्रमाणित प्रत मला पुरविणेस विनंती आहे. सदरची माहिती मी स्वतः आपले समक्ष येऊन घेण्यास तयार आहे. करिता सदरची माहिती मला कधी मिळेल याविषयी तारीख कळवावी. म्हणजे मला योग्य वेळी उपस्थित होऊन प्राप्त करुन घेता येईल. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.६.२००७ रोजी अधिक्षक, भुमि अभिलेख, चंद्रपूर यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कळविणेत येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये परिशिष्ट 'अ' विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा त्यानंतर पुढील योग्य कार्यवाही करणेत येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे प्रथम अपील दाखल करण्याच्या ऐवजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील हे अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये प्रथम अपीलाचे निर्णयाविरुध्द दाखल करता येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले नसल्यामुळे सदरचे द्वितीय अपील म्हणून हे विचारात घेणे आवश्यक नाही. परंतु अपीलकर्ता यांनी अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी दिनांक १८.७.२००७ रोजी अधीक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे व अधिक्षक भुमि अभिलेख हेच प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ मधील दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक होते. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे

की, त्यांनी मागितलेली माहितीचे विवरण हे त्यांच्या अर्जात आलेले आहे त्यामुळे नमुन्यात अर्ज दाखल केला पाहिजे असा अर्थ नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना सदरच्या त्यांच्या दिनांक ६.६.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक २३३३/२००६ मध्ये दिनांक ४.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी कार्यालय अधीक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांच्याकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने पुन्हा अपीलकर्ता यांना परिशिष्ट अ विहित नमुन्यात अर्ज सादर करावा असे सूचित केले आहे. परंतु आपण नमुन्यात अर्ज सादर केलेला नाही. तरी आता विहित नमुन्यात अर्ज सादर करुन नक्कल फी रुपये २०/- या कार्यालयात भरणा करावी त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत पुरविण्यात येईल. तरी आपला अर्ज नस्ती करण्यात येत आहे. सदरच्या अपीलामध्ये सुध्दा अधीक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे वरील अपीलाप्रमाणेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. असे असले तरी सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २३३४/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००७ रोजी माहिती अधिकारी अधीक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर यांच्याकडे खालील प्रमाणे सांख्यिकीय माहिती मागितलेली दिसून येते. १) कार्यालयास किती अर्ज प्राप्त झाले ? २) माहिती अधिका-यांने किती अर्ज स्वतः स्विकारुन अर्जदारास पोचपावत्या दिल्या ? ३) टपालातून किती अर्ज प्राप्त झाले ? ४) परिशिष्ट 'अ' विहित नमुन्यात किती अर्ज प्राप्त झाले ? ५) परिशिष्ट 'अ' विहित नमुन्यात नसलेल्या किती अर्जावर कारवाई न करता अर्जदारास पुर्ततेसाठी कळविण्यात आले ? ६) परिशिष्ट 'अ' विहित नमुन्यात किती अर्ज कार्यवाहीवर शिल्लक आहेत ? सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये परिशिष्ट अ विहित नमुन्यात अर्ज सादर केलेले नाही. सबब आपला अर्ज निकाली काढलेला आहे असे दिनांक १८.७.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. सदरचे पत्र सुध्दा अधीक्षक, भूमि अभिलेख, चंद्रपूर यांनाच दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही अपीलकर्ता यांना त्यांच्या दोन अर्जाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही तो अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपीलकर्ता यांच्या वरील दोनही अपीलाचे संदर्भात मागितलेली माहिती ही त्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी प्रक्रिया करुन उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु निव्वळ कार्यालयातील हाताखालील कर्मचाऱ्यांची हलगर्जीपणामुळे असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही या कारणामुळेच अर्ज निकाली दिसून येतो. एकाच कार्यालयामध्ये कार्य करीत असतांना अशा प्रकारची वागणूक ही कोणत्याही कार्यालयातील अधिकारी शिस्तीच्याप्रमाणे योग्य नाही त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा अधीक्षक यांना ताकीद देणे आवश्यक आहे म्हणून या सर्व माहितीच्या अधिनियमाच्या तरतुदी हया योग्यरितीने नियमाप्रमाणे हाताळल्या जातील आवश्यक आहे. अन्यथा नियमाप्रमाणे शास्तीची तरतुद आहे. त्यांनी शास्ती समोर जाणे, त्यांची सुनावणी संबंधितांनी घेणे आवश्यक आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २३३२/२००७ व अपील क्रमांक २३३३/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत.

२) अपील क्रमांक २३३४/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अधिक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर यांच्या कार्यालयातील संबंधित जनमाहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे व सदरच्या ताकीदची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेणे आवश्यक आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९४०-९४३/१२.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३४१/२००७ व अपील क्रमांक २३४२/२००७.

श्री. अजय वसंतराव निनावे,
प्लॉट नं. ३, संजय गांधीनगर,
रिंगरोड, पिपळा रोड, नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
मराठा विद्या प्रसारक समाज,
स्व.भाऊसाहेब सुर्वे विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय,
छोटा ताजबाग, रघुजीनगर, नागपूर.

श्री. रमेश ना. काटे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
स्व.भाऊसाहेब सुर्वे विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय,
छोटा ताजबाग, रघुजीनगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००७ व १०.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनमुती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांनी कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत.

२. अपील क्रमांक २३४१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे श्री. प्रभाकर उपासराव चव्हाण, स्व. भाऊसाहेब सुर्वे विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, छोटा ताजबाग, रघुजीनगर, नागपूर यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१०.२००६ रोजी मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ च्या पत्राप्रमाणे दिनांक १३.११.२००६ रोजी संबंधी आपण विचारणा केलेली माहिती शाळेने दिनांक २०.१०.२००६ ला आपणास पाठविली असल्याने या कार्यालयामार्फत पाठविण्यात येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी कागदपत्रे दाखल करतांना उलटसुलट कागदपत्रे दाखल केलेली आहेत व स्वतः हजर नसल्याने सदरच्या कागदपत्राचा संदर्भ कळून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचा दिनांक ४.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे पुन्हा दिनांक ३०.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती

माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे उपलब्ध असेल ती माहिती त्यांना रजिष्टर पोष्टाने विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २३४२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्व.भाऊसाहेब सुर्वे विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, छोटा ताजबाग, रघुजीनगर, नागपूर यांचेकडे महाविद्यालयामध्ये चपराशी पदावरील प्रभाकर कृष्णराव काळे यांचे नियुक्ती पत्राची सत्यप्रत मिळण्याबाबत. २००६ ते २००७ असा कालावधी देऊन माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना संस्थेचे अध्यक्ष, मराठा विद्या प्रसारक समाज यांनी नकार दिलेला आहे असे दिसून येते. त्यानंतर अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ९.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.७.२००७ च्या अपीलाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता त्यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ४.१०.२००६, दिनांक ३०.१०.२००६ व दिनांक १३.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १५.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९४४-९४६/१५.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३५५/२००७.

श्री. यशवंत नत्थुजी लंजे,
मु. पो. ता. अर्जुनी मोरगावं,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. एस. के. खेनरजाल,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
वनविभाग, नागपूर.

श्री. एस. व्ही. अलुकवार,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन)
नागपूर वनवृत्त, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) नागपूर यांचे कार्यालयात आर्थिक वर्ष २००३-०४ ते २००५-०६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. गोंदिया वन विभागा अंतर्गत साग जडयाच्या खरेदी प्रकरणात श्री. वाय. एन. लंजे, श्री. बडोले, श्री. कडव व श्री. मेश्राम यांना निलंबित करण्यात आले होते. त्या निलंबन व इतर कार्यवाही संबंधाने मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक नागपूर यांचे कार्यालयातील खालील प्रमाणे कागदपत्राच्या प्रती पुरविने. १) श्री. वाढई यांनी उपवनसंरक्षक, गोंदिया यांना सादर केलेल्या ९/१७.५.२००५ च्या अहवालासोबत उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी केलेल्या शिफारस पत्राची प्रत. २) श्री. वाढई यांचे ९/१७.५.२००५ चे अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचे कार्यालयातून आयुक्त, नागपूर यांना कार्यवाही करणे बाबत पत्र क्रमांक कक्ष/५/दक्षता/लले/१६१३, दिनांक ७.६.२००५ प्रमाणे जे पत्र लिहिण्यात आले त्या पत्राची कार्यालयीन टिपणी. ३) मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक कक्ष/५/दक्षता/लले/१६१३, दिनांक ७.६.२००५ प्रमाणे आयुक्त, नागपूर यांना कर्मचाऱ्यां विरुध्द कार्यवाही करणेबाबत कळविले होते. त्यानुसार आता पर्यंत किती कर्मचा-यां विरुध्द कार्यवाही करण्यात आली, किती कर्मचाऱ्यांना दोषारोप पत्र देण्यात आले त्याची माहिती खालील तक्त्यामध्ये द्यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना विषयांकित प्रकरणी अद्यापी चौकशी प्रक्रिया सुरु असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(एच) चे प्रावधानानुसार चौकशी प्रक्रियेत अडथळा येत असल्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही. असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झ

ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २७.४.२००७ रोजी आपणांकडून मागितलेल्या माहितीच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या कलम ८(१) ची उपयोगिता संपुष्ठांत आल्याबाबतचा अहवाल पोलीस विभाग व आयुक्त कार्यालय यांचेकडून विचारण्यात येत आहे. संबंधित कार्यालयांनी आपण विषद केल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण केली असल्यास सदर माहिती आपणांस यथावकाश पुरविण्यांत येईल. असे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यानंतर मात्र आवश्यक माहिती प्राप्त झाल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे दिनांक १९.११.२००७ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांस शासन शुल्क जमा केले व त्यांनी दिनांक १४.१.२००८ रोजी माहिती पुरविण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच अपीलकर्ता आज विना अनुमती गैरहजर आहेत. त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य होते त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.२.२००७ च्या अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य होता व त्यानंतर मात्र अपीलकर्त्यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९४८-९५०/१६.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३५२/२००७ व अपील क्रमांक २३५३/२००७.

श्री. अनुपसिंग मोहनसिंग परीहार,
प्लॉट नं. १३३, पांडे-ले-आऊट,
खामला, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एल. कडू,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. योगीराज अवधुत, शाखा अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २३५२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (A) Regarding flats of ७९० sq.feet under lokHousing Scheme Phase I/II on Hill Road. (a) (i) Total number of Flats of ७९० sq. feet approximate area actually constructed and offered for allotment for which applications were invited under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. (ii) Out of these, how many such flats of ७९० sq. feet approx area has terrace and what is the approx area of terrace. (iii) Name and address of the persons to whom such flats of ७९० sq-feet approx area with terrace were allotted and. (iv) by what mode and at what cost/price. (b) (i) Number of applications accepted for allotments of flats of ७९० sq. feet area under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. (ii) Names and addresses of the persons who applied for the flats of ७९० sq. feet area under the said Phase-II Scheme. (c) (i) Names and address of the persons to whom such flats of ७९० sq.feet approx with serial number of such flats and respective cost/price thereof, allotted under Lok Housing Scheme Phase I on Hill Road. (ii) Please provide copy of the allotment proceedings/documents in that regard. (d) (i) Total

number of flats of ७९० sq.feet approx area with their serial number allotted to the applicants under Lok Housing Scheme Phase II on Hill Road alongwith. (ii) the names and address of the persons to whom such ७९० sq.feet flats were allotted and at what cost/price. (e) (i) If all the flats of ७९० sq.feet approx actually constructed under the said Phase II scheme, and for which applications were called and accepted too by the NIT, are not allotted to all such applicants then please intimate the reason therefore. (ii) Please provide the copy of the order/decision refusing to allot the said flats of ७९० sq.feet approx flats to the applicants of the said Phase II Scheme. (f) (i) Please intimate as to under what circumstances and who decided to allot the flats of ७९० sq.feet approx area to the applicants of said Phase-I scheme and not to allot such flats to the applications were accepted for allotment of ७९० sq.feet flats under aforesaid Phase-II Scheme. Copy of order sheet about such decision may please be provided. (g) (i) Please also intimate whether the flats of ७९० sq.feet approx area, were allotted to the Phase I Applicants, on the cost/price (per sq.feet) quoted in the advertisement inviting applications for Phase-I Scheme or the said flats of ७९० sq.feet approx area were allotted to them on the cost/price quoted in the adcertisement inviting applications under said Phase-II Scheme. (ii) Please provide the copy of the proceedings/order sheet about the decision to allot ७९० sq.feet approx area flats to the applicants of Phase-I on the price/cost mentioned in the advertisement of Phase-I and not on the cost/price as indicated in the advertisement inviting applications under said Phase-II Scheme. (B) Regarding flats of ७२४ sq.feet area having terrace constructed under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road. (a) (i) Total number of Flats of ७२४ sq.feet approx with terrace (specifying area of terrace) constructed under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road with dates of completion of construction of such flats. (ii) Please also intimate the serial numbers allotted to such flats. (b) (i) Out of the aforementioned flats with terrace, when and how many such flats of ७२४ sq.feet approx with terrace, were allotted to the applicants and how many such flats were not allotted and why not allotted. (ii) Please furnish the names with address of the persons alongwith their application number and date of application, to whom such flats of ७२४ sq.feet area with terrace were allotted under Lok Housing Scheme Phase-I & Phase-II on Hill Road. (iii) Please also give the mode/methodology of allotment and copy of the such decision. (c) (i) Please intimate the dates and mode of allotment of the said flats with terrace. (ii) Whether the price/cost of such flats of ७२४ sq.feet approx area with terrace was charged as per the rates quoted in the advertisement of Phase-I or Phase-II. (iii) If the said flats with terrace were decided to be allotted on the price/cost as mentioned in the advertisement of Phase-I, then the rationale behind such decision and copy of such decision may please be provided. (d) (i) Whether the allotment of such flats of ७२४ sq.feet approx area with terrace was made by auction sale. If not, then the reasons therefore. (ii) Please supply the copy of decision/order sheet in that regard. (e) (i) Total number of flats of ७२४ sq.feet approx with terrace, their serial number, and names with address of the persons to whom such flats of ७२४ sq.feet approx area with terrace were allotted under Lok Housing Scheme Phase-I & Phase-II on Hill Road. (ii) Please also give the mode/methodology of allotment of such flats with terrace and copy of the such decision. (f) If all the flats of ७२४ sq.feet with

terrace actually constructed under the said Phase-I & Phase-II Scheme are not allotted to all the applicants whose applications were accepted by the NIT, then please give the reason therefore. (ii) Please intimate as to why all such flats were not allotted earlier and how the remaining such flats with terrace were decided to be allotted and to whom. (C) General information about allotment of flats of ७२४ sq.feet with terrace and ७९० sq.feet flats. (a) Total number of flats constructed under Phase-I and Phase-II Scheme under Shopping cum Residential Comples on Hill Road. Please give flat numbers allotted to such flats, approx area of flat, area of terrace. (b) (i) Please Provide the names of persons with their application number and date thereof, who had applied for change of flats or had any grievances on allotment of a particular flat. (ii) Please mention, in brief, the nature of grievances/praye made in such applications. (c) (i) Action taken on the applications, alongwith the copies thereof, received for change of flats of having grievances. (ii) Please provide the copy of the order sheet/decision on such applications. (D) Information about the auction sale ७१९ sq.feet approx. flats with terrace, conducted on ४.५.२००७ (a) (i) List of the persons with address who participated in the auction sale with the details of flats allotted earlier to them, their application number and date thereof for allotment of flat under the said Phase-I/Phase-II in the Lok Housing Scheme in Shop cum Residential Complex on Hill Road. (ii) Please provide copy of the attendance sheet of auction held on ४-५-२००७. (b) Please provide the copy of the all the relevant documents/proceedings including the notesheet/order sheet/decision contained in the file relating to the auction conducted on ४.५.२००७ fr sale of three flats of ७१९ sq.feet apporx.area. Whether information is required by post or in person. In person to be handed over to the applicant after giving due intimation therefore. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीकरिता रुपये ३३८/- आवश्यक शुल्क सोबत जोडलेल्या मागणी पत्रामध्ये नमुद केलेल्या दिनांकाच्या आंत पटवावी आणि माहिती प्राप्त करावी. असे कळवून सहपत्र मागणी पत्राच्या दोन प्रती जोडलेल्या दिसून येतात. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १९.६.२००७ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो व त्यानंतर माहिती व दस्तावेज दिनांक २२.६.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.८.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांनी आवश्यक तेवढी माहिती वेगळी करुन देणे अभिप्रेत आहे. परंतु तसे न करता नस्तीमधील उपलब्ध आवश्यक/अनावश्यक कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती रुपये ३०८/- घेऊन पाठविण्यांत आल्या. यावरुन सुसंगत अशी माहिती, माहिती अधिकारामध्ये दिलेली नाही व अशी सुसंगत माहिती १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक १७.८.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सुसंगत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती मुदतीत मिळाली नाही व अपूर्ण माहिती दिली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना ७९० स्वेअर फिटच्या विवरणाचे संदर्भात संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहिती मध्ये त्यांनी प्रश्न व कारणे सुध्दा विचारलेली आहेत. जी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहिती विलंबाने देण्याच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी वैयक्तिकरित्या माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्यास वैयक्तिकरित्या ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाणे आवश्यक असते व त्यावेळेस माहिती उपलब्ध झाली नाही तर आक्षेप घेणारे पत्र द्यावयाचे असते. परंतु ३० दिवसाचे आंत

जनमाहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता हे माहिती घेण्याकरिता गेले होते याचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळेच दिनांक २.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अतिरिक्त शुल्काचा माहितीचा मुद्दा दिसतो ती विहित मुदतीत आहे. अपीलकर्ता यांनी अतिरिक्त शुल्काची भरणा केलेला असल्यामुळे अधिनियमाचे कलम ७ नुसार मागणी पत्र नाही ते भरणा केल्यापर्यंतचा कालावधीत हा वगळून माहिती व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती दिनांक २२.७.२००७ रोजी उपलब्ध झाली असल्यामुळे ती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपूर्ण किंवा अनावश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याचा संदर्भामध्ये विचार केल्यास अपीलकर्ता यांनी जे माहितीचे विवरण केलेले आहे त्या माहितीच्या विवरणामध्ये अतिव्यापक प्रमाणामध्ये माहिती मागितलेली असल्यामुळे संदर्भीत विवरणाचे नोटीस छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कोणत्याही प्रकारे माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती ती कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. ७२४ स्वेअर फिट फ्लॅटच्या संदर्भामध्ये सुरुवातीला माहिती उपलब्ध करुन दिली होती असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु त्याबाबत विश्लेषण प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात आलेले आहे. त्यातही विश्लेषण देण्याची आवश्यकता नसते. वर नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक कार्यवाहीच्या वेळेस उपलब्ध झालेली कागदपत्राची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व त्यातून अपीलकर्ता अर्जदार यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती ही घेता येते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना काही माहिती मिळालेली नाही. परंतु कागदपत्राचे अवलोकन केले असता त्यात संबंधित माहितीचे संदर्भातील कागदपत्रे ही उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे त्यातील प्रत्येक मुद्यातून विचारलेल्या प्रश्नाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती घेता येईल. पुन्हा एक वेळ माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही हे नमुद करणे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २३५३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी (दिनांक २८.११.२००६) कार्यकारी अभियंता तथा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (i) Subject matter of the information : Regarding construction and allotment of flats of ७९० sq. feet area to the applicants under Lok Housing Scheme Phase-I & Phase-II on Hill Road, Nagpur. (ii) The period to which the information relates : From the date of opening of the Lok Housing Schene Phase-I on Hill Road till १८.११.२००६ when the alleged draw for allotment of flats under the Lok Housing Scheme Phase-II was conducted. (iii) Description of the information required : (A) Regarding flats of ७९० sq.feet under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road. (a) Number of Flats of ७९० sq. feet area proposed to be constructed and for which applications were invited under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road. Please provide copy of the sanctioned map/plan for construction of said flats of ७९० sq. feet area under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road. (b) Number of flats of ७९० sq.feet area actually constructed under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road and serial number of flats allotted to those flats. (c) Number of applications received and accepted for allotments of flats of ७९० sq.feet area under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road. (d) Total number of flats of ७९० sq.feet flats with their serial number, included in the draw and allotted by lot under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road. (e) If all the flats of ७९० sq.feet actually constructed under the said scheme are not included in the draw and consequently are not allotted to all the applicants whose applications were accepted by the NIT, then please give the reason therefor. (f) Date of draw for allotment of flats of ७९० sq.feet flats under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road alongwith the copy of the draw proceedings/documents, indicating the serial

number of said flats of ৬৭০ sq. feet and name of the applicants in whose favour the said flats have been allotted by drawing lots. (g) If the Contractor/officials concerned of the NIT, has failed to construct the flats of ৬৭০ sq.feet area flats under Lok Housing Scheme Phase-I on Hill Road, as per sanctioned map/plan, then reason for such failure and action taken against the contractor/officials therefore. (B) Regarding flats of ৬৭০ sq. feet under Lok Housing Scheme Phase-II on Hill Road. (a) Number of flats of ৬৭০ sq.feet area proposed to be constructed and for which applications were invited under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. Please provide copy of the sanctioned map/plan for construction of said flats of ৬৭০ sq.feet area under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. (b) Number of flats of ৬৭০ sq.feet area actually constructed under Lok Housing Scheme Phase II on Hill Road and serial number of flats allotted to those flats. (c) Number of applications received and accepted for allotments of flats of ৬৭০ sq.feet area under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. (d) Total number of flats of ৬৭০ sq.feet flats with their serial number, included in the draw and allotted by lot under Lok Housing Scheme Phase II on Hill Road. (e) If all the flats of ৬৭০ sq.feet actually constructed under the said scheme (Phase II) are not included in the draw and consequently are not allotted to all the applicants whose applications were accepted by the NIT, then please give the reason therefore. (f) Copy of the draw proceedings/documents, indicating the serial number of said flats of ৬৭০ sq. feet and name of the applicants in whose favour the said flats have been allotted by drawing lots or otherwise. (g) If the Contractor/officials concerned of the NIT, has failed to construct the flats of ৬৭০ sq.feet area flats under Lok Housing Scheme Phase II in Hill Road, as per sanctioned map/plan, then reason for such failure and action taken against the contractor/officials therefore. (C) Regarding flats of ৬২৪ sq.feet area having terrace constructed under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road. (a) Number of Flats of ৬২৪ sq.feet with terrace proposed to be constructed and for which applications were invited under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road. (b) Number of flats of ৬২৪ sq. feet with terrace actually constructed under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road and serial number of flats allotted to those flats. (c) Whether advertisement was published inviting applications for allotment of such ৬২৪ sq.feet flats with terrace. If so, then when the said advertisement was published with name of the newspapers and copy of such advertisement. (d) If advertisement was not published, then reason therefore, and then the mode of allotment of such flats of ৬২৪ sq.feet area with terrace, decided by the NIT. Please provide the copy of the such decision of allotment of such flats of ৬২৪ sq.feet with terrace. (e) Number of applications received and accepted for allotments of flats of ৬২৪ sq.feet area with terrace under Lok Housing Scheme

Phase I & Phase II on Hill Road. (f) Total number of flats of ৬২৪ sq.feet with terrace, their serial number, and names with address of the persons to whom such flats of ৬২৪ sq.area with terrace were allotted under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road. Please also give the mode/methodology of allotment and copy of the such decision. (g) If all the flats of ৬২৪ sq.feet with terrace actually constructyed under the said Phase I & Phase II Scheme are not allotted to all the applicants whose applications were accepted by the

NIT, then please give the reason therefor. (D) General about flats of ७२४ sq.feet with terrace and ७९० sq.feet flats. (a) If the contractor/officials concerned of the NIT, has failed to construct the ७२४ sq.feet with terrace flats and flats of ७९० sq.feet area flats under Lok Housing Scheme Phase I & Phase II on Hill Road, as per sanctioned map/plan, then reason for such failure and action taken against the contractor/officials therefore. (b) Number of flats of ७२४ sq.feet with terrace and ७९० sq.feet are available with NIT and if available reasons for not allotting the same to the applicants concerned. सदरची माहिती वैयक्तिकरित्या घेणार असे नमुद केलेले दिसून येते. पुन्हा सदरच्या अर्जामध्ये वरील अपीलातील विषयातील संदर्भात म्हणजे ७९० स्वेअर फिट प्लॉटच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते व त्यात पुन्हा if & but अशारितीने माहिती मागितलेली आहे याचा अर्थ अपीलकर्ता यांना झालेल्या कार्यवाहीची कारणमिमांसा अपेक्षित दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.१२.२००६ रोजी मागणी पत्र दिलेले आहे व त्याकरिता मात्र त्या सदरच्या पत्राप्रमाणे शुल्क भरलेले नसलेले दिनांक २५.४.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविलेले आहे. परंतु पैशाचा भरणा केलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही असा खुलासा दिसून येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांना दिनांक ७.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.८.२००७ रोजी देण्यात आला असून कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांनी अर्जदार यांना दिनांक २८.११.२००६ रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती/दस्तावेज त्वरित उपलब्ध करुन द्यावी. तसेच दिनांक २८.१२.२००६ व दिनांक २५.४.२००७ रोजी पाठविलेल्या पत्राच्या जावक रजिस्टर/Under Certificate of posting च्या नोंदी अपीलार्थी यांना उपलब्ध करुन द्याव्यात व अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १६.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली असून त्यावर त्यांची पोच दिलेली दिसून येते. अर्जदाराने माहिती वैयक्तिकरित्या घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे व वैयक्तिकरित्या माहिती घेण्यास हजर झाल्याचा पुरावा दिलेला नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र हे Under Certificate of posting ने पाठविलेले असल्यामुळे व जावक नोंदवहीची पोचवर स्वाक्षरी असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडून इतर अर्जाचे बाबत कार्यवाही पूर्ण झाली आहे असा निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते. अपीलकर्ता यांना सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे जरी असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी कार्यवाही पूर्ण केलेली असल्यामुळे त्याबाबतचा मुद्दा निकाली निघतो. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा अधिनियमाचे तरतुदीमध्ये दिलेल्या मुदतीच्या बाहेर दाखल केलेले आहे. तरी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या अपीलाचा निर्णय दिलेला आहे व निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे अपील क्रमांक २३५२/२००७ मध्ये दिनांक २२.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच अपील क्रमांक २३५३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ (२८.११.२००६) प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे दोनही अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९५१-९६१/१६.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३५९/२००७.

श्री. अरविंद केशवराव देशमुख,
मु. करडा, पो. मोहेगांव,
ता. रिसोड, जि. वाशिम. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, वाशिम.

जनमाहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, रिसोड,
जि. वाशिम. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१२.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. बी. सोलव, विस्तार अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. वि. मो. इंगळे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड यांच्याकडे रिसोड तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण योजने अंतर्गत किती निधी उपलब्ध झाला व कुठे किती खर्च केला व अपूर्ण कामाची माहिती पाणदन रस्ते, शेततळे, नालाबंधारा हया सर्वांची विस्तृत माहिती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.७.२००७ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अपीलीय अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २४.७.२००७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद, वाशिम यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड यांना अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे उपस्थित असलेले प्रतिनिधी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली परंतु ती विलंबाने उपलब्ध झ ाालेली दिसून येते. त्याकरिता जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी करावयाची आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९६२-९६३/१६.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३६५/२००७.

श्री. बालकिसन नटवरलाल बागसवार,
मु. पो. देव्हाडी,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. कुंभारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
तुमसर, जि. भंडारा.

श्री. डी. जी. नंदेश्वर,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, सा. क्र. २९,
मौजा देव्हाडी, ता. तुमसर,
जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. के. शेख, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००७ रोजी ग्राम विकास अधिकारी तथा तलाठी तथा माहिती अधिकारी , मौजा देव्हाडी म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मौजा देव्हाडी येथील त.सा.क्र. २९ मध्ये ८ (आठ) एकरी किंवा जास्त असलेले शेत जमिनीचे गाव नमुना ८ (आठ) ची सत्यप्रत काफी देण्यात यावी. २) मौजा देव्हाडी येथील २००१ ते २००७ चे बिचात जर कोणी कास्तकार बाधवाणी ८ (आठ) एकरी किंवा जास्त असलेली शेतजमिनीचे हिस्सेवाटे पाडले असेल हिस्से वाटणी करण्याकरिता आपले कडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश पत्र आणले असल्यास त्या आदेश पत्राची सत्यप्रत काफी व नोंद केलेले नोंदवहीची सत्यप्रत काफी व वेगळा वेगळा केलेला नमुना ८ (आठ) ची सत्यप्रत काफी देण्यात यावी. ३) शासनाने तुकडेबंधी अधिनियम कोणते तारखेपासून व कोणते वर्षापासून लागू केलेले आहे. ४) शेतकऱ्याला किती एकरीचे खाली शासनाचे अधिनियम अंतर्गत शेतजमिनीचा रजिस्ट्री करता येतो. ५) मौजा देव्हाडी येथील कास्तकार बाधवाणी ८ (आठ) एकरी किंवा जास्त असलेली शेत जमिनीची शासनाचे नियमाचे पालन न करुन जागा विक्री केलेली आहे काय ? विक्री केलेली असल्यास त्या कास्तकार बांधवाचा नावाची माहिती देण्यात यावी. ६) मौजा देव्हाडी येथील ८ (आठ) एकरी किंवा जास्त असलेली शेतजमिनीची रजिस्ट्री केली असल्यास व त्या रजिस्ट्री वरुन फेरफार केली असल्यास त्या रजिस्ट्री झेरॉक्स काफी व नोंदवहीची सत्यप्रत काफी देण्यात यावी. ७) मौजा देव्हाडी येथील

त.सा.क्र. २९ मध्ये ८ (आठ) एकरी किंवा जास्त असलेली जमीन विक्री करण्याकरिता वर्ग-२ ची जागा वर्ग-१ केलेली असल्यास त्या अधिकाऱ्यांकडून वर्ग-१ करिता मिळालेले आदेश पत्राची सत्यप्रत काफी देण्यात यावी. ८) आपण केलेले हे सर्व फेरफार शासनाचे नियमाप्रमाणे बरोबर आहे काय ? जरी बरोबर नसल्यास याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. ९) आपले वरिष्ठ अधिकारी आपले कार्यालयातील दस्तावेजची पाहणी करतात काय ? दस्तावेजची पाहणी केले असल्यास २००१ ते २००७ पर्यंत किती वेळा पाहणी केली. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज हा तत्कालीन तलाठी यांनी स्विकारलेला नसून सदरचा अर्ज हा तहसीलदार यांच्याकडे स्विकारला होता व तोच अर्ज तलाठी, देव्हाडी यांना आपण माहिती अधिकारी आहात व आपण माहिती द्यावी असे आदेश देऊन अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरीत केलेला दिसतो व त्यानंतर सदरचा अर्ज स्विकारुन अपीलकर्ता यांना दिनांक २५.६.२००७ रोजी ग्रामपंचायत निवडणूकीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे दिनांक १५.७.२००७ पर्यंत माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचे अधिकारा अंतर्गत माहिती पुरविणे मौजा देव्हाडी ८ अ चे वरील भुधारक प्राप्त दिनांक ४.६.२००७ चे खर्चाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना खर्चाचा तपशील कळविण्यात आलेला दिसून येतो. तसेच खर्चाची प्रत दुय्यम निबंधक, तुमसर कडून प्राप्त करुन घ्यावे व तयार मुद्यांची सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु अभिलेख पत्र घेण्यास नकार दिला दिनांक १५.७.२००७ रोजी शेरा दिसून येतो. त्याच पत्रावर मौका पंचनामा करुन आज दिनांक १४.७.२००७ ला माहिती ७/१२ अधिकार अभिलेख नकला गैरअर्जदारास बालकिसन बागसवार दिले असता त्यांनी सदर रेकॉर्ड खरेदीखत (रजिस्ट्री) मिळत नाही. तो पर्यंत रेकॉर्ड वरील अभिलेख मी नेत नाही असे समक्ष सांगितले. खरेदी खत दुय्यम निबंधक कार्यालयातून घ्यावे असे पत्रात नमुद केले त्यामुळे वरील रेकॉर्ड अभिलेख न घेता तलाठी कार्यालयातून निघून गेले. करिता अभिलेख घेतले नसल्याने मौका पंचनामा पोलीस पाटील, देव्हाडी सरपंच समक्ष केला आहे. ग्राम पंचायत उपसरपंच, तुडका, पोलीस पाटील, देव्हाडी, पोलीस पाटील, स्टेशन टोली, तुमसर रोड, सरपंच, ग्राम पंचायत, देव्हाडी व तलाठी, देव्हाडी यांच्या सहया असलेले अशा प्रकारचा मौका पंचनामा केलेला दिसून येतो. तसेच तत्कालीन तलाठी श्री. डी. जी. भवसार, यांनी उपविभागीय अधिकारी यांना तशा प्रकारचा अहवाल सादर केलेला दिसून येतो. त्यातही अपीलकर्त्यांच्या संबंधामध्ये कर्मचाऱ्यांस त्रास देण्याचे दृष्टीने कशाही प्रकारची माहिती मागुन विनाकारण त्रास देण्याचे काम हा इसम या गावात करतो. तसेच गैरअर्जदार यांनी माझी उपविभागीय अधिकारी, भंडारा कडे खोटी तक्रार केली व धमकावनी हे नेहमी त्रास व धमकी देत असतात यामुळे माझे मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. कोणत्याही सरकारी कामात नेहमी व्यत्यय आनण्याचे काम करतात तरी गैरअर्जदार विरुध्द आवश्यक कार्यवाही करुन माझेवर होणारे अन्याय व अत्याचार पासून मला मुक्त करण्यात यावे. अशी तक्रार केलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००७ प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.९.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी सदरच्या सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता दिनांक २०.७.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता दिनांक १३.८.२००७ रोजी सुनावणीस हजर होते असे दिसून येते. दिनांक १४.८.२००७ रोजी पुन्हा बोलविण्यात आले परंतु नंतर हजर झाले नाही व तलाठी यांचेकडून माहिती घेतल्यावर माहिती घेण्यास नकार दिला आहे माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक १३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे संदर्भामध्ये विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी दिनांक ३१.५.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाही आयोगाच्या निदर्शनास आणली. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी सुध्दा संपूर्ण झालेली कार्यवाही आयोगाचे निदर्शनास आणली त्यावरुन व मौका पंचनामावरुन अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती देण्याचा प्रयत्न केला असता सुध्दा त्यांनी माहिती घेतली नाही असेच दिसून येते व त्याबाबत सुध्दा तत्कालीन तलाठी यांनी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे अपीलकर्ता यांचे वर्तनाबद्यल तक्रार केलेली दिसून येते. वास्तविक सदरचे तक्रारीची चौकशी उपविभागीय अधिकारी यांनी करण्याची आवश्यकता होती. त्यावर उपविभागीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती घेण्यास बोलाविले होते. असे असले तरी सदरच्या मौका पंचनामा अपीलकर्त्यास भेटले व

सदर संपर्क झाला आहे किंवा नाही तसेच तत्कालीन तलाठी यांच्या तक्रारीची प्रथम चौकशी करणे आवश्यक आहे व त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भात येणारे अतिरिक्त खर्चाचे विवरण हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यानंतर अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) उर्वरित रजिष्ट्री संबंधातील माहिती अपीलकर्ता यांनी दुय्यम निबंधक यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी.

३) तत्कालीन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी जी तक्रार उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिलेली आहे त्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन, तुमसरचे ठाणेदार यांनी चौकशी करावी. उपविभागीय अधिकारी यांनी सदरच्या तक्रारीची प्रत तुमसर पोलीस स्टेशन यांना सदरच्या चौकशीची प्रत १० दिवसाचे आंत पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी. तसा अहवाल उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर करावा.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत ठाणेदार, तुमसर, जि. भंडारा यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १७.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/९६४-९६७/१७.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३६८/२००७.

श्री. विष्णू किसन टवलारकर,
विश्वकर्मा भवन,
मु. पो. ता. बाळापूर,
जि. अकोला. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.)
अमरावती विभाग, अमरावती.

श्री. डी. डी. डोलारकर,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बाळापूर,
जि. अकोला. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. बलखंडे, नायब तहसीलदार हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी, नगर परिषद, बाळापूर तथा मुख्याधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून काल्पनिक निवृत्ती वेतनात सुधारणा व दिनांक १ जानेवारी १९९६ पासून निवृत्ती वेतनात वाढ व फरक मिळणेबाबत. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून काल्पनिक निवृत्ती वेतनात सुधारणा होणे व दिनांक १ जानेवारी १९९६ पासून आज पर्यंतचा फरक मिळणेबाबत. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे १०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ नुसार तसेच मी आपणाकडे दिनांक २५.५.२०००, दिनांक २९.१.२००१, दिनांक १४.५.२००१, दिनांक ४.१.२००२ व दिनांक ११.४.२००२ रोजी केलेल्या अशा एकूण पाच विनंती अर्जानुसार मला अद्यापपावेतो वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्यात आलेली नाही. वरिष्ठ श्रेणी मंजूर न करण्याची कारणे मला कळविण्याची कृपा करावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.३.२००७ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, बाळापूर यांनी वरील विषयाचे अनुषंगाने आपला वरिष्ठ श्रेणी मिळणेबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे सादर केला होता. शिक्षणाधिकारी यांचे दिनांक ५.३.२००७ चे पत्रानुसार सदर प्रस्ताव त्यांनी नस्ती केला आहे. सोबत सदर पत्राची छायाप्रत जोडली आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी प्रथम अपील विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.६.२००७ रोजी झाला असून अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली

असल्याने सदरचे अपील खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या तर्फे श्री. पी. जे. वडतकर यांनी सांगितले की, निवृत्ती वेतनात वाढ फरक मिळाले होते. वरिष्ठ श्रेणी वेतनाचे संदर्भामध्ये जो निर्णय झालेला आहे त्या निर्णयांचे संदर्भामध्ये कारणे विचारली आहेत परंतु सदरचे कारण दिलेले नाही. त्यावर माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविला जातो व त्यांचेकडून मंजूर किंवा नामंजूर असेच नगर परिषदेकडे कळविले जाते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १४.३.२००७ रोजी कळविलेले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचा असा आग्रह आहे की, त्यांची मागणी नामंजूर करण्याच्या संदर्भात त्यांना कोणती कारणे आहेत ती त्यांना कळवावयास पाहिजे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णयाचे संदर्भातील कारणे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. परंतु जो निर्णय झाला असेल तो निर्णय ज्या आधारे झालेला असेल त्याबाबतची टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिल्यास त्या टिपणीच्या आधारे अपीलकर्ता यांना कारणे समजून येतील व त्यामुळे ज्या शिक्षणाधिकारी

यांच्याकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता त्या शिक्षणाधिकारी कार्यालयातून अपीलकर्ता यांच्या पाठविलेल्या प्रस्तावाच्या टिपणीची व निर्णयाची छायांकित प्रत हया उपलब्ध करुन दिल्यास अपेक्षित आलेली कारणे उपलब्ध करुन दिल्या सारखे होईल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये जो प्रस्ताव शिक्षणाधिकारी कडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असेल त्या प्रस्तावाची टिपणी व निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- १७.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/९६८-९७०/१७.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३७४/२००७.

श्री. राजेश हिरामन नितनवरे,
१०७, विंग - २, रजत संकुल,
एस.टी.स्टॅन्ड जवळ,
नागपूर - ४४० ०१८. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. ए. के. सिन्हा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र,
(नियोजन विभाग) व्ही.एन.आय.टी. परिसर,
दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर - ४४० ०११.

श्री. डी. बी. देवरे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र,
(नियोजन विभाग) व्ही.एन.आय.टी. परिसर,
दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर - ४४० ०११. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे कार्यालयात तारीख नसलेले माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र सुदुर संवेदन उपयोजन केंद्र यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आषाढ अपार्टमेंट, रिंग रोड, नागपूर येथे कर्मचाऱ्यांच्या निवासाकरिता म.सु.सं.उ.केंद्राच्या मालकीचे पाच गाळे आहेत यातील काही गाळे रिकामे आहेत असे कळते, तरी याबाबत खालील माहिती प्रत्येक गाळयाविषयी वेगवेगळी व १ जानेवारी २००० ते २८.२.२००७ या कालावधीकरिता देण्यात यावी. (अ) हे गाळे कोणाकरिता व किती किमती मध्ये घेण्यात आलेली आहे ? (ब) गाळे घेण्याकरिता केंद्राचा नियामक मंडळाने मंजूरी दिली त्या बैठकीचे एजेंडा नोट व मिनिट्सची प्रमाणित प्रत. (क) प्रत्येक गाळयाबाबत रिकामा असलेला कालावधी व त्याची कारणे तसेच रिकामा असलेल्या कालावधीत करावा लागलेला खर्च जसे म्युनिसिपल टॅक्सेस, सर्व्हिस चार्जेस, विद्युत खर्च, पाणी कर, मेंटेनन्स चार्जेस इत्यादी. (ड) वरील गाळे ज्या कर्मचाऱ्यांकरिता घेण्यात आली आहेत त्यांना आवंटन करण्यात आले होते काय ? असल्यास त्यांनी नकार दिला काय ? नकार दिला असल्यास त्यांना घरभाडे भत्ता नाकारण्यात आला काय ? (ई) घरभाडे भत्ता नाकारण्यात आले

नसल्यास घरभाडे भत्ता देण्याकरिता नियामक मंडळाची मंजूरी घेतली असल्यास त्याची माहिती व त्या मिटींगची अजेंडा नोट व निमिट्सची प्रमाणित प्रत. (फ) उक्त कालावधीत ज्यांनी सेंटरचे गाळे नाकारले अशा कर्मचाऱ्यांची नावे व त्यांना गाळे नाकारण्याचा तारखेनंतर देण्यात आलेली घरभाडे भत्त्याची एकूण रक्कम. सदरची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी मागितलेल्या माहितीचे पृष्ठ २३६ प्रमाणे ४७२/- रुपये व पोस्ट जार्चस रुपये १००/- रुपये असे एकूण ५७२/- रुपयांचा भरणा करावा असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००७ रोजी सदरची माहिती ही स्वहस्ते घेणार असे माहिती अधिकारी यांना कळविले व दिनांक १८.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना २१९ पृष्ठाची माहिती त्यांनी ही स्वहस्ते घेतल्याचे दिसते. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.६.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी अपीलाचे कारणे ही विलंबाने माहिती दिली व अपूरी माहिती दिली व खर्चाची जादा रक्कम घेतली व अनावश्यक माहिती दिली अशी कारणे दिलेली आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट दिसून येतो. तसेच विलंबाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता हे स्वत: जबाबदार दिसून येतात. दिनांक २८.३.२००७ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा जो कळविला आहे तो विहीत मुदतीत कळविला आहे. अतिरिक्त खर्चाचा भरणा करे पासून ते खर्चाचा भरणा केल्यापर्यंत काळातील ७ दिवसापर्यंत कालावधी मिळतो. माहिती ही व्यक्तिश: घेणार असे अर्जात नमुद केल्याचे पेक्षा कळविले आहे व त्यामुळेच झालेल्या विलंबास अपीलकर्ता सुध्दा जबाबदार आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणताही विलंब झालेला दिसून येत नाही. त्यानंतर मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपूर्ण माहिती असल्यास किंवा अनावश्यक माहिती असल्यास त्याबाबत विवरण देणे आवश्यक असते. परंतु अपील मेमोसोबत जी १० मुद्दे दिलेली आहेत त्या १० मुद्यांमध्ये माहितीच्या संदर्भामध्ये विवरण देण्यात आलेले नाही. तशा प्रकारचे विवरण देण्यात आले असते तर आवश्यक व अनावश्यक माहितीची तपासणी करता आली असती. परंतु तसे अपीलकर्ता यांनी प्रश्न विचारले असता त्यांनी लेखी दिलेले आहे असे आयोगाकडे उत्तर दिले. प्रथम अपीलामध्ये जे विवेचन केलेले आहे त्या विवेचनामध्ये सुध्दा द्वितीय अपीलामध्ये सदरच्या विवेचनातील आक्षेप जे आहेत ते काढून टाकण्याचे आदेश दिलेले आहेत ते काढावे अशी विनंती केलेली आहे. संबंधीत तक्रार ही रजिष्टर असल्यामुळे ते विवेचन काढून टाकण्यामध्ये कोणतीही आवश्यकता नाही त्यामुळे अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती मिळाली आहे ती विहित मुदतीत मिळाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/९७१-९७३/१८.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३७३/२००७.

श्री. वसंत चिंतामणराव अरमरकर,
गरुड खांब रोड, जामदार शाळेसमोर,
महाल, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त, (सा. प्र. विभाग)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. डी. एम. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना सहाय्यक आयुक्त, गांधीबाग (महाल) नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अनधिकृत नवीन बांधकाम नकाशा मंजूर न करता व कारपोरेशनची परमीशन न घेता माझे घराचे उत्तरेकडील बांधकामाबाबत संलग्न सहपत्रात उल्लेख केलेली माहिती मिळण्याबाबत. श्री. चेलानी यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत यापुर्वी दिनांक १७.११.२००३ च्या व दिनांक ५.४.२००७ च्या आपण केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने खालील मुद्याबाबत माहिती मिळणे. बलराम भाऊ गोविंद भाऊ नारायणदास वल्द लहरुमल चेलानी यांची मिळकत माझे मिळकतिचे उत्तरेस असून त्यांनी काही वर्षापूर्वी मकानाची बालकनी कोणत्याच प्रकारची जागा न सोडता व स्वतःचे बाऊंड्रीपेक्षा माझे जागेत बालकनी केली. त्या बालकनी मध्ये संडास व बाथरुम बांधले त्याबाबत लेखी तक्रार दिनांक १७.११.२००३ ला गांधीबाग झोनमध्ये दिलेली होती. त्या तक्रारीवर आपले विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत माहिती व पुरावा देण्यात यावा. सदर तक्रार अर्जावर कारवाई केली नसल्यास त्या मागची कारणे काय आहे व उद्येश काय आहे. तक्रार अर्ज आल्यानंतर ज्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही त्या अधिकाऱ्यांचे नांव व पद याबाबत माहिती कळवावी. सदहु तक्रार अर्जात संबंधीत गैरअर्जदारांनी माझे जागेतून टाकलेल्या गडर लाईन बद्यल तक्रार केली होती त्याबाबत कोणती कार्यवाही केली याचा खुलासा करावा व कार्यवाही केली नसल्यास त्या मागचे कारण व कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपले डिपार्टमेंट कोणतीही कार्यवाही करणार आहात काय याबाबत खुलासा. उपरोक्त तक्रार अर्जावर आपले विभागाकडून कोणतीही कारवाही झाली नसल्याने

गैरअर्जदारांची हिंमत वाढून त्यांनी माझे कुटुंबासह मी घराला कुलूप लावून बाहेरगांवी लग्नाला गेलो असता दिनांक ४.४.२००७ रोजी नवीन बांधकाम नकाशा मंजूर न करता सुरु केले असून त्यांनी नियमाप्रमाणे जागा न सोडता उलट माझे जागेवर ३ फुट पक्की बालकनी काढून बांधकाम सुरु केले आहे. तसेच माझे गल्लीतील माझे टाईल्स फोडून खोदकाम केले आहे. तसेच माझे प्लॉटमध्ये येण्याकरिता नवीन दरवाजा केला आहे. त्यांची इकडे वापर नसतांना सुध्दा जबरदस्तीने दरवाजा बसविलेला आहे. त्यामुळे माझे फार नुकसान होईल. त्यामुळे माझी पूर्ण प्रायव्हसी नष्ट झालेली आहे. मी सिनीयर सिटीजन मध्ये येत असून माझी प्रकृती ठिक राहात नाही. याचा फायदा घेऊन नेहमी धमकी देत असतो. तसेच त्या दरवाज्यातून कचरा घास टाकून मला त्रास देण्याचा प्रयत्न करतो हे सर्व कार्य आपले विभागाच्या सहमतीने होत असल्याचे आढळून येत आहे. सदर गैरअर्जदारांनी परत तळ मजल्याचे बांधकामानंतर पहिले मजल्याचे बांधकाम सुरु केलेले आहे. हे सर्व आपले विभागाचे आशिर्वादाने होत आहे. त्यामुळे आपले विभागाकडून न्याय मिळण्याची अपेक्षा नसल्यामुळे मला न्यायालयात दाद मागितल्या शिवाय पर्याय नाही. करिता माझे दिनांक ५.४.२००७ चे तक्रार अर्जानुसार खालील मुद्याबाबत माहिती देण्यात यावी. गैरअर्जदाराने तळ मजला व पहिला मजला यांचे जे बांधकाम केले आहे त्याचा नकाशा मंजूर केला आहे काय, नसल्यास आपले विभागाने कोणती कारवाई केली याबाबत खुलासा. नकाशा मंजूर करुन बांधकाम केले नसल्यास ते त्वरित अतिक्रमण विभागाकडून पाडणार आहात किंवा कसे पाडणार असल्यास किती दिवसात पाडणार व पाडणार नसल्यास त्या मागची कारणे. अनधिकृत बांधकाम करीत असल्यास व त्याबाबत तक्रार अर्ज दिल्यानंतर त्या तक्रार अर्जावर आपले कार्यालयीन अधिकारी यांनी कोणाला निरीक्षणाकरिता पाठविले त्यांची नांवे देण्यात यावी व निरिक्षण केल्यानंतर त्यांनी कोणता अहवाल आपल्या समोर ठेवला याबाबत माहिती देण्यात यावी. चेलानी विरुध्द माझे व श्री. बोथरा यांचे तक्रार अर्जावर केलेल्या कारवाई संबंधात अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असलेल्या नोटशिटची झेरॉक्स प्रत तसेच चेलानी यांना दिलेल्या नोटीसची झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी याबाबत निर्धारित शुल्क किती जमा करावे लागेल याची माहिती देण्यात यावी. निरिक्षण झाल्यानंतर सुध्दा त्याचे बांधकाम जोमात सुरु आहे व हे सर्व केलेले अनधिकृत बांधकाम नोटीस न देता तोडण्यात येणार आहे काय व ही कार्यवाही आपले विभागाकडून किती दिवसात कराल याबाबत खुलासा करावा. ही पूर्ण माहिती टपालद्वारे देण्यात यावी. टपाल द्वारे असल्यास शिघ्र पोस्टद्वारे देण्यात यावी या करिता येणारा खर्च मी स्वत: करण्यास तयार आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००७ रोजी अप्पर आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून सदरची उपलब्ध करुन दिलेली माहिती ही योग्य असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेली दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक ९.५.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्यातून अनाधिकृतपणे केलेले बांधकाम काढण्या/पाडण्याकरिता नस्ती दिनांक ६.७.२००५ ला प्रवर्तन विभाग, महानगरपालिका यांचेकडे पाठविली आहे या मुद्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरच्या प्रकरणाच्या अनुषंगाने प्रकरण आले आहे काय असे विचारले असता अर्जानुसार अनाधिकृत बांधकामाची कोणतीही नस्ती या विभागास प्राप्त झाली नाही असे त्यांनी दिनांक २५.७.२००७ रोजी कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, उपलब्ध करुन दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी माहिती आहे. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी प्रवर्तन विभागाकडून जी माहिती त्यांच्याकडे आली त्या माहितीबाबत त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले व त्यावरुन त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच सदरचे अनधिकृत बांधकामाची नस्ती ही दिनांक ६.७.२००५ रोजी प्रवर्तन विभागास पाठविण्यात आलेली आहे हेही आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या तक्रारीच्या अर्जानुसार ती नस्ती सुरु करण्यात आलेली नसल्याने श्री. बोथरा यांच्या दुसऱ्या तक्रारदाराच्या तक्रारीनुसार नस्ती सुरु करण्यात आलेली आहे. एक निश्चित सदरची नस्ती श्री. बोथरा श्री. अरमरकर यांच्या नावाने सुरु करण्यात आली नसुन अनाधिकृत बांधकामाची श्री. चेलानीची आहे त्यांच्या नावानी सुरु केलेली आहे. मात्र श्री. अरमरकर यांनी जो तक्रार अर्ज दिला आहे तो तक्रार अर्ज सदरच्या नस्तीमध्ये आढळून येतो व सदरच्या अर्जावर पुढील कार्यवाहीचे संदर्भामध्ये संबंधित तक्रारीचा शेरा सुध्दा दिसून येतो व त्यामुळेच एकच अनधिकृत बांधकामाचा अर्ज आला असेल तरी श्री. चेलानी यांच्या अनधिकृत

बांधकामाचे संदर्भामध्ये जी नस्ती प्रवर्तन विभागास दिनांक ६.७.२००५ रोजी पाठविण्यात आली होती. यावरुन माहिती बरोबर असून दिशाभूल करणारी नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. निव्वळ अपीलकर्ता म्हणतात त्याप्रमाणे नस्ती असावयास पाहिजे असा आग्रह त्यांना धरता येणार नाही. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातून जी अभिप्रायात्मक माहिती मागितलेली आहे ती अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.४.२००७ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती ही विहित मुदतील उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१२.२००८**

HIREKHAN/BHUJI/९७४-९७७/१८.१२.२००८

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३७५/२००७.

श्री. सोमा सुकाजी निखारे,
वडसा मेन रोड, टिळकनगर,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. वाय. खवास,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,
ता. अर्जुनीमोरगांव, जि. गोंदिया.

श्री. ए. डी. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ सहाय्यक,
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,
ता. अर्जुनीमोरगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १४.९.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी माहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) भविष्य निर्वाह निधीची माहिती दिनांक २७.११.२००६ व दिनांक ८.१.२००७ चे पत्राप्रमाणे जमा केलेल्या रक्कमेची माहिती मला दिली काय ? ती त्वरित देण्यात यावी ? रक्कम पूर्ण न मिळाल्यामुळे दुसरे प्रस्ताव दिनांक २३.१२.२००३ ला दिले ते गहाळ करण्यात आले हे खरे आहे काय ? यानंतर पुन्हा दिनांक २३.१२.२००४ ला तिसरे प्रस्ताव दिले हे बरोबर आहे काय ? रक्कम दोनदा दिली हे खरे आहे काय ? रक्कम वेळीच न देता उशिराने दिली हे खरे आहे काय ? २) रजा रोखीकरण दिनांक २२.११.२००६ ते दिनांक २८.११.२००६ एकूण ६ दिवसाची रक्कम मिळण्याबाबत दिनांक २६.६.२००३, दिनांक २०.१०.२००३, दिनांक २३.१२.२००४ ला तीनदा प्रस्ताव दिले हे खरे आहे काय ? यात कोणती कार्यवाही केली ते कळविणे. ३) प्रवास भत्ता बिल माझे बिल कार्यालयात आहेत हे खरे आहे काय ? यात कोणते आक्षेप/पूर्ता/त्रुटी करावयाची होती याबाबत मला कळविले आहे काय ? माझी लेखी न घेता ते नस्तीबध्द करता येते काय ? हे शासकीय नियमाला धरुन आहे काय ? नियमाची माहिती मला पुरविणे. याच कालावधीचे श्री. प्रधान यांचे बिल काढले हे खरे आहे काय ? तत्कालीन अधिकारी यांचे कालावधीचे बिल नस्तीबध्द करण्याचा आपणास कोणत्या नियमानी अधिकार आहे. ४) किरकोळ खर्चाचे बिल मंजूर झालेले ९३५ रुपयांचे बिल मिळण्याबाबत दिनांक ५.३.२००३, दिनांक २३.१२.२००३, दिनांक २९.४.२००४ व दिनांक ७.४.२००७ रोजी पत्र दिले हे खरे आहे काय ? यात कोणती कार्यवाही केली ते कळविणे. ५) पुरक माहिती (१)

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास प्रलंबित प्रकरणाची रक्कम वेळीच मिळावी या दृष्टिने आपण वेळोवेळी संबंधित वरील अधिकारी यांचेकडे पाठपुरावा केलेला नाही व पेन्शन मेळाव्यात माहिती दिलेली नाही हे बरोबर आहे काय ? (२) यामुळे मला विलंबानी रक्कम मिळालेली आहे हे बरोबर आहे काय ? (३) वेळीच पाठपुरावा केला असल्यास, प्रकरणवार आपले पत्र व्यवहाराचा क्रमांक व दिनांक द्यावा ? (४) बिल नस्तीबध्द करण्याचे कारण काय ? कारण मला न कळविता नस्तीबध्द कां केले ? (५) नस्तीची प्रमाणित प्रत देण्यात यावी ? (६) माझे प्रलंबित प्रकरण असतांनी सुध्दा आपण वरिष्ठ अधिकारी यांचेकडे अंतीम अहवाल पाठविला आहे हे खरे आहे काय ? (७) प्रलंबित प्रकरणबाबत आपण काय कार्यवाही केली ? (८) सन २००३-२००४ मध्ये अंदाजे १ लाख रुपयांचे प्रवास भत्ता बील काढण्यात आले पण माझे बिल काढले नाही प यानंतर १४,४९७/- रुपयांचे बील न काढता नस्तीबध्द करण्यात आले हे खरे आहे काय ? (९) दौराचे कर्मचारी यांनी आगावू दौरा दैनंदिनी मंजूर न करताच त्यांचे बिल मंजूर केले आहेत हे खरे आहे काय ? (१०) हे नियमाला धरुन आहे काय ? (११) श्री. प्रधान यांचे बिल मंजूरीची कार्यवाही सुरु आहे हे खरे आहे काय की बील काढले ? वरील विषयाची माहितीसह उत्तर देण्यात यावे. सदरची माहिती पंजीबध्द डाकेने किंवा दुतामार्फत पाठविण्यात यावी तसे लेखी कळवावे असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.७.२००७ रोजी आपण
मागितलेली माहिती कार्यालयात तयार असून आपली माहिती १६ पानी असल्याने आपण रुपये ३२/- कार्यालयात रोखीने भरुन सदर माहिती घेऊन जावी किंवा आपणास माहिती पंजीबध्द डाकेने पाहिजे असल्यास त्याचा अधिकचा वेगळा खर्च उपरोक्त रक्कमेसोबत भरावा. जेणे करुन आपणास माहिती पुरविता येईल. करिता आपल्या माहितीस्तव अग्रेषित. माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, अर्जुनी मोरगांव यांनी कळविलेले दिसून येते. त्याकरिता सर्व्हिस स्टॅपांचा हिशेब दर्शविणारे विवरणाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक १९.७.२००७ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याकरिता जे पत्र पाठविले होते त्यानंतर पुन्हा दिनांक ९.८.२००८ रोजी ९६/- रुपयांचा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते व त्यात १६ पृष्ठाकरिता ३२/- रुपये भरणा करुन सदरची माहिती घेऊन जावी. तसेच आपण दिनांक ४.८.२००७ ला कार्यालयात आले असता आपणास हवी असलेली माहिती अधिकारा अंतर्गत माहिती बाबदची रक्कम भरुन माहिती देण्यास आम्ही तयार असतांना सुध्दा आपण रक्कम भरण्यास व माहिती नेण्यास नकार दिला. उलट अपीलीत जाण्याचा अर्ज कार्यालयात सादर केला या कार्यालयाकडून माहिती देण्यास कोणतीच हयगय करण्यात आली नाही. तरी पुन्हा आपणास याद्वारे कळविण्यात येते की, आपणास हवी असलेली माहिती पंजीबध्द डाकेने किंवा खात दुतामार्फत पाहिजे असल्यास त्याचा अतिरिक्त चार्ज खालील प्रमाणे भरावा लागेल. खास दुताचा खर्च २ तिकीट रेल्वे ८ x २ = १६.०० रुपये भत्ता प्रति दिन ८०/-रुपये (१ दिवस) ८०.०० रुपये एकूण ९६.०० रुपये पंजीबध्द डाकेचा टपाल खर्च रुपये ४०.०० तरी वरील प्रमाणे दर्शविलेली रक्कम कार्यालयीन दिवशी व वेळेत रक्कम जमा करावी जेणे करुन संबंधित माहिती पंजीबध्द डाकेने/खास दुताद्वारे पाठविणे सोईचे होईल. तरी सदर पत्र मिळताच दोन दिवसाचे आत यावे. त्यानंतर दिनांक २३.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते व सोबत संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जी माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात किंवा अभिलेख किंवा दस्तऐवजाचे स्वरुपात उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या किंवा दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना छायांकिंत प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांचे प्रवास भत्ता देयके, रजा रोखीकरण, किरकोळ खर्चाचे बिल इत्यादी माहिती बद्दल त्यांना कार्यवाही अपेक्षित आहे व ती कां केली नाही हेही अपेक्षित आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी कार्यवाही अपेक्षित आहे ती विभागीय अभियंता/मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविलेले आहे व कार्यवाही त्यांचेकडून होणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे कोणतीही कार्यवाही शिल्लक राहिली नाही व त्यामुळेच त्यांना तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता हे वारंवार मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या दिनांक ३.११.२००६ चे पत्र आयोगाचे निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

त्या सदरच्या पत्रामध्ये त्यांना तपशीलात माहिती देण्यात आलेली आहे. त्याबद्यल पत्रातील रजा रोखीकरण, प्रवास भत्ता बिल, किरकोळ खर्चाचे बिल हे पंचायत समिती स्तरावर संबंधित आहेत. त्यामुळे सदर कार्यालयाशीच संपर्क साधावा. आपण स्वत: वरिष्ठ सहाय्यक या पदावर त्याच कार्यालयात कार्यरत असतांना वेळीच पाठपुरावा करावयास पाहिजे होता. व त्यामुळे त्यांना पंचायत समिती स्तरावर माहिती मागितलेली दिसून येते व वरील प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे. थोडक्यात अपीलकर्ता यांच्या विविध देयका संदर्भामध्ये त्यांना माहिती पेक्षा ती सर्व देयके मंजूर करुन हवी आहेत. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अशा प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही. अपीलकर्ता यांना ती कार्यवाही करुन घेण्याकरिता वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करावा लागेल व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांच्या प्रलंबित देयकाचे संदर्भामध्ये योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१२.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३७६/२००७.

श्री. काशीनाथ धोंडाप्पा भुसनुर,
वसंत सहकारी ग्रामीण गृह निर्माण संस्था मर्यादित,
मु. पो. लोहारा, ता. जि. यवतमाळ -४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
यवतमाळ - ४४५ ००१.

श्री. सारंग कोडोलकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, (महसूल)
ता. केळापूर (पांढरकवडा), जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, केळापूर(पांढरकवडा) यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून डॉ. श्री. बेडसे, तत्कालीन प्रभारी उपविभागीय अधिकारी, केळापूर यांना ज्या प्रकरणाचे ठोस कागदोपत्री पुराव्यांचे आधारे निलंबित करुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रकरण सुरु करण्यात आले आहे त्या प्रकरणांची खुलासेवार माहितीचा तपशील आवश्यक आहे. कागदोपत्री पुरावा नको अशा प्रकारे माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे यु.पी.सी.ने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.६.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, केळापूर यांनी अपीलकर्ता यांना तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी करणे व निलंबन प्रकरण सुरु करणे या कारवाया मा. आयुक्त,
अमरावती विभाग, अमरावती यांचे स्तरावरुन होतात. त्यामुळे त्यांनी कोणत्या ठोस कागदपत्राचे आधारे डॉ. श्री. बेडसे यांना निलंबित केले त्याची माहिती आपण मा. आयुक्त, कार्यालयाशी संपर्क करुन प्राप्त करुन घ्यावी व त्या अनुषंगाने या कार्यालयातील काही माहिती हवी असल्यास त्याचा

प्रकरण क्रमांक, कालावधी स्पष्ट नमुद करावा जेणे करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.७.२००७ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.९.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आयोगाकडे खुलासा करतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावरील नसून शासन स्तरावरील आदेश असल्यामुळे व त्याची प्रत उपविभागीय अधिकारी, केळापूर यांना पृष्ठांकित नसल्यामुळे सदर माहिती ही अर्जदाराने शासनाकडे अर्ज सादर करुन मागणे अपेक्षित होते. त्यामुळे शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, केळापूर यांनी आदेश पारित केला नाही. अर्जदाराने सदर माहिती मिळणेबाबत या कार्यालयाकडे अपील दाखल केल्यामुळे व सदर शासनाचे आदेश या कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे या कार्यालयाकडून दिनांक ११.९.२००७ रोजी विनामुल्य अर्जदारास देण्याबाबत निर्णय घेऊन प्रत देण्यात आली. सदरची प्रत कार्यालयातील प्रेक्षक विभागामध्ये दिनांक ११.९.२००७ रोजी प्राप्त होऊन प्रेक्षक विभागाकडून दिनांक ११.९.२००७ रोजी अर्जदारास पोष्टाद्वारे पाठविण्यात आली. प्रत पाठविल्याच्या नोंदीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक १.१२.२००८ रोजी श्री. मडावी व श्री. कांडलकर या लिपिकास अर्जदार श्री. के. डी. भूसनूर यांचे घरी पाठवून त्यांना समक्ष प्रत देण्यात आली. असे दोनदा अर्जदारास माहिती देण्यात आली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/९८३-९८४/१८.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३७७/२००७.

श्री. अनंत भगवान साळवे,
अशोक नगर, अण्णाभाऊ साठे नगर,
वार्ड क्रमांक ५, ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. आर. भिसे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
शहर उपविभाग, क्रमांक ३,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
अकोला.

श्री. प्रसेनजित वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
शहर उपविभाग, क्रमांक ३,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अकोला यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) फ्युज कॉल सेंटर क्रमांक ६ अंतर्गत येणाऱ्या ग्राहक क्रमांक ३१००७४०१२१७४ (अशोक भगवान साळवे) पोल नं. ए.बी.पी. ३१ वरील सदर्हु विज ग्राहकाने बिल रिडींग प्रमाणे मिळणेबाबत दिनांक ३१.१०.२००३, दिनांक २५.३.२००४, दिनांक २३.९.२००४, दिनांक २६.८.२००५ रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवर झालेल्या लिखीत कारवाईची छायांकित प्रत व ग्राहकाने दिलेल्या चारही मुळ तक्रारींची छायांकित प्रत देण्यात यावी. २) सन २००३ ते २००७ पर्यंत प्रत्येक महिन्याला येणाऱ्या बिलांची छायांकित सत्यप्रत अथवा नोटशिट देण्यात यावी. ३) सदर्हु प्रकरणात तात्कालीन कार्यकारी अभियंता तथा अपीलीय अधिकारी श्री. उकंडे साहेब यांनी आपले पत्र जा.क्र. का.अ./अकोला शहर/तांत्रिक/४८३९, दिनांक १९.११.२००५ नुसार झालेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी. ४) स्वाभिमान योजने अंतर्गत सुभद्रा म्हस्के व उत्तम भगवान साळवे यांनी नविन विद्युत पुरवठा मिळणेबाबत दिलेल्या अर्जावर झालेली कारवाईची माहिती व मुळ अर्जाची छायांकित प्रत देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांच्या ४ मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी, शहर उपविभाग क्रमांक ३, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, अकोला यांनी माहिती उपलब्ध करुन

दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय ऐकण्यास अपीलकर्ता हे हजर न राहिल्यामुळे दिनांक ३०.५.२००७ चा अपीलीय अर्ज फेटाळण्यात आला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी शहर उपविभाग क्रमांक ३ व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. वरील कार्यालय म.रा.विद्युत वितरण कंपनी अंतर्गत अकोला दुर्गा चौक येथे कार्यान्वित आहे. श्री. अनंत भगवान साळवे, अशोक नगर, अण्णाभाऊ साठे नगर, वार्ड क्र. ५, अकोला हे या कंपनीचे ग्राहक असून त्यांचे १) ग्राहक क्रमांक ३१००७४०१२१७४ थकीत रक्कम रुपये ३३,७७०/-, २) ग्राहक क्रमांक ३१००७०२४८५०५ थकीत रक्कम रुपये १४,१२०/-, ३) ग्राहक क्रमांक ३१००७०२७७७५१ थकीत रक्कम रुपये १५,६५०/- हा आहे. त्यांनी मागील ४ ते ५ वर्षापासून विद्युत वापराचे देयक भरलेले नाही. त्याबाबत त्यांना रितसर वसूलीची नोटीस देण्यात आलेली होती. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारे विद्युत देयकाचा भरणा केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विजमिटर काढून घेऊन विद्युत पुरवठा कायमचा खंडीत करण्यात आला व त्यामुळे आकस बुध्दीने त्यांनी या कार्यालयाकडे वरील प्रमाणे माहिती अधिकार मध्ये अतिशय गुंतागुंतीची माहिती मागण्यात आली आहे व त्यांना उपलब्ध असलेल्या कागदपत्रांप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क्रमांक ९५८, दिनांक २७.४.२००७ नुसार त्यांचे दिनांक २३.३.२००७ चे माहितीचे अधिकाराचे अर्जावर माहिती पुरविण्यात आली आहे. परंतु तरीही श्री. साळवे यांनी दिनांक ३०.५.२००७ चे माहिती अधिकार नुसार या कार्यालयास अपीलीय अर्ज दाखल केला. त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १२९३, दिनांक ६.६.२००७ नुसार श्री. साळवे यांना अपीलीय अर्जावरील सुनावणी करिता या कार्यालयास दिनांक ११.६.२००७ रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित राहण्याकरिता कळविण्यात आले. परंतु श्री. साळवे हे अपीलीय अर्जावरील सुनावणीकरिता उपस्थित न राहिल्याने त्यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १४४६, दिनांक २२.६.२००७ नुसार सुनावणीकरिता उपस्थित न राहिल्याने त्यांचा दिनांक ३०.५.२००७ चा अपीलीय अर्ज फेटाळण्यात आल्याचा निर्णय कळविण्यात आला. वरील परिस्थिती वरुन असे निदर्शनास येईल की, श्री. अनंत साळवे यांना या कार्यालयाकडून माहिती अधिकार अंतर्गत त्यांचे अर्जावर संपूर्ण सहकार्य करण्यात आले असून त्यांना पाहिजे असलेली संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. तरी सविनय सादर. वरील खुलाश्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचे विद्युत वापराचे देयक भरलेले नसल्यामुळे व विज मिटर काढले असल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन गुंतागुंतीची माहिती मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.१२.२००८**
HIREKHAN/BHUJI/९८५-९८७/१८.१२.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४८०/२००७.

श्री. वामनराव राघोबाजी गाणार,
अजनी चौक, वर्धा रोड,
पो. विवेकानंद नगर, नागपूर - ४४० ०१५ ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्री. डी. एस. बढीये,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर (ग्रामीण), नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१२.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एस. धनगरे, सिरस्तेदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांची अपीलातील तक्रार अशी आहे की, नरसाळा पटवारी ह. नं. ३७, या जमीनीची खरेदी विक्री व ७/१२ च्या उताऱ्याची झेरॉक्स प्रत मागितली होती, ती मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले होते तरी सुध्दा त्यांना ती माहिती न मिळाल्यामुळे दिनांक ८.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल करण्यात आले.

३. उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ४.६.२००७ चा अर्ज दिनांक २३.७.२००७ रोजी प्राप्त झाला. दिनांक २३.७.२००७ ला नोंद घेण्यात आली. दिनांक ७.८.२००७ ला तलाठी साजा क्रमांक ३७ कडून माहिती मिळाली. दिनांक १३.८.२००७ ला माहिती प्राप्त झाली व दिनांक १८.८.२००७ ला शिपाई मार्फत माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता नियमानुसार रुपये ६/- चा चलानद्वारे भरणा करण्याकरिता कळविले होते. अपीलकर्ताचा पत्ता बरोबर नसल्यामुळे शिपाई परत आला. वरील बाबींचा विचार करुन उत्तरवादीने मुद्दाम माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच माहिती फार थोडी असल्यामुळे व शासकीय रेकॉर्डवर उपलब्ध असल्यामुळे न देण्याचा प्रश्नही येत नाही. अपीलकर्त्यांचे अजूनही असे म्हणणे आहे की त्यांना आता सुध्दा माहिती मिळाली तरी चालेल. तहसीलदार, नागपूर ग्रामीण, नागपूर हे व्यक्तिगत हजर आहेत व विनामुल्य त्यांना माहिती देण्यास तयार आहेत. अपीलकर्ता हे माहिती घेण्यास तयार आहेत. माझे समोर सत्यप्रत देण्यात आली असून त्यांनी ती स्विकारली. आता याबाबत अपीलकर्त्यांची कोणतीही तक्रार राहिली नाही तरी सुध्दा उत्तरवादीस हयाबाबत जाणीव करण्यात आली की, यापुढे अशा प्रकारची दिरंगाई लहानसहान कामात व्हावयास नको व यापुढे अशा प्रकारे दिरंगाई होणार नाही असे त्यांनी कबूल केले. वरील सर्व

बाबींचा विचार करता अपीलकर्त्या यांचे समाधान झाले असून अपील गुणवत्तेवर निकाली काढण्याचा त्यांचा आग्रह नाही. त्यामुळे हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आ दे श

१) वरील अपील अपीलकर्ता यांनी आग्रह न धरल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे. त्यांना हवी असलेली माहिती त्यांना मिळाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(भास्कर पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ३१.१२.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती.**

HIREKHAN/BHUJI/९८८-९८९/३१.१२.२००८